म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ८३५
१८२५
REFBK-0002714

म. ग्रं. स. ठाणे
विषय शेती
स. नं. ४३५

# वऱ्हाडचा शेतकरी

व

# आचार.



उदंडाचें उदंड ऐकावें । परी तें प्रत्ययें पहावें ।
खरें खोटें निवडावें । अंतर्यामीं ॥

रामदास.

Published by Achyutrao Bhimrao Kshirsagar,
Akola [ Berar ]

Printed by Laxman Ramchandra Karmarkar at the
" Shri-Samarth " Press; House No. 40
Main Road, Nasik City.

सं.नि-५५

# वऱ्हाडचा शेतकरी व आचार.

हें पुस्तक

अच्युतराव भिमराव क्षिरसागर, राहणार आकोला [ वऱ्हाड ]

यांनीं तयार करून

नासिक येथें

लक्ष्मण रामचंद्र करमरकर यांचे श्री समर्थ छापखान्यांत

REFBK-0002714

२७१४

प्रती १

[ ह्या पुस्तकासंबंधी सर्व हक्क मालकीनें आपले स्वाधीन ठेविले आहेत. ]

१९२५.

किंमत १। रुपाया.

श्री

प्रस्तावनेंत लिहिल्याप्रमाणें रा. पुरुषोत्तमराव पंडीत यांस त्यांचे आर्थिक मदतीचे मोबदल्यांत या प्रथमावृत्तीचे उत्पन्नावरील हक्क सुपूर्त केला आहे.

# प्रस्तावना.

यद्यत्परवशं कर्म तत्तद्यत्नेन वर्जयेत् ।
यद्यदात्मवशं तु स्यात्तत्तद्यत्नेन सेवयेत् ॥
सर्वं परवशं दुःखं सर्वमात्मवशं सुखम् ।
एतद्विद्यात्समासेन लक्षणं सुखदुःखयोः ॥
—मनुः

मध्यम स्थितींतील शेतकरी वर्गाची हल्लींची स्थिति शोचनीय होत चालल्याचें सर्व विश्रुत आहे व ही स्थिति दिवसेंदिवस निकृष्ट होत आहे. तशीच सुशिक्षित मध्यम वर्गाचीही गोष्ट आहे. सदहु स्थितींतून त्यांस निर्मुक्त करण्यासंबंधीं प्रत्यक्ष कार्यरूपानें व मार्गदर्शकत्वाचे दृष्टीनें नियोजित उपाय योजना जनतेपुढें मांडण्याचा या लहानशा [ व्याख्यान रूपानें लिहिलेल्या ] पुस्तकाचा हेतू आहे.

सदर पुस्तकांत उभय वर्गाचें हल्लींच्या स्थितिचें दिग्दर्शन करून एकंदर आचाराचें–जनतेचें परस्परांतील व्यवहाराचें–स्वरूप कसें आहे व जनतेची प्रवृत्ती कोणत्या दिशेनें सुरूं आहे याची यथार्थ कल्पना देऊन त्यांचे परिणाम समाजांत–देशांत–सुखदुःखाचे विचार-दृष्टीनें काय होत आहेत; ह्मणजे लोकस्थिति कोणत्या प्रकारची आहे हें दाखवून पूर्वींच्या आचार-धर्माची स्थिति व महत्व किती होतें हेंही दर्शविलें आहे.

हल्लींचे स्थितींतून निर्मुक्त होण्यास कोणते उपाय आहेत व त्यांचा व्यवहारांत उपयोग कसा करून घेतां येईल हें दाखवून त्या उपाय योजनेचा भावी कार्यक्रम यांत दिला आहे. त्याची थोडक्यांत कल्पना देण्याची ह्मणजे " राष्ट्र संघटनयुक्त " संरक्षक पद्धतीचें अवलंबन केल्याशिवाय ही स्थिति सुधारणें

शक्य नाहीं. इतर साधनें व उपाय अंतीं निरुपयोगीं ठरतील. व तिचें अवलंबन केल्यास देशाची उन्नति व सुखाची प्राप्ती होणार आहे.

आतां या उपाय योजनेचें स्थूल स्वरूप ह्मणजे या संबंधीं जेथें —ज्या गांवीं--अनुकुलता दिसून येईल तेथें "शेतकी मंडळ" ह्मणून संस्था सुरूं करण्यांत यावी. व त्या करितां कपाशीच्या बाजारपेठेवर मुख्य शाखा ठेऊन तिच्या उपशाखा पांच ते दहा खेड्यांचा जींत समावेश होईल अशा गटेवार अनेक खेड्यांत काढण्यांत याव्या; व त्या संस्थांमार्फत शेतकऱ्यांच्या सर्व गरजा भागविणें, त्यांचे मालास किफायतीनें गिऱ्हाईक पाहून त्याजबद्दल त्यांस जे अनेक लोकांचे खिसे भरावे लागतात. तितक्याच पैशांत लहान लहान दुकानें व खेड्यापाड्यांत चालण्यासारखें लहान प्रमाणावर धंदे सुरूं करावे अशी ही योजना आहे, तरी ज्यांस ही पसंत असेल त्यांनीं यांतील पान ८१ वरील नमुन्यावर आपआपल्या खेड्यांतील त्यांत दिलेले प्रमाणावर सह्या करून पाठविल्यास पुढील कारवाईसंबंधीं तजवीज करण्यांत यावी. या संस्थेच्या पुढील प्रगतिसंबंधीं माहिती वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होत जावी. व त्यासंबंधीं पुस्तक प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याचे आंत कोणाकडून कांहीं सुचना आल्यास त्यांचाही विचार व्हावा. मंडळाची स्थापना प्रसिद्ध होईपर्यंत सर्व पत्रव्यवहार "कमर्शियल एजन्सी" मेनरोड, नासिक सिटी या पत्यावर करावा.

याप्रमाणें नियोजित योजनेचें स्थूल स्वरूप आहे. आतां सदर कार्यांत कांहीं व्यक्तींनीं केलेल्या मदतीबद्दल आभार प्रदर्शित करणें जरूर असल्यामुळें त्यासंबंधीं दोन शद्ब लिहून आम्हीं ही प्रस्तावना पुरी करितों.

आमचे सद्यस्थितींत व या कार्यांत ज्या गृहस्थांनीं आर्थिक मदत केली त्यांची यादी पुस्तकाचे शेवटीं दिली आहे. या त्यांच्या सहानुभूतिबद्दल आह्मीं सर्वांचे आभारी आहों.

या नंतर सदर पुस्तक छापण्याचे कामांत द्रव्य सहाय करून ज्यांनीं आपलें बंधुप्रेम व्यक्त केलें व हल्लींचे स्वार्थपरायणतेच्या कालांतसुद्धां कुटुंब प्रेमाचें अस्तित्व निदर्शनास आणून दिलें व ज्यांचेच केवळ सहाय्यानें आज आह्मीं जनतेची यथाशक्ती सेवा करण्यास समर्थ झालों; त्या आमचे प्रिय बंधुंचे—रा. पुरुषोत्तमराव पंडीत नासिक यांचें—आह्मीं कृतज्ञतापूर्वक अभिनंदन करून अभीष्ट चिंतन करितों.

आमचे प्रिय गुरुवर्य श्रीयुत दामले पेन्शनर आकोला यांनीं उपयुक्त सूचना करून पुस्तकाची दिशा दाखविल्याबद्दल त्यांचें आह्मीं ऋणी आहों.

तसेंच सदर पुस्तक लिहून झाल्यावर रा. हरी कृष्ण मोहनी यांचें "तेजस्वी शिक्षण" पुस्तक वाचण्यांत येऊन त्याचाही उपयोग झाल्यामुळें त्यांचेही आम्हीं विशेष आभारी आहों.

नासिक येथील रा. ब. डोळे पेन्शनर, प्रोफेसर पाटणकर व रा. बर्वे मास्तर यांनीं सदर पुस्तकांतील इंग्रजी उताऱ्यांचें भाषांतर करून दिल्याबद्दल आम्हीं त्यांचे अत्यंत आभारी आहों.

आतां केवळ सहानुभूतिनें या पुस्तकाचें पूर्व निरीक्षण व योग्य ती दुरुस्ती करून पुस्तक शक्य तितकें शुद्ध व भाषायुक्त करण्याचें ज्यांनीं श्रेय घेतलें त्या श्री. विनायक वासुदेव ऊर्फ आपासाहेब गोखले पेन्शनर नासिक यांचें आह्मीं या भावी कार्यास हा शुभ शकुनच समजून आभार व्यक्त करितों.

सरतेशेवटीं व्यवहारदृष्टया फायद्याकडेच केवळ लक्ष न देतां सदर पुस्तक सर्वांग सुंदर करण्याची ज्यांनीं विशेष काळजी घेऊन पुस्तक छापण्याचें काम संपेपर्यंत आपले सरळ पणाची व उदार मनाची आम्हांस साक्ष पटवून दिली त्या नासिक येथील "श्री समर्थ" छापखान्याचे मालक श्री. लक्ष्मण रामचंद्र ऊर्फ नानासाहेब करमरकर यांनीं आम्हांस विशेष उपकारबद्ध केलें आहे.

प्रस्तुत प्रबंध अव्यंग व निर्दोष करण्याची शक्य ती खटपट वरील सद्गृहस्थांनीं केली आहे. आतां जे प्रमाद, विसंगतपणा, अप्रबुद्धालाप किंवा तत्सदृश इतर दोष यांचा कोणास कोठें आढळ झाल्यास ते सर्व आमचे अल्पज्ञानमतीचेंच द्योतक समजून त्यांचे निःपक्षपातबुद्धीनें आविष्करण करून विचारशील वाचक हंसक्षीर न्यायानें रसास्वाद घेतील व आपले सहानुभूतिचा व वजनाचा पूर्ण फायदा आपले देशबंधूस देऊन यांतील उपाय योजनेस मूर्त स्वरूप देण्याचा शक्य तो प्रयत्न करतील अशी सदिच्छा आह्मीं प्रदर्शित करून यांतील न्यूनाधिक लेखाबद्दल सर्वांची नम्रपणें क्षमा मागतों.

शेवटीं या कार्यांत आलेल्या अडचणी व स्वतःची परिस्थिति या संबंधीं निष्कारण उहापोह करीत न बसतां ज्या जगत्सूत्रचालकाच्या कृपेनें हें आमचें प्रथम वाक्पुष्प वाचकवृंदाचे हस्तांत विराजमान होण्यास आज परिपूर्ण झालें त्याचें अनन्यभावनेनें चिंतन करून ही प्रस्तावना पुरी करितों.

श्री क्षेत्र नासिक.
ता. ३१ जुलई सन १९२५.

ग्रंथकर्ता.

सं. नि. ५५

# वऱ्हाडचा शेतकरी व आचार.

शेतकरी मंडळींनों ! आज मीं आपले विचार तुह्मांपुढें मांडण्यापूर्वीं हें मला प्रथम तुह्मांस सांगितलें पाहिजे कीं, माझा विचार तुह्मांस राजकारणांत ओढण्याचा नाहीं. कारण त्या करितां दुसरीं योग्य माणसें प्रयत्न करीत आहेत; किंवा अलीकडे तुमचे बद्दल सहानुभूति दाखवून ब्राह्मण ब्राह्मणेतर असे नसतेच काल्पनिक पक्ष निर्माण करून जे तुमच्या शांत मनोवृत्तीचा भंग करून जातीं जातींत नसतेच द्वेषभाव उत्पन्न करून समाजाचे पुढारी ह्मणून पुढें येऊन तुमची उन्नती करूं ह्मणतात; त्या प्रमाणें माझा तुमची दिशाभूल करण्याचाही विचार नाहीं. कारण माझी महत्वाकांक्षा पुढारीपणा घेण्याची नाहीं. तसेंच समाजासंबंधीं कांहीं सुधारणा घडवून आणून समाजांत धर्मविरुद्ध क्रांति करण्याचाही माझा विचार नाहीं. कारण त्याची आज इतकी अवश्यकता आहे असें माझे बुद्धीस वाटत नाहीं. तसेंच कांहीं धार्मिक कृत्य–संस्थांचें निमित्य–सांगून कांहीं वर्गणीही मागण्याची नाहीं. कारण आजकाल कांहीं निमित्य दाखवून वर्गणी मागणारांची संख्या इतकी वाढत आहे कीं, त्या संबंधीं सर्वांचे मनांतच प्रतिकुल भावना उत्पन्न झाली आहे. अर्थात् यास कारण त्या त्या लोकांचेंच आचरण होय. यामुळें धनिक व सुशिक्षित वर्ग या बाबतींत साशंक असल्यामुळें आतां बहुतेक ओघ शेतकऱ्यांकडेसच वळत आहे. ह्मणून आजकालच्या वर्गणीच्या बाबी ह्मणजे धर्माची बाब–यज्ञ, मंदीर किंवा त्याचा जीर्णोद्धार यांस मदत व गोरक्षण इत्यादि–तसेंच राजकीय

बाबींची वर्गणी या शिवाय निमसरकारी वर्गणी–शाळा, दवाखाने वगैरे, तसेंच सरकारी वर्गण्यांची बाब–सार्वजनिक कामास मदत, पानसुपारी, मानपत्र वगैरे मधून मधून सुरूच असतात. या शिवाय सरकारी देणें व इतर कर, शेतसारा, स्कूलपट्टी, जागलेपट्टी, पोलीसपट्टी, महारपट्टी, सडकपट्टी, भंगीपट्टी, घरपट्टी, नळपट्टी वगैरे या शिवाय सावकारी देणें, लहान गहाणाचें व गहाणाचें, प्रॉमिसरीनोटचें देणें, कपड्याचे दुकानचें देणें. या प्रमाणें बऱ्याच देण्याच्या बाबी असून त्या शिवाय कुटुंबखर्च, घरखर्च, लग्न-कार्य खर्च, नवीन शेती खरेदी खर्च वगैरे खर्चाच्या बाबी कितितरी आहेत; त्यांची साधारण कल्पना होण्यास ही यादी स्थूलमानानें दिली आहे. व या सर्व देण्याच्या बाबींची तोंडमिळवणी कशांतून तर एकटे शेतीचे उत्पन्नांतून. परंतु यांसही खर्च किती लागतो; कारण आजकालचे महर्गतेचे मानानें सर्वच महाग–मजुरी, बीं-भरण, लावलागवड–या सर्व गोष्टींचा नीट विचार केल्यास एखाद्या त्रयस्थ मनुष्यास तर कांहींच सुचेनासें होइल. परंतु तुमच्या नित्य सहवासाच्या व अंगवळणी पडलेल्या गोष्टी असल्यामुळें तुह्मीं बेफिकीर दिसतां. परंतु ही स्थिति कोठपर्यंत तर शेती कामधेनूचे स्तनांतून पीकरूपीं दुग्ध मिळतें तोपर्यंतच कसेंतरी यांतलें त्यांत त्यांतलें यांत करून वर्ष भागवितां. परंतु पर्जन्य राजानें जरा वक्र दृष्टी केली कीं, तुमचे सात गेले व पांच राहिले अशी स्थिति होते; व ती होणें अगदीं साहजीकच आहे. कारण सर्व शेतीवर अवलंबून ! परंतु चमत्कार काय होतो कीं, या वेळेस तुमचे वर्गणी मागणारे, फिर्यादीची फी घेणारे, सार्वजनिक चळवळीस मदत मागणार किंवा समाजाचे पुढारी म्हणून तुमचे हितचिंतक म्हणविणार कोठें अदृश्य होतात; याचा शोध केल्यासही तपास लागत नाहीं. त्या वेळेस नलराजानें पकडलेल्या हंसाची जशी करुणास्पद स्थिति कवीनें वर्णन केली कीं,–" कठिण समय येतां कोण कामास येतो. " त्याचा

तुम्हांस अनुभव येतो. परंतु हा तुमचा कठिण कालच ज्यांचा सुपीक हंगाम असे तुमचे कायमचे आश्रयदाते व यावेळीं प्राणदातेच ह्मणा तुमची मार्गप्रतिक्षाच करीत असतात व तुम्हांसही त्यांचेशिवाय म्हणजे सावकारांशिवाय दुसरा वाली नसल्यामुळें व तुम्हांसही एवढाच मार्ग मोकळा असल्यामुळें तुह्मीं निमूटपणें त्यांचे दर्शनसुखाचा लाभ घेतां; व देव-भक्तांचे प्रेमासही मागें सारणाऱ्या तुमचे देवतेचे ठिकाणीं जें जिव्हेचें माधुर्य तुह्मांस दिसून येतें; त्या आनंदाचे भरांत तुह्मीं शेटजी सांगतील तें शर्तीखत, लिहितील तें व्याज, मागतील तें तारण देऊन त्यांस संतुष्ट केल्यावर तेही तुमचें शांतवन करून तुम्हांस रवाना करतात. " परस्परं भावयंतः श्रेयः परमवाप्स्यथ " व ही पर्जन्यराजाची अशा रीतीनें कृपा तिसरे चवथे वर्षीं बहुतेक ठरावच झाल्यासारखी असलेमुळें मागचें साफसूफ होतें न होतें तोंच " पहिले पाडे पढो पंचावन " सुरूच. एवंच, " हें पुनरपि देणें पुनरपि घेणें, पुनरपि धनिक गृहीं जाणें " हें रहाटगाडगें, प्राणीमात्रांचे मागें लागलेले जन्ममृत्यूचे परंपरे प्रमाणें तुमचे मागें सुरूच आहे, व यास आरंभ सन १८९६ सालचे दुष्काळापासून झाला. त्या वेळचे स्थितीचा जर विचार केला तर आंगावर कांटाच उभा राहतो. व त्याच वेळेस कित्येक शेतकऱ्यांस गहाणाचें खरेदी खतानें सर्वस्व हरवून कफल्लक बनावें लागलें. असो, व याच वेळेस ज्या स्थितीनें तुम्हीं सर्वस्व गमावून बसलां, त्याच परिस्थितींत तुमचे सावकार मारवाडीवर्ग शेटजी बनले. व तेव्हांपासून त्यांस तुमचे अज्ञानपणाची, तुमचे सरळ स्वभावाची पूर्ण जाणीव होऊन त्याचा फायदा कसा घेतां येईल; हें जाणून प्रथम आलेल्या विदेशी कंपन्यांप्रमाणें ते हळू हळू आपले देशबांधवांसह येथें स्थाईक होऊन खेड्यापाड्यापर्यंत व्यापून राहिले आहेत, व पुढें कपाशीस भाव येऊन व्यापार जसजसा वाढत्याप्रमाणावर होऊं लागला तसें यांचें अनुकरण करण्यास गुजराथी, भाटे, बोहरी,

कच्छी वगैरे लोकही शिरूं लागले; व येथील व्यापार धंदे पूर्ण काबीज करून तुह्मांस अप्रत्यक्षपणें निकृष्ट स्थितींत दिवसेंदिवस ढकलीत आहेत; परंतु त्याची जाणीव अजून तुह्मांस नाहीं. यांत फरक एवढाच कीं, मारवाडी शिवाय इतर कोणी स्थाईक होण्याचा विचार करीत नसून मारवाडी मात्र येथील कायमचे रहिवाशी झाले आहेत. त्यांचीं लग्न-कार्येंसुद्धां इकडेच होतात. इतके ते स्वदेशासंबंधीं उदासीन आहेत याचा परिणाम कांहीं कालानें हा देश मारवाडच होईल अशीं चिन्हें दिसत आहेत. ही वस्तुस्थिती निरुपण करीत असतां मारवाडी वर्गास किंवा इतर वरील लोकांस थोडासा विषाद वाटण्याचा संभव आहे. परंतु तसें त्यांस वाटण्याचें वास्तविक कारण नाहीं. कारण ते जमाखर्ची लोक आहेत; त्यांस त्यांतीलच दृष्टांतानें सदरहूची खात्री देतां येण्यासारखी आहे.

एकाच दुकानचे निरनिराळे व्यवहार असतात. त्यांतील प्रत्येकाचा नफा-तोटा समजण्यास त्या त्या व्यवहाराचीं खातीं ठेवावीं लागतात. व ज्या एका विवक्षित खात्यांत–व्यवहारांत–नफा-तोटा पाहणें झाल्यास त्याच खात्याचे जमाखर्चाचा विचार करावा लागतो. वास्तविक व्यवहार सर्व एकाच भांडवलाचा असतो. व अशा अलग अलग खात्यांचे जमाखर्चांवरून अखेर आढावा निघतो; तो एकंदर भांडवलाचा नफा-तोटा होय.

दुसरा व्यवहारांतील दृष्टांत ह्मणजे असा कीं, एकेकाळीं एकत्र असलेले कुटुंबांतील कार्यकर्ते पुरुष घर शद्वाचा उपयोग समाईक घर ह्मणून करतात; परंतु ते पृथक् पृथक् झाल्यास त्याच घर शद्वाचा उपयोग अलग अलग केला जातो. व त्याचप्रमाणें सर्व व्यवहार व हिताहितही पृथक् पृथकच समजले जातात.

याचप्रमाणें जरी मारवाडी, भाटे, गुजराथी वगैरे लोक एतद्देशीयच

आहेत. तरी वऱ्हाड संबंधीं विचार करावयाचा ह्मटला ह्मणजे त्याचेच हिताहिताचे दृष्टीनें केला पाहिजे. याचप्रमाणें देशांतील विविध भागाचा पृथक् विचार हाच एकंदर देशाचा विचार होय.

आतां शेतकऱ्यांचे उपरी निर्दिष्ट विपन्नावस्थेंत आणखी भर पडणें म्हणजे शेतसाऱ्याची वाढ सवाईचे वर होणें ही होय.

तेव्हां आतां या परिस्थितीची मर्यादा आणखी किती होऊं देण्याची आहे व तुम्हीं शेतकरी लोक याकडे डोळे झांक कोठपर्यंत करणार आहां; हें आपणांस विचारण्यास मीं आज तुम्हांस तकलीफ देतआहे.

मीं आज बरेच प्रश्न तुम्हांस विचारणार आहे; व त्यांचीं स्पष्ट उत्तरें मला तुमचेकडून पाहिजेत. व त्या करितां मीं आज बराच वेळ तुमचा घेणार आहे. परंतु शहरांतील लोकांप्रमाणें "वेळ नाहीं" अशी सबब निदान आपण सांगणार नाहीं अशी मला उमेद आहे कारण मीं कांहीं माझे स्वतःचे कार्याकरितां तुमचेकडेस आलों नसून उलट तुम्हांस या बाबतींत ज्या उपयुक्त सूचना माझ्या मतें योग्य वाटतात त्या करण्यास आलों असून तुमची सहानुभूति मिळाल्यास या बाबतींत कांहीं मार्गदर्शिकत्वाचे दृष्टीनें प्रत्यक्ष कार्य करून दाखविण्यास माझी शक्त्यनुसार मदत देण्यास मीं आलों आहे.

आतां प्रस्तुत विषयासंबंधीं म्हणजे तुमचे सद्यस्थितीसंबंधीं जे प्रश्न महत्वाचे म्हणून मला दिसतात ते मीं तुमचे पुढें ठेवून त्यांची उत्तरेंही मीच आपणांस देत आहे फक्त तीं सत्य आहेत; तीं तुमचे अनुभवास जुळतात किंवा नाहीं एवढीच तुमची कबुली घेणें आहे. कारण तुम्हीं कोणी या संबंधीं ज्या दृष्टीनें विचार करण्यास पाहिजे त्या दृष्टीनें आजपर्यंत केला नाहीं; तेव्हां सर्वांस एकदम समर्पक उत्तरें देतां येणें शक्य नाहीं. माझे प्रश्न खालील प्रमाणें आहेत:—

१. वर जी संक्षेपतः स्थिती ( तुमची सद्यस्थिती ) म्हणून वर्णन केली त्याप्रमाणें वस्तुस्थिती बहुतांशानें आहे अगर नाहीं ?

२. असल्यास ती शोचनीय आहे; व ती अशीच दिवसेंदिवस खालावत जाण्याचा संभव आहे हें तुम्हांस मान्य आहे किंवा नाहीं ?

३. यामुळें तुमची आर्थिक स्थिती असमाधानकारक आहे व म्हणून तुमची विपन्नावस्था आहे; किंबहुना कित्येकांस अन्नवस्त्राचीसुद्धां पंचाइत पडत आहे; व ही अशीच सुरुं राहिल्यास तुमची हीनदशा होईल किंवा नाहीं ?

४. ही स्थिती येण्याचें कारण काय ? ही स्थिती तुमची तुम्हींच आणली असें तुम्हांस वाटतें किंवा नाहीं ?

५. वाटत असल्यास कोणत्या बाबतींत तुमचें वर्तन बिघडत आहे ? तुमची चूक होत आहे असें तुम्हांस वाटतें काय ? वाटत असल्यास ती कोठें होते; व ती सुधारतां येणें शक्य आहे किंवा नाहीं ?

६. ही स्थिती सुधारण्याचे मार्ग कोणते असे तुम्हांस वाटतात; व ते मार्ग अमलांत आणणें शक्य आहे किंवा नाहीं ? नसल्यास त्यास काय अडचणी आहेत ? किंवा येण्याचा संभव आहे ? व त्या कशा दूर करतां येतील ?

७. या संबंधीं उपाय योजना सुचविल्यास त्यास तुमची सहानुभूति मिळेल काय ? व त्याप्रमाणें तुह्मीं वागण्यास तयार आहांत काय ?

आतां वरील प्रश्न तुमचे विचारांवर ठेवून त्यावर थोडासा प्रकाश पाडण्यास सद्यस्थितीची साधारण रुपरेषा आंखून त्यावर उत्तर रूपानें मीं आपले विचार तुह्मांस सादर करितों.

प्रथमत: एखादे मनुष्यास त्याचें स्वत: संबंधीं योग्यतेचें ज्ञान नसल्यास तें त्याचे उन्नतीस किती घातक किंवा प्रतिबंधक होतें याची कल्पना येण्यास एक इसापनीतींतील गोष्टींसारखा दृष्टांत देऊन सांगतो.

एक धनगर जंगलांत मेंढ्या चारीत असतां त्यास जवळच एक वाघांची जाळी दिसली. ती पाहतांच तो घाबरून त्यांतील वाघाची झडप आतां आपल्या कळपावर पडून बरीच नुकसान होण्याचा संभव आहे. ही गोष्ट मनांत येऊन त्यास फार दु:ख झालें; व तो विचारांत पडला. जवळपास कोठेंच माणसांची चाहूलसुद्धां नसल्यानें त्यास मदतीची आशा दिसेना. तेव्हां स्वत:च हिंमत धरून आपला मार्ग काढला पाहिजे असा विचार करीत तो त्या जाळीचे जवळ जाऊं लागला तों आंतून वाघाचें एक पिलूं जाळीचे तोंडाशीं येऊन इकडे तिकडे पाहूं लागलें व धनगराची नजरानजर होतांच आंत पळून जाऊन इकडे तिकडे फिरूं लागलें; हें पाहून आंत दुसरें कोणी नाहीं असें धनगरास वाटून तो परत आपले कळपाजवळ आला व मेंढ्यांस गांवांकडे हांकलून देता झाला. व थोड्याच वेळांत जाळीशीं येऊन त्या पिलास घेऊन तो गांवांत आला. त्या पिलास मेंढ्यांचे पिलांतच बांधून त्यांजबरोबरच त्याचेहा चारापाणी त्यांचे प्रमाणेंच करूं लागला कांहीं कालानें तें मोठें झाल्यावर त्यास रात्री कळपाचे रक्षणास ठेवून दिवसाही त्यांतच ( कळपांत ) घेऊन जात असे कर्म-धर्म संयोगानें एकदां एका वाघाची गांठ पडून तो जवळ येत आहे असें पाहतांच तें पिलूं भिऊन मालकाकडे धांवत गेलें. हें पाहून वाघास अर्थातच आश्चर्य वाटलें; व हा मूळचें स्वरूप व योग्यता विसरल्याचें त्याच्या लक्षांत आलें; व त्याचें कारणही त्यानें ओळखलें. मग जात्याभिमान त्यास स्वस्थ कसा बसूं देईल. त्यास कोणत्या उपायानें ताळ्यावर आणतां येईल ? त्यास त्याचे योग्यतेची जाणीव कशी करून देतां येईल ? याचा क्षणभर त्यानें विचार करून त्यास पूर्व स्वरूपांत

मिळविलें व तेव्हांपासून तो त्याजबरोबरच राहूं लागला.

सारांश सांगण्याचें तात्पर्य हेंच कीं, या प्रमाणें आज आमचे शेतकरी वर्गाची स्थिती झाली आहे. वास्तविक ज्यांचे उद्योग—स्वधर्म—ह्मणजे शुद्ध सात्विकपणाचे स्वकर्मानें स्वतःचें उदर भरण्याचीच केवळ प्रवृत्ती नसून ज्यांचे श्रमानें—उद्योगानें—सर्व जगताचे निर्वाहाची सोय होते. धनधान्यादिकांचे पुरवठ्यानें याच देशास नव्हे तर इतर देशासही ज्याचा उपयोग होत आहे; एवढेंच नव्हे तर आज श्रीमंत, धनिक, व्यापारी व मजुर ज्याचे अस्तित्वावरच अनेक उद्योगधंदे, व्यापार वृद्धी व सुधारणा करीत आहेत, आज धनिक वर्गास जीं उंची —मौल्यवान—वस्त्रें मिळत आहेत, आज जे त्यांचे हवाशीर राजविलासी बंगले दिसत आहेत हे कोणते द्रव्यावर? तसेंच वकील, व्यापारी वगैरे लोकांचे संततीचें उच्च शिक्षण, त्यांचें कौतुक व हौस पुरविण्याचें मुख्य साधन कोणतें? या व अशाच आज ज्या ऐश्वर्य संपन्न, वैभवयुक्त व्यक्ती दिसताहेत त्यांचें प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सुखाचें साधन कशावर अवलंबून आहे याचा जर सूक्ष्म दृष्टीनें विचार केला तर कोणाकडे बोट दाखविणें भाग आहे हें विशेष स्पष्ट सांगण्याची जरूर दिसत नाहीं. हें कशाचें फल म्हणून जर कोणी शांतपणें विचार करील तर त्यास प्रांजळपणें कबूल करावें लागेल कीं, आज शेतकरी वर्ग जिवंत आहे म्हणून या सर्व गोष्टी; ह्मणजे स्पष्ट शद्वांत आज जो सुशिक्षित, अशिक्षित सुधारणेचे उच्च शिखरावर चढलेला किंवा अधोगतीस चाललेला कोणताही देश असो त्यास आधार प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष शेतकरी हा होय. मग अशी जर वस्तुस्थिती उघड दिसत आहे तर सर्व जगास पोसणारा शेतकरी स्वतः थंडी, ऊन, वारा, पाऊस यांत रात्रंदिवस आपले मुलाबाळांसुद्धां खपणारा स्वतःचें व मुलाबाळांचें अन्नवस्त्रांससुद्धां महाग व्हावा हें केवढें आश्चर्य? त्यास मीठ आहे तर तेल नाहीं; डाळ आहे तर भाजी नाहीं; ताट आहे तर तांब्या नाहीं;

ग्रंथ संग्रहालय
३९०
९-८-३०

अन्न आहे तर वस्त्र नाहीं; अशी त्यांची दिगंबरास्थिता होऊन ते श्रीमंत व धनिक जैन-भक्तांचे देवाप्रमाणें नागवा उघडाच रहावा हा काय सृष्टि-चमत्कार? तसेंच ज्या देशांत समाजांतील एका प्रधान अंगाची याप्रमाणें स्थिती झाली तो देश इतर साधनांनीं उन्नतीस येण्याची आशा धरणें संभवनीय आहे काय? किंबहुना या एका विशिष्ट वर्गाचे अधोगतीची परमावधी होणें ह्मणजे राष्ट्र पंगू झाल्यासारखेंच आहे असें ह्मणण्यास कांहींच हरकत दिसत नाहीं. कारण हें राष्ट्रपुरुषाचे चरणच आहेत.

आतां ही वस्तुस्थिती लक्षांत घेऊन ती सुधारण्यास सुशिक्षित समाजधुरिणांचें कर्तव्य नाहीं काय? परंतु त्यापैकीं कांहींचे कृतीकडे पाहूं गेल्यास असलेली परिस्थिती आणखी बिकट करण्याकडेसच त्यांची प्रवृत्ती दिसत आहे. त्यांची विचार-मीमांसा ह्मणजे "ब्राह्मणांनीं आपलें सर्व जातींवर वर्चस्व ठेवून ते शूद्रास हीन व क्षुद्र समजतात. व त्यामुळें त्यांनां आजपर्यंत अज्ञानावस्थेंत—अशिक्षितपणांत—रहावें लागत असल्यामुळें त्यांनां आपली उन्नती करून घेतां आली नाहीं. तेव्हां आतां त्यांनां सक्तीचें शिक्षण देऊन ब्राह्मणांचा यांचा संबंध तोडावा. त्यांचेकडून या वर्गांतील धर्म-कृत्यें—श्राद्ध, सत्यनारायण पूजा, लग्न-कार्यें किंवा अंत्यविधी—कांहींच न करवितां त्या वर्गांतीलच लोकांनीं ते सर्व प्रयोग शिकून तीं सर्व कामें करावीं." वगैरे वगैरे, व त्याप्रमाणें सत्यशोधक मंडळींची स्थापना होऊन त्यांचे द्वारा अमलबजावणीही होत आहे; ही फार उत्तम गोष्ट आहे. कारण *लग्न-कार्यांत, तसेंच सत्यनारायण व उत्तर-कार्यांत आजपर्यंत शेतकरी—शूद्रवर्ग--यांचा खर्च जास्त होऊन शेतकरी लोक दरिद्री झाले आहेत; कारण ब्राह्मण दक्षणा फारच घेतात. परंतु हें वस्तुस्थितीला कितपत धरून आहे याजबद्दल

---

* लग्नकार्यांतील आवाक्याबाहेरील खर्चानें खेड्यांतील लोकांस कर्ज होतें, हे थॉरबर्न साहेबांनीं खोटें ठरविलें आहे. (मोहनीकृत तेजस्वी शिक्षण पान १०७.)

फारसा विचार करण्याचें कारण नाहीं. आजपर्यंत शेतकरी लोकांनीं या कार्यांत घरावर तुळशीपत्र ठेवून ब्राम्हणास सनदा, बक्षिसपत्र, खरेदीखत वगैरे देऊन त्यांतच त्यांनीं आपलें सर्वस्व गमावलें व आज या स्थितींत ते आले आहेत; तेव्हां हा इहपरलोकीं प्राणिमात्रांस सहायकारी असणारा दानधर्म ( धर्मस्तमनुगच्छति ) त्यांनीं बंद केला; ही कांहीं वाईट गोष्ट त्यांनीं केली नाहीं; व अशा या अवाढव्य होत असलेल्या खर्चाचा बंदोबस्त करून सत्यशोधक मंडळींनीं आजपर्यंत किती घराण्यांस त्यांचे पूर्व वैभवास पोहोंचविलें याची यादी त्यांनीं दरसाल आढावा काढला असेल त्यावरून प्रसिद्ध केल्यास इतर त्यांचे जातिबांधवांस ( जे अजून त्यांचे अनुयायी झाले नाहींत ) ही त्यांची दीक्षा घेण्यास ठीक पडेल; व त्यामुळें शीघ्र क्रांती घडून येण्यास सुलभ जाऊन त्यांचा त्रासही कमी होईल अशी मीं त्यांस सूचना करतों. कारण अशा रीतीनें एक तरी वर्ण या सद्य स्थितींतून समाधानकारक स्थितींत आल्याचें पाहून कोणासही समाधानच वाटणार आहे; व ब्राह्मणासही आनंद झाल्यावांचून राहणार नाहीं; कारण दक्षणा घेणारांची संख्या समाजांत अल्प आहे. बहु जनांचें मत असें आहे कीं, सर्वच वर्णांची स्थिती शोचनीय झाली आहे; व दिवसेंदिवस निकृष्ट होत जाण्याचीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत परंतु एकमात्र या मंडळींचें चुकत आहे तें हें कीं, निष्कारण ब्राह्मण वर्गाची निंदास्पद लावण्यांनी फक्त तमाशे करवून त्यांतून त्यांची अप्रतिष्ठा--विटंबना--करणें व इतर रीतीनें छळ करण्याचा उपक्रम करणें हें मात्र त्यांचे सुशिक्षितपणास व पुढारीपणास न शोभण्यासारखें आहे. उलट समाजोन्नतीचें जें त्यांचें ब्रीद--ध्येय-- त्यास मात्र कलंक लावणारें आहे. कारण त्यांचें अंतःस्थ नीच मनोविचारांचें हें बाह्य प्रदर्शनच होय; व ते स्वतःच करून स्वतःची कीर्ति व उदात्त धोरणमात्र दूषित करून घेतात. कारण त्यांचे चळवळीस किंवा प्रवृत्तीस ब्राह्मणांकडून कोणताच प्रतिबंधक प्रयत्न केला जात नाहीं;

म्हणून या मनोवृत्तींचा, प्रयत्नांचा व बुद्धीचा जर ते योग्य कार्याकडेसच --म्हणजे समाजोन्नतीचें प्रत्यक्ष कार्य--उपयोग करतील तर कार्यही शीघ्र होऊन कीर्तीचाही लाभ होईल; व मान्यताही प्राप्त होईल.

दुसरें अशा रीतीनें आज ब्राह्मणांवर आग पाखडणें ह्मणजे आपलीच जीभ आपल्या दातांखालीं घेणें आहे; व इतरांस, देशांत परस्पर ऐक्य कितपत आहे याचें प्रदर्शनच दाखविणें आहे. कारण त्यांचेवर अगोदरच इस्लामी धर्मानुयायांची व राज्य-कारभार पाहणारांचीही वक्र दृष्टी आहेच. आज त्यांची या वर्गापेक्षांही इतकी हीनस्थिती होत चालली आहे कीं, त्यांचा मुख्य व्यवसाय--उदर-निर्वाहाचें एकच होऊन बसलेलें साधन--ह्मणजे जी नौकरी तीही त्यांस न मिळण्याबद्दल उघड उघड सरक्युलर हुकूम होत आहेत. धनिक वर्गही त्यांस तुच्छ मानून जे त्यांस पूर्वी मुनिमीचीं जागा देऊन शेतकऱ्यांचे गहाणाऐवजी खरेदी, लहान गहाण, साधे दस्तऐवजाचें गहाण वगैरे व्यवहार त्यांस अमीष दाखवून स्वतःचें प्रस्थ वाढवीत होते; तेच आज पूर्ण शेटजी बनल्यामुळें व स्वतः कायद्याची माहिती झाल्यामुळें स्वजातियांसच उच्च जागा देत आहेत. व्यापारी वर्ग--बोहरी, कच्छी, गुजराथी, भाटे--स्वजातिपक्षाभिमानी स्वतःच असल्यामुळें त्यांचे दुकानांवर त्यांचेच जातभाईशिवाय इतरांची डाळ शिजतच नाहीं. व याप्रमाणें चोहोंकडे जवळ जवळ माज्जवच होत चालल्यामुळें नोकरीकरितां हजारो लोक पदवीधर होऊनसुद्धां बेकार फिरत आहेत; व ते याप्रमाणें स्वतःचे फिकिरींत असल्यामुळें शेतकऱ्यांचे --शूद्रवर्णाचें--महत्व व वर्चस्व कमी करण्याचे व्यर्थ खटपटींत पडण्यास त्यांस फुरसतच नाहीं. तेव्हां 'तूं नाहीं तुझ्या बापानें शिव्या दिल्या असतील' म्हणून युक्तिवाद लढवून इसापनीतींतील कोल्ह्याशीं व्यर्थ वाद घालणाऱ्या वाघाप्रमाणें ही मंडळी आज निष्कारण आपल्या ज्ञानाचा व शक्तीचा आपव्ययच करीत आहेत; असें मोठ्या दिलगिरीनें ह्मणावें लागतें. यांत म्हणजे त्यांनां मोठी अजिंक्यता प्राप्त होईल असा भाग नाहीं. कारण

ब्राम्हणांचें आतांपर्यंत वर्चस्व होतें हें जरी खरें असलें तरी " ज्याचे आंगीं मोठेपण तया यातना कठीण " ही त्यांच्याच वर्णविशिष्ट सत्पुरुषाची उक्तीही तितकीच यथार्थ आहे. असो, यासंबंधीं यापेक्षां जास्त विवेचन करण्याचें कारण नाहीं; कारण हा आमचा प्रस्तुत विषय नाहीं. परंतु परस्परांतील द्वेषभाव प्रज्वलित करण्याचा वरील मंडळींचा उद्देश उघड असल्यामुळें व आमचा तो निर्मूलन करण्याचा असल्यामुळें त्यासंबंधीं थोडासा खुलासा करणें भाग पडलें; व याचा ते विचार करतील तर माझ्या सूचनेचा अनुकूल परिणाम झाल्याबद्दल मला संतोषच वाटणार आहे.

आतां हल्लींचे या वर्गाचे स्थितीसंबंधीं विचार करण्याचा म्हणजे, रोग्यास कोणत्या रोगाची भावना झाली हें समजण्यास जसें वैद्य त्याचे लक्षणांची चौकशी करतो व त्यावरून ठरवितो; त्याप्रमाणें या वर्गाचें सद्यस्थितीचें लक्षण काय ? म्हणजे सध्यां शेतकरी वर्गास कोणत्या गोष्टीची अडचण, उणीव किंवा गरज आहे; हें पाहणें आहे. याचा विचार करितां त्यांस नेहमीं द्रव्याची टंचाई–कमतरता–आहे व भासते. वास्तविक शेतीचा माल कमी येतो असें नाहीं. किंवा त्यास भाव नसतो असेंही नाहीं. किंवा शेतकऱ्याचा खर्च वाजवीपेक्षां फाजील वाढला असेंही बहुतांशानें म्हणतां येत नाहीं. अशी वस्तुस्थिती असतां कित्येकांची गाडी–कपाशीची भरलेली–म्हणजे भाड्यानें कपाशीचा माल नेणारा जसा गाडी-भाड्याचेच पैसे घेऊन घरीं येतो; तद्वतच वापस येते. म्हणजे कपाशीचा मोबदला निम्मेसुद्धां घरापर्यंत येत नाहीं. कित्येकांचा आलाच तर आखजीही पहात नाहीं. म्हणजे आखजी ( अक्षय्यतृतीया ) झाली कीं, शेतकरी चालला सावकाराकडे. मग कपाशीचें बीं सवाई व्याजानें व सावकार देईल त्या भावानें घेण्याला येथून त्याचे घरीं फेऱ्या करण्याला आरंभ होतो. पुढें इतर बींभरण, लावलागवड, निंदाई, वेंचाई वगैरे खर्चाची परंपरा हंगामापर्यंत सुरूंच राहण्याची

असल्यामुळें सावकारांचे अर्जव व त्यांचे मिष्ट भाषणयुक्त कडक करार–व्याजाचे दर व शर्ती वगैरे यांचा--त्यांचे इच्छेप्रमाणें लिहिलेले खतावर निमूटपणें सही किंवा आंगठा देणें भाग पडतें. व कायदा त्याची योग्य अमलबजावणी करीत असतो. कारण तो कायदाच--ह्मणजे न्यायच--तेथें न्यायाधिशाचा तरी काय इलाज ! कारण “ हा दस्तऐवज मीं आपले स्वसंतोषानें लिहून....दिला असे. ” असा स्पष्ट लेख असल्यावर “ सो बका एक लिखा ” सारखेच असल्यामुळें त्याच्या तोंडी तक्रारीस दाद कशी मिळणार ? त्यांतून वकिली कुशलता व बुद्धिमत्ता पूर्ण अनुकूल ! फिर्याद लिहिण्यापासून तों साक्षी-पुरावा तयार करविण्याविषयीचे सल्ल्यापर्यंत व फिर्यादीचा सत्पक्ष ह्मणून कोर्टास कायदा व वस्तुस्थिती ह्मणजे पुरावा यांचे आश्रयानें कार्य-कारण-भाव-संबंध जुळवून प्रतिपादन केल्यावर आजपर्यंतचे त्याचे ( कायद्याचे ) सतत व्यासंगाचे सकारणीं बुद्धीचा व्यय करणारांस “ ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी ” या न्यायानें योग्य मार्गावलंबन करणारास त्यांचें निष्काम-कर्मयोगाचें आचरणाचें म्हणजे हुकुमनाम्यांत कांहीं अपेक्षा न ठेवतां अहेतुक बुद्धीनें कर्म करणाऱ्या कर्म-योग्यास त्यांचें सत्कर्माचें योग्य फल कां मिळणार नाहीं ? व त्यामुळें त्यांचे आश्रय करणारांस असेंच कर्म करून शेतकऱ्यांस सर्व उपाधींतून व दगदगींतून कायमचें निर्मुक्त करण्याचें श्रेय घेण्यास कसें उत्तेजन मिळणार नाहीं ? असो, अशा प्रकारचे आमचे सुशिक्षित वर्गांत जो स्तुत्य उद्योग होत आहे व ज्यामुळें धनिक वर्गास महदाश्रय मिळाला आहे त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें अयुक्त कोण ह्मणेल !

आतां सदर व्यवसायास परवानगी घेऊन कार्यारंभ करणाऱ्या नवीन पिढीची गोष्ट वेगळी कारण भानगडींचे दावे म्हणजे सरळ भाषेंत असत्य-मूलक त्यांजकडेस येणें शक्य नाहीं कारण अनुभविक व लायक व्यक्तीकडेसच जाणार. तेव्हां नवीन पिढीचा उद्योग म्हणजे प्रपंचास

साधन ह्मणून उद्योग करणाऱ्याप्रमाणें क्षम्य आहे व त्यांतही सदर व्यवसाय सत्यास धरून सरळ व निष्कपट बुद्धीनें करणारे खरोखरच स्तुत्य होत. किंबहुना हल्लींचे सत्यविरुद्ध असत्याचे कालांत अशा व्यक्तींची पूर्ण जरूरी व अवश्यकता आहे. त्याशिवाय अनभिज्ञ, सरळ व साधेपणानें व्यवहार करणाऱ्यास तरणोपाय राहणार नाहीं कारण हल्लींचे कायद्याचें तत्व ह्मणजे बहुतांशीं पुराव्यावर व दुसऱ्याकरितांसुद्धां सत्याची ओळख विसरून फिर्यादीची किंवा विरुद्ध पक्षाची--ज्याचा पक्ष असेल त्याची--भीड धरणाऱ्या साक्षीदारांचे मनोभूमिकेचा परिचय आज सर्वत्रांस आहेच. मग दुसऱ्याकरितां अल्प स्वार्थाकडे दृष्टी देऊन किंवा केवळ ओळख ह्मणूनच जे असत्याचें अवलंबन करण्यास मागें घेत नाहींत ते स्वतःचे हिताहितांत असत्य इमान कोर्टांत करितात यांत काय आश्चर्य? असो, याप्रमाणें आज आमची नैतिक सुधारणा झाली आहे हें मात्र कोणास नाकबूल करतां येणार नाहीं! व याच आमच्या आचरणाचा परिणाम दिवसेंदिवस कायद्याचें बंधन दृढ होत जाणें हा होय. व यास कांहीं तरी आळा--नियमन--बसावा या करितांच आह्मीं प्रस्तुत प्रसंगीं सुशिक्षित कायदे-पंडितांसंबंधीं दोन शद्ब लिहिले आहेत व पुढेंही ते लिहिण्याचे प्रसंगविशेषीं याच लेखांत प्रयोजन पडेल. तरी त्यांतील हेतु लक्षांत घेऊन ते याबद्दल विषाद मानणार नाहींत अशी आह्मीं उमेद ठेवतों. कारण सुशिक्षितांस न ह्मणावें तर ह्मणावें कोणास? कारण हा वर्ग विशेषत्वेंकरून समाज-चालक ह्मणूनच प्रसिद्ध आहे. असो,

या प्रमाणें उपरि निर्दिष्ट नवीन कायदे-पंडितांची समाजास विशेष अवश्यकता आहे, तसेंच हिंदु-धर्म-शास्त्र-दृष्ट्या उतारवयांत तरी निदान चतुर्थाश्रमांत प्रवेश करून किंवा न करितांही युक्तसंन्यासानें आज पर्यंत बरें वाईट केलल्या कर्मांचा शांतपणें विचार करून आवशिष्ट आयुष्यांत एकंदर आयुष्याचें सार्थक करण्याचें विचारानें ईश

चिंतनांत काल घालवावा असा या धर्माचा संप्रदाय आहे. परंतु घरून कोर्टांत सुलभ वाहनांत जाऊन विश्राम-गृहांतून न्यायासनासमोर मोठ्या प्रयासानें जाण्याइतकेंच शरीरांत सामर्थ्य अवशिष्ट राहिलें असून तेथील काम होईपर्यंत मर्यादावलंबनार्थ उभें राहणेंही मोठ्या प्रयासानेंच ज्यास होत आहे; तसेंच पक्षकारांचा उलट सुलट सवाल जबाब घेण्यांतही अर्थात नवीन मंडळींपेक्षां वेळ जास्त लागत असल्यामुळें कोर्टांनीं लवकर आटोपण्याबद्दल सूचना—नव्हे ! पण कान उघाडणीही केली तरी ती नम्रपणे ऐकून अशा स्थितींतही आपलें विहित कार्य पुढें चालविण्याची तरुणांप्रमाणें उमेद ठेवणाऱ्या कर्म-वीराची आम्हीं विशेष तारीफ करतों. कीं. " कोणी निंदा अथवा वंदा आमुचा स्वहिताचा धंदा " याप्रमाणें मानापमानाची तसेंच आपल्या पराधीन झालेल्या देहाचीही पर्वा न ठेवतां " प्रारब्धमुत्तमजनानपरित्यजति " या भर्तृहरीचे उक्तीप्रमाणें उत्तम पुरुषांत गणना करून घेऊं इच्छिणारांची धन्यताच समजली पाहिजे. परंतु वृद्ध भीष्माचार्य शरपंजरी ( स्वधर्म कृत्य आटोपून ) पडले त्या वेळेस त्यांनीं इतर व्यवसाय सोडून धर्मादिकांस नीतीचा, व्यवहाराचा व त्यांचें पुढील कार्यास उपयुक्त असा उपदेश करण्याचें श्रेय घेतलें त्याप्रमाणें आतां या वयोवृद्ध तसेंच ज्ञानवृद्धांनीं या आमच्या हीन स्थितींत पडलेल्या व दिवसें-दिवस अधोगतीस चाललेल्या शेतकरी वर्गाचे तसेंच व तितक्याच योग्यतेचे व महत्वाचे आणि समदुःखी असलेले मध्यम वर्गास आपलें ज्ञानाचा, द्रव्याचा नको पण वजनाचा योग्य उपयोग करून कांहीं उपाय योजनेचें अवलंबन केल्यास त्यांच्या आजपर्यंतच्या सत्कीर्तीत विशेष भर पडून समाजास आभारी केल्याचेंही श्रेय मिळणार आहे, हें आमचे प्रमाणें त्यांचेंही लक्ष्यांत येईल. व यामुळें उभय वर्गावरही त्यांचे महत् उपकार होतील यांत संशय नाहीं. आतां ही मदत कशी व कोणत्या दृष्टीनें करण्याची, यासंबंधीं पुढें खुलासा होणारच आहे. तूर्त ऐवढी सूचना करून

आह्मी मुख्य विषयाकडे वळतों.

या प्रमाणेंही सावकाराचें घरीं नित्य जाण्याची परिस्थिती हे शेतकऱ्यांचें रोगाचें दुसरें लक्षण होय.

आतां यापुढें विचार म्हणजे रोगाची उपाय योजना हा होय. रोगाचें निदान ठरवून अमुक रोग निश्चित केल्यावर वैद्य, त्या रोग्याची प्रकृती, बलाबल, देशकाल-परिस्थिती व गृहस्थिती लक्षांत घेऊन औषधाची योजना करतो. कारण एकाच रोगावर अनेक औषधें असतात. परंतु त्या अगोदर रोग कष्टसाध्य असल्यास पथ्यापथ्य विचार—म्हणजे रोगास पोषक असे आहार, विहार, व्यसनादि--बंद ठेवण्यास सक्त बजावतो; ( येथें वैद्य शद्बानें आयुर्वेद पद्धतीनें औषध योजना करणारा वैद्य समजावा कारण आधुनिक विदेशी औषधी विद्या संपादन करून औषध विक्रीचे, स्वतःचे चरितार्थाकरितां, दवाखाने चालवून विदेशी औषधसंग्रहास उदारआश्रय देणारे व त्यायोगें त्या मालाचे अप्रत्यक्ष दलाल बनलेले डॉक्टरांस जेथें रोगाचें निदान ठरवून औषध योजनेचा विचार करीत बसण्याचे फारसें कारणच पडत नाहीं. तेथें पथ्यापथ्य विचाराचें विशेष प्रयोजन पडत नाहीं; असें आंग्ल–विद्या–विशारद–वैद्य समजूं नये. ) कारण रोगाची शक्ती कमी करण्यास रोग्याचें खाद्य-पेयाचाच विचार मुख्य आहे. ( रसमूलानि रोगानि ) म्हणून युक्त अहार-पेयानें रोगाची शक्ती अंतस्थ क्षीण करून औषध सेवनानें त्याचें ( रोगाचें ) आयुष्य सत्वर नष्ट करण्याचें प्राचीन वैद्य-शास्त्राचें तत्व आहे. असो,

या प्रमाणें विचार करतां आमचे शेतकरी वर्गाचा दारिद्य रोग आज कष्टसाध्य या सदरांत येतो; ह्मणून पथ्यापथ्य विचार प्रथम महत्वाचा असलेमुळें त्याचा विचार करणें जरूर आहे; व त्या करितां या वर्गाची हल्ली परिस्थिती कशी होत आहे; हें पाहणें जरूर आहे.

म्हणजे त्यावरून वरील रोगास पोषक असें कोणतें आचरण--कर्म--त्यांजकडून होत आहे याचा बोध होईल.

मागें निरुपण केल्याप्रमाणें सावकारास पूर्वीचें देणें देऊन हिशोब करून नवीन कागद हंगाम अखेर होतो न होतो तोंच पुढील हंगामाची तयारी सुरूच असते; व सावकाराची दृष्टी व्याजावर तर असतेच! परंतु कपाशीचें हल्लींचें व्यापाराचें स्वरूप व धोरण पाहून त्यांचें आजकाल दलालीकडे विशेष लक्ष लागलें आहे; व त्या करितां व्याजांत थोडी कमी जास्त सूट व मुदलाची सवलत ते शेतकऱ्यांस देऊन त्यांस राजी ठेवण्याचा प्रयत्न करीत असतात. याप्रमाणें नवीन देवघेव सुरू होतांच सर्व कागद-पत्रांत दलालीची शर्त घातली जाते. " आमचा सर्व माल दुसरीकडे न देतां तुमचे अडतींत देऊं. न दिल्यास अमुक नुकसान देऊं. " परंतु एवढ्यावरच सावकाराचा विश्वास बसत नाहीं. कारण हाल्लींची प्रवृत्ती ह्मणजे नवीन एकादा उद्योग किंवा मिळकतीची वाव दिसली कीं, त्यावर सर्वांच्या उड्या पडूं लागतात. पूर्वी दलालीस फी वगैरे नव्हती परंतु हल्लीं पंचवीस रुपयांपर्यंत कमीजास्त फी प्रत्येकास पडते तरी इतकी गर्दी बाजारांत यांची होत आहे कीं, गिऱ्हाईक व मालधनी यांचे संख्येइतकीच जवळ जवळ त्यांतील पोटहिस्सेदार व नौकर धरून यांचीही होत आहे. यामुळें सावकारास आपणासच गाडी मिळेल अशी खात्री न राहणें साहजीकच आहे. ह्मणून हंगामापूर्वीच हंगामी नोकर पुरभय्ये ( हिंदुस्थानी ) ठेवून शेतकऱ्यांचे हालचालीवर बारकाईनें निगराणी ठेविली जाते. हंगामांत उजाडलें नाहीं तोंच रस्त्यावर किंवा कोठें कोठें चार चार पांच पांच मैलांवरील उताऱ्यावर जाऊन गाड्यांचा शोध केला जातो. व गुन्हेगाराचे मागें जसे शिपाई असतात त्या थाटांत सांपडलेल्या गाड्या बाजारांत आणतात. तेथें आल्यावर मालावरील मालधन्याची मालकी नष्ट होऊन ती दलालाची होते; व तो धनी चोरासारखा एका बाजूस

राहतो; व आपल्या दलालीनें पुष्ट होणाऱ्या, व्याजानें पोसलेल्या, दलाली व सावकारी या " द्विदल नात्यानें " त्याच शेतकऱ्यावर अधिकार गाजविणाऱ्या, आयत्या पिठावर रेघा ओढणाऱ्या व व्यापाऱ्यांशीं संगनमत करून हातरुमालाचे आच्छादनांत भाव ठरविणाऱ्या हितचिंतकाच्या चेष्टा निमूटपणें पहात राहतो. त्यास या उभयतांजवळही जाण्याची बंदी असते.

या प्रमाणें सर्व ठरल्यावर दलालांचा हुकुम होतांच त्यांचे हस्तक ठरीव जिनांत मालकास फक्त गाड्या हांकण्याकरितांच बसवून घेऊन जातात. तेथें दलालच माप देणार व व्यापारी घेणार. त्यांत मापारी-बोंडवाले वगैरे सर्व दलालाचेच; परंतु मालकाचे खर्चावर मजुरीनें लावलेले-मग त्यांचीही पोळी पिकून चार सहा महिन्यांत वर्षाचा कुटुंब खर्च ते सुखानें चालविण्यास समर्थ होतात. याप्रमाणें माप होतांच उरलासुरला कापुस कांहीं मापाऱ्यास, कांहीं बोंडवाल्यास. ह्मणजे कापुस मापतानां पडतो तो उचलून टाकणारास, कांहीं पाणीवाल्यास, जीनचे काम करणारे नौकर मजूर वगैरे करितां पाणी भरणारास व कांहीं दलालातर्फे त्यांचा जातभाई ब्राह्मण आल्यास त्यास बटवडा मापाऱ्या मार्फतच होऊन मालक दलालाच्या ऑफिसांत जातो. तेथें कपाशीचा हिशोब कारकुनाकडून होऊन रक्कम रोकड्याकडून ह्मणजे खजिनदाराकडून मिळते. तेव्हां शेतकऱ्यास (मालधन्यास) काय भाव मिळाला हा खुलासा होतो; परंतु तेथेंच इतर गाडीवाल्यास कमीजास्त भाव मिळाल्याचें त्याचे लक्षांत आल्यास व त्यानें कुरकुर केल्यास " तेरा माल खराब था-हलका था, कोशीस करके एक धर्डा कट्टीपर बेपारीकूं बडे मुष्कीलसे समजाया. तुम लोक बहोत अडाणी रहते, कितनीभी कोशिस किये तो तुमारे ध्यानमे नहीं आती. " वगैरे ठरीव मिष्ट भाषणानें त्याचें सांत्वन करून आपलें सावकारी खातें काढून त्यांतून त्याचे इच्छेप्रमाणें किंवा उभयतांचे सल्ल्यानें

कमजास्त होऊन उरलेले पैसे -- वचत राहिल्यास -- घेऊन घरीं जाण्यास त्यास परवानगी होते; व जातांजातां " आगले गाडीमें देखलेंगे " असें आश्वासन देऊन त्यास निरोप दिला जातो.

वरील सावकारवर्ग किंवा दलालवर्ग बहुतेक मारवाडीच असतो, प्रत्येक गाडीमागें तीन रुपयांपर्यंत दलाली, मापाई, धर्मादाय वगैरे मिळून प्रत्येक गाडीस खर्च येतो. गाडीचे मानानें--ह्मणजे खामगांवकडे गाडी मोठी असलेमुळें भरती जास्त, उमरावतीकडे गाडी लहान भरती कमी.--व याबद्दल शेतकऱ्याचा फायदा किंवा स्वतःस--दलालास--श्रम कितपत पडले हें वरील निरुपणावरून दिसून येत आहे. मग सकाळ संध्याकाळ वकिलीचें काम करणाऱ्या लोकांचे किंवा कारकून--शिरस्तेदार--यांचे श्रमाशीं तुलना करितां कमी श्रमांत जास्त फायदा कशांत होत आहे हें यावरून लक्षांत येईल. याशिवाय कोठें कोठें तर दलाल, सावकार व वेपारी हीं तिन्हीं नातीं एकाच व्यक्तीकडे असतात, मग तेथें शेतकऱ्याचे फायद्याचें माप कल्पनेनेंच केलें पाहिजे.

अशा रीतीनें पूर्वीं अज्ञान दशेंत साधे दस्तैवजाचें गहाण, गहाणाचें लहानगहाण किंवा खरेदी यारीतीनें व हल्लीं शेतकऱ्यांस कळूं लागल्यापासून तो व्यवहार कमी होऊन त्याऐवजीं हा राजरोष लुटीचा धंदा सुरू आहे, व आह्मीं इकडे पूर्ण डोळेझांक करीत आहों. जे लोक पूर्वीं नुसता एक लोटा, शिंकाळी, दोरी व धोतर इतक्या भांडवलावर येथें आले ते आज वऱ्हाडचे शेतीचे, व्यापाराचे मालक बनले आहेत. घरदार शेतीवाडी यांनीं संपन्न होऊन स्थाईक झाले आहेत एवढेंच नव्हें तर आमचे समाजाचे पुढारी होऊन आमचे हिताहिताचा व उपायांचा विचार करीत आहेत, हें अधुनिक सुधारणेंतील अनेक अश्चर्यांपैकींच एक कोणास वाटल्यास त्यांत काय नवल ! असो, अशा रीतीनें कोणी सावकारीनें, कोणी व्यापारानें,

कोणी दलालने वगैरे विविधरीतीनें येथील रहिवाशांच्या द्रव्याचें आकर्षण करीत आहेत. त्यांचें पाहून इतरही* परकीय प्रांतांतील रहिवाशी—भाटे, बोहरी, कच्छी, गुजराथी वगैरे—अठरापगड जातींचे लोक येथें येऊन हात मारीत आहेत; परंतु इतर लोक अजून स्थाइकत्वाची कल्पना ठेवून नाहींत परंतु तेही पुढें होतीलच असें अनुमान होतें.

अशा रीतीनें आजपर्यंत सतत प्रवाह चालल्यानें नद्या, विहीरी, तलावांचेंही पाणी जेथें आटतें तेथें येथील रहिवाशांची संपत्ती आटली ह्मणजे वरील लोकांच्या घरांत गेली यांत आश्चर्य

* रा. काळे वकील यांनीं " वऱ्हाडचा इतिहास " लिहिला त्यांत ते लिहितात.: " इंग्रजी कारकीर्दीपासून तों आतांपर्यंत दुसऱ्या प्रांतांतून निरनिराळ्या धंद्याच्या निमित्तानें लोक येऊन वऱ्हाडांत स्थाईक झाले आहेत. परप्रांतांतून येथें आलेल्या लोकांची संख्या फार मोठी आहे. शेती व सावकारी खेरीज करून बाकी सर्व धंदे परप्रांतांतील लोकांचे हातीं आहेत. सरकारी लहान मोठ्या कचेऱ्या, वकीली, डॉक्टरी वगैरे पांढरपेशा धंद्यांत मुंबई-पुण्याकडील महाराष्ट्रीय लोक, सावकारी व व्यापाराकरितां नगर, सोलापूर कडील गरीब व दुष्काळग्रस्त लोक व उत्तरहिंदुस्थानांतील पुरभय्ये, मारवाडी व हिंदुस्तानी सुतार व इतर धंदेवाले यांचा वऱ्हाडांत एकसारखा ओघ चालू आहे. वऱ्हाडांत लोक मुख्यतः शेतकी व वतनदारीचे धंद्यावर अवलंबून आहेत. त्यांच्यामध्यें उत्साह व नवीन धंदे करण्याची व घर सोडून जाण्याची धमक दिसून येत नाहीं. प्रांत खाऊनपिऊन सुखी असल्यामुळें आळस फार व महत्वाकांक्षा कमी हा प्रकार सर्वत्र दृष्टीस पडतो. " ( वऱ्हाडचा इतिहास भाग १ पान ५ )

वरील अनुकरणांत जरी कांहीं बाबतींत आमचा मतभेद आहे तरी पर प्रांतांतून अनेक लोक येऊन ते येथील उद्योग-धंदे—सुतारी, सोनारी, हमाली, न्हावीपणा, चर्मकार वगैरे किरकोळ धंदेसुद्धां आपले हातीं घेत आहेत. या शिवाय मोठ्या प्रमाणावरील सावकारी, व्यापार, किराणा, स्टेशनरी, लोखंडी सामान वगैरेही सर्व त्यांचेच हातीं गेले आहेत; येवढेंच दाखविण्याचा आमचा हेतू आहे. मात्र लोकांत उत्साह व घर सोडून जाण्याची धमक नाहीं, आळस फार, महत्वाकांक्षा कमी वगैरे बाबतींत आमचा मतभेद आहे.

दा. क्र. २८७४

काय! व जो देश " वऱ्हाड सुनेकी कुऱ्हाड " म्हणून जे पूर्वी म्हणत होते तेच हल्लीं " वराडमें अब कुच जान नहीं रही " म्हणून म्हणतात. पण राहील कशी? दुसरा एखादा प्रांत असता तर तो आतांपर्यंत मारवाड किंवा नगर झाला असता, परंतु एक शेती अजून फलोन्मुख असल्यामुळें वऱ्हाड म्हणून नांव तरी अद्याप कायम आहे. बाकी कांहीं वर्षांनीं हें नांवही जाऊन तो येथील मूळचे रहिवाशास मारवाडच होईल अशीं चिन्हें दिसत आहेत, कारण ज्या कपाशीनें आज हजारों लोक संपन्न होत आहेत तीच कपाशी प्रत्यक्ष कुऱ्हाड होऊन आमचे प्राण हरण करण्यास पहात आहे. परंतु हा काय त्या वस्तूचा दोष म्हणावा कीं त्याचा उपयोग करणाऱ्याचा? याचा शेतकरी लोकांनींच विचार करावा. वास्तविक हें त्यांचे अज्ञान म्हणावें कीं त्यांचा सरळ अनुपद्रवी व भोळसर किंवा सात्विक स्वभाव कीं ज्याचा फायदा इतर लोक घेऊन त्यांस नागवून राहिले आहेत म्हणून म्हणावें. वास्तविक हेंच खरें. जेथें सर्वच व्यवहार सरळ व सचोटीचा असतो तेथें तो उभयतांसही हितकारक व फायदेशीर होतो. परंतु जेथें एकाचा सरळ व निरुपद्रवी स्वभाव व दुसऱ्याचा त्याच्या उलट म्हणजे स्वार्थी व परस्वापहरणाचा असतो तेथें दुसऱ्यासच त्याचा फायदा मिळतो. हा व्यवहारांतील हल्लींचे कालांतील न्यायच आहे. हेंच तत्व एकंदर हिंदुस्थानचे शोचनीय स्थितीसही लागू पडतें. आज जी हिंदुस्थानची स्थिती झाली आहे त्याचें कारण तंतोतंत हेंच होय. याचा जो विचार करील त्यास हें सहज कळून येईल.

वरील विवेचनावरून आमचे सावकार –धनिक–वर्गास विषाद वाटण्याचा संभव आहे परंतु तसें वाटण्याचें कारण नाहीं हें मागेंही सांगितलेंच आहे व पुन्हाही सांगतों कीं कोणाचेही मनांत कोणाविषयींही असंतोष उत्पन्न व्हावा हा आमचा केव्हांही उद्देश नाहीं. किंबहुना

असलेले मतभेद, पक्षभेद, आपसांतील द्वेषभाव व कलह तसेंच मत्सर, दुरभिमान वगैरे समज दूर करून परस्परांत निष्कपट प्रेमभाव उत्पन्न होऊन तो वृद्धिंगत व्हावा हाच या लेखाचा मुख्य उद्देश आहे. कारण जगाचें अस्तित्व व व्यवहार केवळ निष्कपट प्रेम, सरळ आचार, स्वार्थाचा आभाव व परस्पर सहकारिता म्हणजे ऐक्यता यांवरच अवलंबून आहे. व जेथें हीं तत्वें पूर्णपणें समाजांत नांदतात. तेथेंच सुख, शांति, स्वातंत्र्य व संपन्नता अखंड वास करितात; याचा अनुभव हल्लींचे वैभवारूढ राष्ट्रांत त्यांचे परस्पर व्यवहारांत दिसून येईल. आतां वरील हेतू करितांच ह्मणजे बीज पेरण्यापूर्वी जशी प्रथम भूमीची शुद्धी — नांगरणें, खोड, कुंवा — काढून साफ करणें वगैरे अवश्यक आहे. तद्वत आज स्वराज्याकरितां जी सर्वत्र चळवळ सुरूं आहे तिची शीघ्र प्राप्ती होण्यास ऐक्यता — संघटना—यांची अत्यंत जरूरी आहे व त्याप्रमाणें पुढाऱ्यांचे उद्योगही सुरूं आहेत, परंतु ते परस्परांत प्रेम उत्पन्न झाल्याशिवाय होणें केव्हांही शक्य नसल्यामुळें तें जनतेचे अंतःकरणांत प्रथम उत्पन्न करणें जरूर आहे व त्याकरितां तत्प्रतिबंधक असे व्यवहार — विरुद्ध आचार, — ह्मणजे स्वार्थपरायणता, द्वेषभाव, मत्सरादि यांचें निर्मूलन होणें इष्ट आहे म्हणजे जनतेचीं मनोभूमी प्रथम शुद्ध होणें अवश्यक आहे. त्याकरितां थोडेसें कटू भाषण किंवा आचरणाविरुद्ध टीकात्मक दोन शब्द लिहिणें भाग पडल्यामुळें तसें करावे लागत परंतु त्यांत उद्देश सदिच्छात्मकच असलेमुळें आमचे शब्द कोणाचाही तसा गैरसमज उत्पन्न करणार नाहींत अशी आम्हांस उमेद आहे. आज समाजांत विरुद्ध गुण किंवा मनोवृत्ति यांचें प्राबल्य वाढत असल्याचें दिसत आहे तें स्पष्ट दाखविणें म्हणजे कोणाचें अंतःकरण दुखविण्याचा प्रयत्न करणें नाहीं असें आम्हांस वाटतें. दुसरें सर्वच धनिकवर्ग म्हणजे आज वरील वर्गांत येतो असें नाहीं.

येवढेंच नव्हे तर याच वर्गावर आज वऱ्हाडचें जीवन आहे हें आम्हीं प्रांजलपणें कबूल करतों. आज वऱ्हाडची आर्थिक स्थिती जो लक्षपूर्वक निरीक्षण करील त्यास वऱ्हाडचे स्थाईक रहिवाशांत धनिक ह्मणतां येईल अशीं कुटुंबें फारच थोडीं निघतील. व जीं आहेत तीं सर्वच या देवघेवीचे धंद्यांत आपलें भांडवल घालतात असें नाहीं उलट ते स्वतःही त्याचा उपयोग करून घेत नाहींत व दुसऱ्यांसही ता मोबदला घेऊनसुद्धां होऊं देत नाहींत, ह्मणजे स्वार्थ किंवा परमार्थ कांहींच घडत नाहीं. व अशा संपत्तीची भर्तृहरींचे उक्तीप्रमाणें अखेर " यो न ददाति न भुंक्ते तस्य तृतियागति भवति " त्यांची कल्पना ह्मणजे स्वतः उपभोग घ्यावा तर ती संपण्याची भिती, दुसऱ्यास द्यावी तर बुडण्याची भिती ह्मणून ज्या भूमींतून ती उत्पन्न होते त्याच मूळ घरीं तिची सुरक्षितता कल्पून ती ठेवितात व आपले देहावसानानंतरसुद्धां कोणास तिचा उपयोग न व्हावा ह्मणून समंध किंवा विष्णुवाहनाचें भक्ष्य होऊन रक्षण करितात, म्हणजे या धन लोभाची कमाल मर्यादाच झाली. एका कवीनें तर अशांचें विनोदात्मक परमावधीचें निरुपण केलें आहे " ........ स्वाम् भार्याम् नाभिगच्छति यस्यां जायते पुत्रः समेवित्तं हरेदिति. " असो,

अशा परिस्थितींत आमचे शेतकरी वर्गास उदार हातानें जरी कडक व्याजानें व शर्तीनें (परंतु ही वस्तुस्थिती नाण्याची टंचाई व दुर्मिळताच दर्शविते ) तरी पण नाणें देणारा हाच वर्ग होय. आज सर्वांस अत्यंत प्रिय व जगाचें सर्व व्यवहार–सूत्र–चालक असें द्रव्य स्वतः काढून देण्यास मागें न घेणारे व्यक्तीनें तो परत घेताना तरी दुसऱ्याची कीव कां करावी हा एक प्रश्नच आहे. नेताना जी सद्बुद्धी असते तीच जर पुढें कायम राहिली तर उभयतांत अखंड सुरळीत व्यवहार चालण्यास कोणती अडचण पडणार

आहे ? परंतु आणलेला पैसा संपतांच व परत करण्याचें योजिलेलें साधन अपुरें पडतांच नाइलाजास्तव कित्येकांस अडचण येणें साहजीक आहे परंतु ती धनिक लोक न जाणण्याइतके निर्घृण नाहींत अशी आमची खात्री आहे. परंतु कायद्याचा फायदा घेऊन सावकारास आणलेला पैसा परत न करण्याचे कृतघ्न बुद्धीनें स्वत: दिलेला लेख नाकबूल करणें, प्रत्यक्ष रजिष्टर कचेरींत भरणा घेऊन नाकबूल करणें व खोटा पुरावा आणून धनकोस बुडविण्याची इच्छा धरणें अशा व्यक्तींची मानवी बुद्धी तरी कशी ह्मणावी व आपल्या अल्प फायद्याकरितां आपले बुद्धीची देवघेव सत्याकडे पाठ फिरवून पक्षकाराचा दावा जिंकणेंचें ध्येय ठेऊन सद्बुद्धीचे जेष्ठ भगिनीचा पक्ष धरून यशांतच कृतकृत्यता मानणारे सुशिक्षितांचे प्रवृत्तीस काय सुधारणा ह्मणावी ! असेच असेल तर शिक्षणाचा परिणाम व कायद्याचा हेतू यांनीं हाच व्यवहार श्रेष्ठ ठरविला ह्मणून ह्मणावें लागेल. एका कवीनें ह्मटल्याप्रमाणें म्हणजे " अयुक्तं स्वामिनोयुक्तं-युक्तं नीचस्य दूषणं " याप्रमाणें हाच सिद्धांत ठरवावा लागेल परंतु असें झाल्यावर नीतीचें व सत्याचें उच्चाटन होऊन सर्वच व्यवहाराचें पारडें बदलावें लागेल परंतु आज सर्वत्र या विचाराचें साम्राज्य नाहीं आपले बुद्धीचा, सरस्वती देवीची दोड दोन तपें आराधना करून तिला प्रसन्न करून घेतल्याचें हेंच फळ न समजणारे अधुनिक सुशिक्षित या वर्गांत हल्लीं विद्यमान आहेत व निपजतही आहेत केवळ उदरंभरण—स्वार्थ व ऐहिक भोगच—ज्यांचे ध्येयाची दिशा किंवा इतिकर्तव्यता नसून आज जगाकडे दृष्टी देणारे विचारी दुसऱ्यास आपले बुद्धीचा, ज्ञानाचा, कायद्याचा लाभ व परिचय करून देऊन या चढाओढीच्या कालांत—या पारतंत्र्यस्थितींत--दिवसेंदिवस गढून चाललेले जनतेस पाहून ज्यांचें अंत:करण विदीर्ण होऊन जे या धंद्यासच काय परंतु आपल्या सर्वस्वावर तुळशीपत्र ठेवून देशकार्यास परानुग्रहकांक्षेनें थंडी, ऊन, वारा आणि पाऊस यांची पर्वा नकरितां

[stamp]

किंबहुना कारागृहवासही सोसण्यास स्वेच्छेनें उदित झालें आहेत असे हीं नररत्नें ही भरत-भूमी आज प्रसवत आहे. हें ऐकून ठरल्यानें काय जगास दिसणार नाहीं? येवढेंच नव्हें तर एकानें ह्मटल्याप्रमाणें "जसा काल तसे संत" याप्रमाणें आज संतच कायदे पंडितांचे रूपानें विराजमान होत आहेत–समाजांत प्रकाशत आहेत.–स्वतःचे कुटुंबाची पर्वा न करितां केवळ विश्वकुटुंबाचें ध्येय ठरवून त्या प्रीत्यर्थ त्यांनीं आपलें तन-मन-धन हें अर्पण केलें आहे. त्यांना संत नव्हे तर काय प्रापंचिक मनुष्य म्हणतां येईल? व त्यांचेच निष्काम कर्माचरणाचें, आश्रांत श्रमाचें, दूर दृष्टीचें व कायद्याचे धारणाचें फल आज स्वराज्याचा पाया–आरंभ–किंवा निशाण एक शतकानंतर पुन्हां स्थापित झालें आहे व उभारलें आहे. परंतु दुःखाची गोष्ट ही कीं, आज आम्हांस त्याची किंमत वाटत नाहीं. आज त्या सद्बुद्धीची जाणीव आमच्यांत नाहीं. आज त्या धैर्याची, मनोनिग्रहाची व विचाराची छायाही आमचे बुद्धिदर्पणांत पडत नाहीं. इतकी ती स्वार्थपरायणतेचे मलानें लिप्त झाली आहे. येवढेंच नव्हें तर आमचें कर्म–आमचे–उद्योग त्यांचे ध्येयास प्रतिबंधक होत आहेत, किंबहुना "स्वराज्याची मुदत किती बाकी आहे?" ह्मणून आपसांत हास्य-विनोदात्मक संभाषणानें आम्हीं आपले करमणुकीचा विषय करीत आहोंत. अशा व्यक्तींना पुरुष ही संज्ञा देणें म्हणजे उपनांवाचे व्यवहारांतील उपयोगाप्रमाणेंच होय. कारण ज्यांना आपलें हिताहित समजत नाहीं, ज्यांना आपले हितशत्रूंची ओळख नाहीं, व ज्यांना हितचिंतकांची जाणीव नाहीं, अशांस या मानस क्षेत्रांत विहार करण्याची लायकी अद्याप येण्याची आहे; असेंच म्हणणें भाग होतें. व तसेंच जे आज पाश्चात्य व विद्वान अधिकारी वर्ग म्हणत आहेत तेंच सत्य म्हणावें लागत आहे. ( भागवतांत सर्व प्राणिमात्रांस आवश्यक असे सार्ववर्णिक गुण सांगितले आहेत आणि ते ज्यांत नाहींत ते उच्च वर्णाचे असले तरी

अधम समजावे असें सांगितलें आहे.) *

अशा प्रकारचे अपात्र स्थितींत स्वराज्यास वेळ लागणें साहजीकच आहे हें त्यांस उत्तर होय. नाहींतर ज्या भरतभूचें बाळकडू ह्मणजे स्वातंत्र्य, जिचें शिक्षण स्वातंत्र्य, जिचा धर्म ह्मणजे स्वातंत्र्य, जिचा इतिहास स्वातंत्र्य ती आज इतके दिवस परावलंबी स्थितींत काळ घालवील हें शक्यच नाहीं. मानवी-बुद्धी व सदयता यांस बाजूला सारून ज्यांनीं शस्त्राचे धोरवर प्रजेस शहर व आरण्य सारखें करून सोडलें होतें त्या यवनबादशाहींतसुद्धां स्वराज्य प्राप्तीस इतका वेळ लागला नाहीं त्यावेळची परिस्थिती कोठें व आजची कोठें ! जमीन अस्मानचें अंतर, कारण शिव-छत्रपतीचे स्वराज्यारंभाचे पूर्वी साधुसंतांनीं त्यावेळचे जनतेची मनोभूमिका शुद्ध करून ठेविली होती. व त्यावर शिव-छत्रपतीचें स्वराज्य-महत्वाकांक्षेचें-सिंचन होतांच स्वराज्य बीजारोपण होऊन तें तात्काळ फलोन्मुख झालें.

---

* श्लोकींचे अष्टगुण । त्यागावया नमनी जयाचें मन । तोही अंत्यजा समान । हें प्रकृति लक्षण अति निंद्य ॥ १ ॥ ज्यासी स्नान संध्या शौचाचार । स्वकर्म नावडे साचार । अंतरीं विकल्प अपार । जैसा विखार काळीया ॥ २ ॥ कनक फळ नामें गोमटें । आंत माजिरे बाहेर काटे । तैसें सबाह्य ओखटें । अशौच मोठें या नांव ॥ ३ ॥ असमता जे प्रकृती पाशीं । अखंड वसे अहर्निशीं । मातापितादि गुरुशीं । झकवणें त्यांसी मिथ्यत्वें ॥ ४ ॥ या परिगा अधर्मता । परद्रव्य यावया हाता । आसक्ति ज्याचिया चित्ता । जाण तत्वता ते चोरी ॥ ५ ॥ स्वधर्म-कर्म-स्वभावता । विश्वास नाहीं ज्याचिया चित्ता । वेदशास्त्रा पुरुषार्था । मिथ्या सर्व जो मानी ॥ ६ ॥ कार्येविण कोरडी कळी । संबंधेविण वृथा सळीं । अखंड करी दात-कसाळी । ते अंत्यजाची निजवृत्ती॥ ७ ॥ जया सर्वदा विरोध पोटीं । वरी गोड मैंद गोठीं । भितरी द्वेषाचा भडका उठी । जो क्रूर दृष्टी सर्वदा ॥ ८ ॥ स्वार्थेविण परकार्य नाशी । शुष्क विग्रही म्हाणिजे त्यासी । उद्धवा ऐशा प्रकृती ज्यासी । अंत्यज त्यांशी पैं भीति ॥ ९ ॥ म्यां सांगितले आठी गुण । हे ज्याचें प्रकृतीचें लक्षण । तो होकां भलता वर्ण । परी अंत्यजपण त्यामाजी ॥ १० ॥ आवगुण सांगितलें समस्त । ॥ एक एक नरकदानी विख्यात । मा आठही मिळती जेथ उगवू तेथें मग कैचा ॥ ११ ॥ ( नाथ भागवत अध्याय १७ श्लोक २० ओंवी २०० )

त्या वेळचे स्थिती इतकीसुद्धां बिकट परिस्थिती आज नाहीं. आज शस्त्रास्त्राचेंसुद्धां काम नाहीं. फक्त ऐक्याचें काम आहे. परंतु तेंसुद्धां आमच्यानें होत नाहीं. कारण आमचें हिताहित आपसांतील कलहांत, द्वेषांत, स्वार्थांत इतकें निगडित झालें आहे कीं, आह्मांस त्यांतून आमचें मन काढून या पुण्यक्षेत्रांत विहार करून उज्वल वातावरणांत स्वैर संचार करूं देण्यास फुरसतच मिळत नाहीं.

वास्तविक पाहतां जें राजछत्र आज विद्यमान आहे तें आपण होऊन स्वराज्य देण्यास तयार आहे असें विदेशी राजछत्राचें उदार धोरण इतिहासांत हें पहिलेंच ह्मणण्यास हरकत नाहीं. परंतु उलट आह्मीं त्यानांच दूषण देत आहों. तेव्हां त्यांचे शांतीची, त्यांचे परहित तत्परतेची व उदारतेची तारीफ केली तितकी थोडीच होईल.

अहो प्रत्यक्ष पितासुद्धां तिजोरीची किल्ली पुत्रास वयांत आल्यावरही देत नाहीं. त्याचें आचरण, त्याची बुद्धी, त्याची प्रवृत्ती, त्याची संगती, व त्याचे जबाबदारीची योग्यता कांहींकाल पाहिल्याशिवाय त्याचेवर विश्वास ठेवीत नाहीं. मग हें स्वराज्य देणें आहे. पात्रापात्र विचार न करितां दान देणारा सुद्धां दोषी होतो. कारण ज्यास दान दिलें त्यानें त्याचा अफू, गांजा, दारू किंवा इतर दुर्व्यसनांत दुरुपयोग केल्यास तें देणारास फायदा नाहींच परंतु घेणाराची क्षुधा-शांतीही न होतां उलट पोटांत अग्नी भडकतो ( आग पडते ) मग " इदंच नास्ति परंच न लभ्यते " असा व्यवहार दूरदृष्टी पुरुष चुकूनसुद्धां करीत नाहीं. आज स्वराज्य देऊन इतके दिवस पुत्रवत् पालन केलेले प्रजेस अपात्रतेमुळें आपसांतील दुही, वैमनस्य, द्वेषभाव, स्वार्थपरायणता यांचे साम्राज्यांत यादवी माजून त्रयस्थ राष्ट्रांस ( कारण हिंदुस्थान कोणास नको आहे ) अनायासें त्याचा फायदा करून देणें हें प्रस्तुतचे राजछत्रास केव्हांही इष्ट नाहीं व योग्य नाहीं. कारण एकतर आज

पालन केलेले प्रजेस असें मध्येंच सोडणें ह्मणजे प्रवासांतील बरोबर असलेले सोबत्यास मध्येंच रस्त्यांत सोडल्यासारखें आहे. शिवाय अशा रीतीचे कृत्यानें इतर राष्ट्रेंही त्यास दोष देतील. किंबहुना आह्मींच उद्यां दूषण देण्यास तयार होऊं कीं, " स्वतःचे योग्यायोग्यतेची जाणीव ज्याची त्यास होणें शक्य नसते. प्रत्येकास आपण लायकच आहों असें वाटतें. परकीय देशाकडे पाहून ही जिज्ञासा उत्पन्न होणें साहजीकच आहे; ह्मणून राज्यकर्त्यांनीं केवळ आग्रहास्तव इष्टानिष्ट विचार न करितां सर्वस्व अर्पण करणें ठीक नव्हतें; कारण त्याचा आह्मांस कांहींच उपयोग झाला नाहीं. उलट आजपर्यंत आमचे एकजीव झालेल्या राष्ट्रपालकास आह्मीं मुकलों " ह्मणून पश्चात्ताप होणार. या करितां सूज्ञाचें काम पात्रता–योग्यता–आणण्याचेच आहे. जसा प्राणीमात्रास कर्माचाच ह्मणजे कर्म करण्याचाच अधिकार आहे, फळाचा नाहीं, ह्मणजे कर्माचा परिणामच फलरूप आहे. फळाची वेगळी अपेक्षा करावी लागत नाहीं. तसेंच स्वराज्य हें ज्या ऐक्यतेचें फळ आहे, तिची पात्रता आणणें हेंच कर्म करण्याचा सर्वांस अधिकार आहे–सर्वांचें कर्तव्य आहे–निसर्गाचा कायदाही हेंच शिक्षण देत आहे. वृक्षलतादिकांस फळ-पुष्पाची अपेक्षा करण्याचें प्रयोजन नसून वसंताचे आगमनाचीच मार्गप्रतिक्षा करणेंची असते कारण वसंताचें आगमन हीच पत्र-पुष्प-फळाची प्राप्ती. तसेंच स्त्रियांस संततीची उत्कंठा ठेवण्याचें कारण नाहीं. फक्त वयांत येण्याचीच मार्गप्रतिक्षा करावी लागते. मुलास वडिलांचे प्रयाणापर्यंत तिजोरीची किल्ली प्राप्त होण्यास थांबण्याचें कारण नसतें, फक्त योग्यता आणण्याचीच जरूरी असते. पित्याची त्याचे सर्व आचरणावर सूक्ष्म दृष्टी असते व त्याची खात्री होतांच सर्वस्व तो त्यास न मागतां देतो. किंबहुना तो त्या काळाची वाटच पाहत असतो व मुलावर सर्व जबाबदारी टाकून मोकळा होण्यास पाहत असतो. कारण त्याचें उतारवय झालें असतें आतां त्रास होत नसतो.

त्याचप्रमाणें आमचे सर्व व्यवहारावर आमचे राज्यकर्त्यांची सर्व बाजूनें पूर्ण दृष्टी असून कलियुगाचे आयुर्मर्यादेचाही काल व्यतित झाल्यामुळें जे स्वभावताच इतक्या दुरून हें राज्यशकट चालविण्यास वास्तविक त्रासले असले पाहिजेत. कारण स्वदेशांतील व इतर परकीय देशांतील अनेक ठिकाणीं असलेले लहान मोठें स्थानावर विद्यमान असलेले साम्राज्यास काय थोडा त्रास पडत असेल ? याची कल्पनाच केली पाहिजे. तेव्हां त्यासही एक शतकावर आश्रांत श्रम झाल्यामुळें त्रास होणें साहजीकच आहे व त्याचें द्योतकच मँटेग्यू स्कीमची सुरुवात आहे. व आजपर्यंत त्यांनीं केलेल्या उपकाराची फेड--त्यांनां विश्रांति देणें--हेंही पर्यायानें आपलें कर्तव्यच ठरत आहे. ह्मणून त्यांचे इच्छेप्रमाणें सर्व धर्मांचे, पक्षाचे, व जातींचे लोकानीं राष्ट्रीय ऐक्य शक्य तितकें लवकर घडवून आणण्यास मदत करावी हें उचित आहे. परंतु या करितां जाती मोडणें--धर्माचे बाबतींत क्रांती घडविण्याचे प्रयत्न करणें--किंवा सर्व एकमय करण्याची खटपट करणें हे प्रयत्न सोडून दिले पाहिजेत. कारण धर्मभावना व मनोभावना यांचे विरुद्ध चळवळ करूं लागल्यास कार्य लांबणीवर पडणार, म्हणून आहे तें सर्व कायम ठेवून सध्यांचे परिस्थितींतच ऐक्यता घडवून आणणें जरूर आहे. व त्या करितां परस्परांतील गैरसमज--उच्च नीच भावना--यांनाच फक्त दूर करून स्वार्थबुद्धी नष्ट करून सर्वांत प्रेमाची वृद्धी करणें हेंच जरूर आहे. म्हणजे मनोभूमी शुद्ध करण्याची खटपट झाली पाहिजे. कारण विविधता ही जगाचें अस्तित्वापासूनच असून ती जगाचे अखेरपावेतों राहणारच. कारण जग ह्मणजेच विविधता. स्वत:चेंच शरीराची कल्पना केल्यास तें एकच दिसतें, परंतु अनेक इंद्रियांनीं तें युक्त आहे. येवढेंच नव्हें तर एकाचें काम दुसऱ्यास करतां येत नाहीं. ह्मणून जें ज्याचें कर्तव्य तेंच त्यास करूं देऊन देहरूपीं रथाचें काम चालविणें भाग आहे. तद्वत या राष्ट्ररूपीं रथांत विविध धर्म--पक्ष जाती--

मतभेद आहेत, व ते राहणारच. फक्त एका विशिष्ट कार्याकरितां त्यांनीं ऐक्याची भावना ठेवून परस्पर सहाय कसें करावें हेंच त्यांस शिकवून आपलें कार्यास सर्वांचा उपयोग करून घेणें इष्ट आहे. व प्रस्तुत लेखांत शेवटीं ज्या उपाययोजनेचा कार्यक्रम दिला आहे त्याचा हाच उद्देश आहे हें ध्यानीं येईल.

ह्मणून या विविधपणांत किंवा जगवैचित्र्यांतच समदृष्टीची, निष्कपट प्रेमाची, सद्बुद्धीची, स्वार्थत्यागाची व सरळ व्यवहाराची भावना जागृत करणें हाच ऐक्यतेचा मुख्य उपाय आहे. हेंच राष्ट्रीय शिक्षण होय. हेंच सक्तीचें शिक्षण होय. याच शिक्षणानें मुख्य पात्रापात्रतेचा प्रश्न सुटणार आहे. हें पुढील भविष्य जाणूनच मागें निरुपण केल्याप्रमाणें साधु-संतांनीं जी भूमी शुद्ध करून ठेविली होती म्हणून सांगितलें ती हीच कीं, पूर्वीचे ऋषींनीं कलिकालाचें भविष्य जाणून " संघे शक्तिः कलौयुगे " म्हणून सिद्धांत ठरवून दिला. त्याचाच अनुवाद किंवा त्यास मूर्त स्वरूप देण्याचा तुकारामादि सत्पुरुषांनीं धर्मभावनेनें आचार प्रधान अशा अभंग—कधींही न बदलणारा बोध—वाणीनें सगुण उपासनेचे द्वारा समाज घटना—एका कार्याकरितां विशिष्ट प्रसंगीं एकत्र होणें, कार्य करणें व प्रेमयुक्त परस्परांशीं वागण्याचा वारकरी पंथ—संस्था—स्थापित केली. परंतु हल्लीं धर्माचे दृष्टीनेंही परस्पर विरुद्ध धर्मानुयायांचें अस्तित्व येथें असलेमुळें याच धर्मभावनेनुरूप राष्ट्रभावना जागृत करून त्या करितां राष्ट्रसंस्था, या तत्वांचें आचरण व्यवहारांत आणण्यास लावणारे हितोपदेशक—प्रचारक—द्वारा खेड्यापाड्यांतून प्रारंभ करून शाखा उपशाखांचे रूपानें प्रत्यक्ष कार्यकारी अशा स्थापन करणें इष्ट आहे. हे प्रचारक हल्लीं नौकरी न मिळाल्यामुळें बेकार फिरणारे लोकांतून सुशिक्षित, लायक, मेहनती व विश्वासुक असे निवडून घेतल्यास व नौकरींतच कालक्षेप करणाऱ्या मध्यम वर्गांतील लोकांपुढें राष्ट्रसेवेचें ध्येय ठेविल्यास त्यांचे उपजीविकेचाही प्रश्न सुटेल.

आतांपर्यंत शेतकरी वर्ग हा सावकारी वर्गास अखंड पोषक होऊन कर्जाचें चक्रांत स्वतःस सतत कसा अडकवून घेत आहे याचें संक्षेपतः दिग्दर्शन केलें. आतां हीच स्थिती बिकट होण्यास तोच शेतकरी वर्ग कसा व कोणते कारणांनीं प्रवृत्त होत आहे हें पाहूं.

कोणतेही व्यक्तीची प्रापंचिक आर्थिक स्थिती बिघडण्यास प्रथमतः त्याचा उत्पन्नापेक्षां खर्च जास्त होणें ही गोष्ट विशेषतः कारण होत असते. ह्मणजे प्रपंचाचें तत्व हेंच ठरतें कीं, प्रत्येक मनुष्यानें आपले प्राप्तीचा विचार करूनच खर्चाचें मान व प्रमाण ठरविणें उक्त आहे. परंतु हल्लींचे संस्कृतीचे कालांत सुधारणेचे परिणाम समाजावर होत आहेत; व त्यामुळें बाह्य वस्तूंचा, चैनीचा व परानुकरणाचा परिणाम साहजीकच होऊन तिकडे प्राणिमात्राची प्रवृत्ती होत आहे. मग सिनेमा, नाटकें, हार्मोनियम, फोनोग्राफ, सायकल, मोटार वगैरेचा उपभोग व खरेदी यांजकडेस प्रवृत्ती होऊन त्या विषयोपभोगाचे भरात उत्पन्न व खर्चाचा सुमार पाहणें दुर्लभ होणें साहजीकच आहे. व याप्रमाणें मनाची एकदां प्रवृत्ती अनावर झाली व बाहेर मनोहर वस्तूंचें प्रदर्शन दृष्टिगोचर होऊं लागलें ह्मणजे प्रवाहांत पडलेले मनुष्यास पोहतां येत नसल्यामुळें त्या ओघानेच वाहत जाणें त्यांस भाग पडतें, त्याच प्रमाणें प्रसंगविशेषीं कर्ज करूनही विषयोपभोगाची प्रवृत्ती होऊं लागते. ह्मणजे अशा रीतीनें हें एक व्यसनच बनून लहान मुलांचे लाड व कौतुक पुरविण्यापासून तों मोठ्याच्या वाढत्या गरजा भागविण्यापर्यंत त्याची मजल जाते. तेथें मग आपपर भाव विसरून त्यायोगें संपत्तीचा ओघ कोणीकडे जात आहे व त्याचा परिणाम देशाचे सांपत्तिक स्थितीवर व त्यामुळेंच व्यक्तिमात्राचे आर्थिक स्थितीवर काय होईल ? याचा विचार करीत बसण्याचें मोहांध झालेल्या दृष्टीस न दिसल्यामुळें महत्वच बुद्धीस वाटत नाहीं. ही साधारण अज्ञान

शेतकरी वर्गाचीच गोष्ट नाहीं. कारण ते जाणून बुजून अशिक्षितच परंतु सुशिक्षितांतही हीच प्रवृत्ती. तेथें साधी गोष्ट–मुलांमुलींचीं खेळणीं-- व बिस्कीटें, पेपरमिंट सारखे खाऊचे पदार्थ, परंतु यांत किती द्रव्य परकीयांचे घरांत जातें व त्याबद्दल मोबदला किंवा उपयोग काय होतो याची कल्पनासुद्धां आह्मांस नाहीं. वास्तविक देशी वस्तु खेळाच्या कांहीं होतात परंतु त्या ओबडधोबड--मोहक व कल्पना-तरंग-परिपूर्ण नसतात. परंतु तेवढ्यावरच भागविण्याचें नसलें तर तदनुरूप वस्तु बनविण्याची इच्छा उत्पन्न न होतां ह्मणजे परकीय सुधारणेचा फायदा न घेतां त्यांस उदार आश्रय देऊन स्वतःचा खिसा रिकामा करण्याची ही प्रापंचिक बुद्धी आज सर्वत्र दिसत आहे. या शिवाय खाद्य, पेय, स्टेशनरी, कापड, लोखंडी वस्तु, चर्म, कांच सामान, जर्मनसिल्व्हरचें सामान वगैरे अनंत बाबी व त्यांतील प्रत्येकांच्या अनंत वस्तू यांची नुसती यादी तयार केली तर एक स्वतंत्र पुस्तकच तयार होईल. वास्तविक यांत अत्यंत जरूरीचें असें सामान व वस्तू यांचा विचार तूर्त हिशोबांत न धरतांच हा विचार वर प्रमाणें होत आहे. आज जर हिंदुस्थानचे मोठमोठ्या किंवा लहान लहान शहरांतून सहज फिरूं लागलों तर हा देश ह्मणजे विदेशी वस्तुभांडारच ह्मणून कल्पना होते, याचा विचार जितका करावा तितका थोडाच होईल. कारण आज खेड्यांतील साधारण घरापासून तों शहरांतील श्रीमंताचे राजविलासी बंगल्यापर्यंत जों जों वर वर पाहूं लागलों तों तों जिकडे तिकडे विदेशी वस्तूंशिवाय दुसरें कांहींच दिसत नाहीं, व ही स्थिती दिवसेंदिवस वाढतच आहे. थोडक्यांत सांगण्याचें ह्मणजे मायेनें जसें ब्रह्मस्वरूप आच्छादित करून स्वतःचा प्रभाव जगांत सर्व व्यापकत्वाचे रूपानें जगाचे निदर्शनास आणून दिला आहे, व त्याजबद्दल कोणास विचार करण्याचीही जरूर भासत नाहीं; तद्वत या सुधारणा देवीनें हिंदुस्थानची सर्व बाबतींत पूर्व संस्कृती आच्छादित करून किंबहुना नामशेष करून

आपलेंच वैभव सर्वत्र दाखवून सर्वव्यापी बनली आहे, व सुशिक्षितांससुद्धां त्याचा विचार करण्यास जरूर न भासावी इतकी तिनें दृष्टी मोहांध करून ठेविली आहे. व या करितांच प्रथमतः तिचे जेष्ट भगिनीचा –शिक्षण * पद्धतीचा–जन्म झाला आहे.

हिंदुस्थानचे सर्व बाबी मिळून उत्पन्न किती. त्यांत हिंदुस्थानचे कायमचे रहिवाशांचा आवश्यक खर्च वजा जातां बचत किती राहणें शक्य आहे. त्यांतून परकीय नौकर वर्गास आदा होणारा पगारखर्च, रेल्वेनें, बोटीनें जरूर करावा लागणारा आवश्यक खर्च–प्रवास खर्च–ह्मणून जरी धरला तरी तो वजा जातां बाकी शिल्लक किती राहणें शक्य आहे. व वरील खाद्य, पेय व वस्तु इत्यादि अनवश्यक

---

* सन १८५३ मध्यें हॉऊस-ऑफ-लार्डस् पुढें झालेल्या साक्षींत आमचीं जुनी संस्कृती नष्ट करण्याचा हेतु ट्रेव्हेलियन साहेब यांनीं स्पष्ट प्रगट केला आहे.

What we are doing is not to enter in-to an unseemly and irritating conflict with the upholders of this ancient system ( Hinduism ) but to give an entirely new key to the natives–opening to them a very superior knowledge. The first effect of this introduction to a new system is to destroy entirely the influence of the ancient system upon their minds. In most instances they are not initiated in it. It is a great truth the rising generation becomes the whole nation, of a few years, and that if we desire to make an effectual change in the character of the people, we must take them when they are young, and trian them in the way, we should have them go, all our money then will be well laid out. We shall have no prejudices to contend with. We shall have supple minds to deal with; and we shall raise up a class of influential intelligent youth who will, in the course of a few years become the active propagaters of our system, with little or no assistence from us.

( रा. मोहनी कृत तेजस्वी शिक्षण पान ७ )

वस्तु खरेदींत होणारा खर्च, दरसाल खर्च वजा जातां राहिलेले शिलकेंतून भागणें शक्य आहे काय ? याचा हिशोब पाहतां नकारार्थीच आढावा निघेल ह्मणजे हा खर्च पूर्वीचे शिलकेंतून ( मुद्दलांतून ) किंवा कर्जाचे रकमेंतूनच खर्च होत असला पाहिजे. व कांहीं दिवसांनीं [ आज मुद्दल किंवा पूर्वीची शिल्लक कांहीं आहे असें गृहीत धरल्यास ] हा सर्व खर्च कर्जांतूनच होत आहे असें ह्मणावें लागेल. अशा वस्तुस्थितींत हिंदुस्थानची आर्थिक स्थिती सुधारणेंची कांहीं आशा आहे याजबद्दल आह्मांस तर शंकाच आहे. ज्यांस संशय असेल त्यांनीं ती हिशेबी पद्धतीनें पाहून घ्यावी.

हा एकंदर समाजदृष्ट्या किंवा राष्ट्रदृष्ट्या विचार झाला परंतु हल्लींचें सुधारणेचें कालांत व्यक्तिस्वातंत्र्य असलेमुळें ह्मणजे देशाचा विचार न करितां स्वतःचेच पुरता विचार करणें या दृष्टीनें जगांतील सुखसोई व चैन यांचा जर आह्मीं उपभोग घेऊं नये तर आमचे मनुष्य-जन्माचें सार्थक काय ? पूर्वीचे कालांत सुधारणाच नसलेमुळें या गोष्टीचा फायदा घेतां आला नाहीं. ह्मणून आज जर तो अनायासें प्राप्त होत आहे तर तो कां न घ्यावा ? अशा प्रकारचे तत्वावरच आज व्यक्तिमात्राची प्रवृत्ती होत आहे. व याप्रमाणें सर्व आपआपले ऐपतीचे मानानें ऐषआराम व सौख्याचा उपभोग घेऊन या प्रपंचोपवनांत यथेष्ट विहार करीत आहेत. व त्यांस कोण आड येणार ? कारण व्यक्तिस्वातंत्र्य ! धर्माची सत्ता तर केव्हांच नष्ट झाली. त्या बरोबरच समाज बंधनें ढिलीं पडत चाललीं. कायद्याची तर मुळीच हरकत नाहीं. उलट खुलें व्यापार-तत्व आहे. जातिभेदावरही शस्त्र-प्रयोग सुरूच आहेत. मग अशा परिस्थितींत ह्मणजे नियामक—शास्ता—नसलेमुळें प्रत्येकाचे नैसर्गिक स्वेच्छाचारास युक्तिवादानेंच केवळ आळा घालण्याचा कोण प्रयत्न करील ? व त्याचा काय उपयोग ? कारण बहुजन समाजाची प्रवृत्ती एकाच दिशेची. तेथें अनुभव—आचरणाचा

परिणाम–हाच नैसर्गिक शास्ता योग्य असतो.

परंतु तूर्त आह्मीं आर्थिकदृष्ट्या या प्रश्नाचा विचार करीत असल्यामुळें आह्मीं व्यक्तिमात्राचें प्रवृत्तीचा विचार करीत नाहीं. कारण ज्या चैनी व सौख्याचें कल्पनांवर आमची प्रवृत्ती तरंगत आहे त्यास तरी मूळ आधार ह्मणजे द्रव्य–अर्थ–हाच होय. ह्मणून व्यक्तिमात्राचा सुख दुःखाचें दृष्टीनें विचार करतां हल्ली ज्या विविध चैनी व सुखसोईचे विषय आहेत ते आज या स्वातंत्र्य काळांतसुद्धां सर्वांसच प्राप्त होतात असें नाहीं दुपारीं उन्हाचें वेळीं अत्यंत थंडगार राजमहालांत वाळ्याचे पडद्याचा शीतल व मंद वायू व त्यांतही पंख्याचा वारा घेणारे व्यक्तीसमोरच उघड्या उन्हांत हातांत कुदळी घेऊन सडकेची पक्की गिट्टी फोडणाऱ्या मजुरास तें सुख कसें अनुभवितां येईल ? ह्मणून कां त्याची इच्छा त्यास नाहीं परंतु तितका मोबदला त्याजपाशीं कोठें आहे ? त्याला स्वतःचे मुलाबाळांस कशीतरी दोन प्रहरीं भाजी-भाकर मिळविणें हीच चैन, हेंच सुख. तेव्हां हल्लींचे सुधारलेले काळांतसुद्धां प्रत्येकासच सुख मिळत आहे असें नाहीं. किंबहुना तें पूर्वीपेक्षां ( तीस वर्षां पूर्वी ) महाग झालें आहे असेंच दिसून येईल. तीस वर्षांपूर्वी एक इसम दहा माणसास पोसण्यास समर्थ होता. आतां कुटुंबांतील प्रत्येक मनुष्यास स्त्री-पुत्रासह ( व तेही मध्यम स्थितींतीलसुद्धां ) काम करावें लागते. इतकेही करून पूर्वी प्रमाणें भागत नाहीं. यामुळें कुटुंबें परदेशी [ पर प्रांतात ] जात आहेत. व विभक्त होत आहेत. याचें प्रत्यंतराबद्दल विशेष सांगण्याची जरूर नाहीं. कारण सर्व बाबतींत हल्ली होत असलेली महगता व ती दिवसेंदिवस कमी न होतां वाढत्या प्रमाणावर आहे हेंच वस्तुस्थितीचें पूर्ण निदर्शक आहे. कुटुंबें विभक्त होऊं लागल्यावर साहजिकच परस्पराचें हिताहित वेगळें होतें त्यामुळें परस्परांत प्रेमभाव नष्ट होऊन सहानुभूतीचा लोप होतो व त्याचमुळें ती

रिकामी जागा तद्विरोधी मनोभावनांनीं व्यापून टाकल्यानें आपसांतील कलह, द्वेष, मत्सर यांस अनायासें आश्रय मिळाल्यामुळें आज समाजांत त्यांचें प्राबल्य वाढत आहे. याप्रमाणें ही परंपरा वरीच वाढवितां येईल परंतु येथेंच सर्व विचार करण्यास हें उक्तस्थल नसल्यामुळें नुसतें दिग्दर्शन करीत आहों. हा कशाचा परिणाम तर वर सांगितल्याप्रमाणें खर्चाची बाब जास्त वाढत चालल्यानें व अनवश्यक गरजांस महत्व मिळाल्यामुळें व ह्या सर्वांस कारण नवीन संस्कृतीचें मनावर पूर्ण स्वामित्व हेंच होय, सारांश तात्पर्य काय कीं, मागें सांगितल्याप्रमाणें कांहीं कालानें असें ह्मणावें लागेल कीं हा अनवश्यक खर्च कर्जाचे रकमेंतूनच होत आहे कारण मुद्दल संपलें. मग त्या शिवाय जमाखर्चाची तोंडमिळवणी कशी करणार? याचप्रमाणें आर्थिकदृष्ट्या देशाची उन्नती किंवा अवनती होत आहे याचा विचार करणें सूज्ञांकडेसच सोंपवून आह्मीं पुढील विचारास लागतों. वास्तविक कोणावर सोंपविण्याचें कारण नाहीं कारण वस्तुस्थिती इतकी उघड होत चालली आहे कीं, प्रत्येकाचा अनुभवच त्याची साक्ष देईल. ह्मणजे वर सांगितल्याप्रमाणें स्थितीचा परिणाम—अनुभव—हाच येथें शास्ता होईल व तोच वस्तुस्थितीचा विचार करण्यास भाग पाडील व त्याप्रमाणें आजच काल येत चालला आहे. एरव्हीं सुव्यवस्थित व सुयंत्रित राज्यपद्धतीचा लाभ अनायासें मिळत असतां स्वराज्याची अवश्यकता भासण्याचें काय कारण?

येथें वास्तविक व्यक्तिशः सुखदुःखात्मक दृष्टीनें आर्थिकदृष्ट्या विचार झाला. परंतु सामान्य जनास पूर्ण बोध होण्यास थोडासा खुलासा करणें जरूर असल्यामुळें तो करणें भाग आहे. त्या करितां एखाद्या कुटुंबाचा दृष्टांतादाखल विचार करूं.

एखादें कुटुंबांत त्यांतील व्यक्तीस अन्नवस्त्रास लागणारे खर्चाइतकेंही उत्पन्न नसलें तर कुटुंबांतील कर्त्या पुरुषास किती अडचण व त्रास

होतो याची कल्पनाच केली पाहिजे. त्यांतून " उधारी बंद " " मेहेरबानीकरून उधार मागूं नका " वगैरे पाट्या दुकानांतून मनोहर बोर्डावर पाहतांच तो जसा बाजारांत जातो तसाच रिक्त हस्तानें परत येणार. दुकानांत सामान मिळण्याची ही स्थिति तर नगदी पैसा मिळण्याची गोष्ट कशाला? कारण एकतर चांदी-सुवर्ण यांचा दागिना किंवा शेतीचा पर्चा जवळ असला तरच दुकानावर पाय ठेवण्याची गोष्ट. मग जेथें दिवस नाहीं व चंद्रमा नाहीं तेथें दुसरें काय असणार? व त्या स्थितींत धडपड करणारांची स्थिति काय वर्णन करण्याची? कारण वस्तूचा शोध तर लागणेंच नाहीं परंतु कोठें खांबाला धक्का लागल्यामुळें तो रुष्ट होऊन प्रत्याघात होणार किंवा भिंतीस स्पर्श झाल्याबद्दल तिचा नुकसानीचा दावा होणार या शिवाय काय फल-प्राप्ती? ह्मणजे व्यर्थच श्रम. तद्वतच प्रपंचांतील या कर्त्या पुरुषाची स्थिति, पण सांगतो कोणाला? व सांगून ऐकतो कोण? उलट " आळशी, निरुद्योगी " वगैरे विशेषणांस पात्र होणार! मग तेथें कसला सण व कसला उत्सव! एवढेंच नव्हें तर खर्चांत शक्य ती काटकसर, स्वतःचे कपड्यांत कमतरता, किंबहुना आपण स्वतः अर्धपोटीं ह्मणजे एकसांजच स्वतःचें जेवणं करणें वगैरे, ह्मणजे प्रपंचांतील मंडळींचे सुखसमाधानाकरितां स्वतः झीज सोसणें, कष्ट करणें किंवा कपड्याची वगैरे अडचण स्वतःस मनुष्य कारितो व ती तशी करणें त्यास प्राप्त होतें. हा नामांकित चित्रपट कल्पना-तरंगातील समजूं नये. आज कित्येक कुटुंबें त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेत आहेत. एवढेंच नव्हें तर तीही मध्यम व सुशिक्षित वर्गांत आहे. एका तहशील कचेरींत कलेक्टर साहेब तपासणीस गेले. एका कारकुनाचा पोशाख साधा तर होताच परंतु थोडासा मलीन व फाटका होता. पगार ४० पेक्षां कांहीं कमी नसेल. साहेब पोषाख पाहून गरम झाले. परंतु मामलेदारांनीं त्यांचें सांत्वन केलें. "He has a big family Sir."

( व दुसरें उत्पन्नही तो फारसा घेत नसे ) इतक्यांत तो कारकून ह्मणतो. "Sir I take my food once a day" ही करुणास्पद स्थिती पाहून विदेशी अधिकाऱ्यासमुद्धां वाईट वाटलें व त्यानीं त्याचे क्यारेक्टर रोलमध्यें तसें लिहून ( कारण क्वॉलिफिकेशनची अडचण येणार ? ) त्यास तात्रडतोब बढती दिली, व पुन्हां कांहीं दिवसांनीं त्याच तहसिलींत जाऊन त्या कारकुनास विचारलें " अब कित्तेबखत खाना खाता ? " " साहेब दो वखत लेकीन कपडेकू पैसे पुरते नहीं. " साहेब खूप होऊन " अच्छा अच्छा " ह्मणत निघून गेले. असो,

सांगण्याचें तात्पर्य एवढेंच कीं, कुटुंबांतील कर्त्या पुरुषास स्वतः स्वार्थत्याग व स्वतःच्या चैनी–सुख–बाजूस ठेवणें, कुटुंबांतील सर्वांच्या हिताचे दृष्टीनें प्राप्त होतें व इष्ट आहे. मग राष्ट्रकुटुंबांतील कर्त्या पुरुषांनीं ह्मणजे हिंदुस्थानचे प्रौढ व सुशिक्षित तसेंच अशिक्षित व्यक्तींनीं विशेषतः बड्या व्यापाऱ्यांनीं राष्ट्राचें आर्थिकदृष्ट्या स्वार्थत्याग, चैन व सुखास राष्ट्राची असमाधानकारक स्थिती सुधारेपर्यंत तरी निदान मर्यादित करणें जरूर आहे किंवा नाहीं? ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. आज ज्या सुखसोई व चैनीच्या वस्तु दिसताहेत ह्या कोणाच्या? त्या या देशांतल्या नाहींत तर त्याबद्दल मालकानें ठरीव मोबदला घेऊन परदेशांतून इकडे पाठविलेल्या आहेत. तेव्हां राष्ट्राची स्थिती शोचनीय असतां अशा वस्तूंस मोबदला देऊन परकीयांस आणखी नवीन नवीन वस्तू उत्पन्न करण्यास उत्तेजन देऊन देशांतील पैसा त्या कामीं खर्ची घालण्यास आह्मांस अधिकार आहे काय? एकीकडे आह्मीं हिंदुस्थानचा पैसा विलायतचे हिताहितांत खर्च करण्याबद्दल अधिकाऱ्यांस दूषण देतों व दुसरीकडे आमचें प्रत्यक्ष आचरण पहावें तर त्या विरुद्ध, याचा मेळ कसा बसणार? कुटुंबांत घरीं दोन प्रहरची पंचाइत असतां कर्ता पुरुष हॉटेलमध्यें फराळावर यथेच्छ हात मारतांना दिसल्यास त्यास सूज्ञ कोण ह्मणेल? जेवढ्या वस्तु

कुटुंबांत अवश्यक तेवढ्या निदान प्रथम पुरवून नंतर आपण सेवन करणें हा कुटुंब-धर्म आहे. तसें न करितां स्वतःचाच विचार करणें हा अधर्म आहे. हा धर्मशास्त्राचा प्रश्न नसून व्यवहाराचाच प्रश्न आहे. ह्मणून ज्या वस्तू आपणांस अवश्य वाटतात त्या प्रथम देशांत उत्पन्न करण्याची काळजी घेऊन किंवा होत असल्यास त्यावरच भागविणें हा राष्ट्रधर्म आहे. व ज्या अनवश्यक आहेत त्यांस तर सर्वस्वी प्रतिबंधच करणें इष्ट आहे. हें निराळें सांगणें नकोच. ह्मणून प्रथम स्वाभिमान ठेऊन देशाचा विचार सतत जागृत ठेवणें—नव्हें त्या प्रमाणें कृती करणें—इष्ट आहे. एरव्हीं प्रत्येक सभांतून " हिंद हमारा देश है " वगैरे राष्ट्रगीत आह्मीं ह्मणतच आहों. परंतु तो केवळ फार्स आहे. त्यावरून आमचे अंतःकरणावर अजून परिणाम झाल्याचें दिसत नाहीं. तेंच परकियांचें उदाहरण पहा ! मॅन्चेस्टरला कपडा होत नव्हता तेव्हां इकडील कपडा तिकडे जात होता. परंतु तिकडे तो निघूं लागतांच इकडील कपड्यांची होळी ठिकठिकाणीं झाली. परंतु यांत विशेष नाहीं. * तसें इकडेही झालें आहे. परंतु तेव्हांपासून इकडील

---

लोकमान्य टिळकका आत्मा गांधीसे स्वराज्य यज्ञ करा रहा है.

* यह यज्ञमें स्वराज्य फाळाकी प्रथम आहुती होमाई चुकी है.

अब लोकमान्यकी प्रथम संवत्सरीके दीनसे परदेशी कापडकी बाहिष्कारकी द्वितीय आहुती शुरू होती है. तो आप आपका फाळा यह स्वराज्य यज्ञको आहुतिओमें जरूर देदीजिये. आपका परदेशी कपडा जलादीजिये. अथवा गारिबोकुं बाक्षिस करदीजिये.

इस यज्ञसे स्वराज्य प्राप्ती अवश्य होगी. और लोकमान्यका आत्मा यज्ञ करनेवाला होनेसे उनका बचन आपके आहुतिओंसे सिद्ध होजायगा की, " Home rule is my birth right, & I will have it. "

Published by,
**A. G. Metha.**
Lalsinh M. Building, Lohar Chawl Bombay 2

कापडास विलायत दिसली नाहीं. ही गोष्ट विशेष लक्षांत घेण्यासारखी आहे. बाकीच्या कांहीं जिनसा–कच्चा माल–तिकडे [ व इतर देशांतही ] अजूनही जातो. परंतु त्याचा मोबदला ते इकडून किती पटीनें नेतात याचा विचार केल्यास व्यापारदृष्ट्या तें जरूरच आहे. कारण तिकडे तो होत नाहीं. व कांहीं होत असल्यास इकडचा स्वस्त पडत असल्यामुळें परवडतो तसा एकाही वस्तूचा मोबदला आपणांस मिळत नसल्यामुळें आर्थिकदृष्ट्या हा व्यवहार व अर्थात व्यापारदृष्ट्याही–कारण व्यापार अर्थप्राप्ती करितांच–इष्ट होत नाहीं

दुसरें–शेजारच्या श्रीमंताचे मुलांस नित्य खाऊ मिळतो, नवीन कपडे मिळतात ह्मणून या कुटुंबांतील मुलांनीं मागणें इष्ट नाहीं. कारण मिळणें शक्य नाहीं. व परिस्थितीही तशी नाहीं. ह्मणून त्यांचें ठिकाणीं माता-पित्याचें प्रेमाचा अभाव कल्पितां येणार नाहीं. ह्मणून ही मागणीही जेथें अनुचित ठरते तेथें तदनुरूप हक्क व्यक्तिस्वातंत्र्याचे तत्वांवर प्रतिपादन करणाऱ्यांस काय उत्तर द्यावें हा प्रश्नच आहे. कारण ही व्यक्तिमात्राची बुद्धी समाजाचें हिताहितास विरोधक असल्यामुळें त्याज्य आहे. एवढेंच नव्हें तर सदर व्यक्ती त्याच समाजांतील घटक असल्यामुळें ती वृत्ती त्यासही पर्यायानें घातकच आहे. नावेंत बसणाऱ्या हजारों लोकांचे सुरक्षितपणाकरितां ठरविलेले नियम पाळणें हें पर्यायानें आत्मरक्षणच करणें होय. इकडे दुर्लक्ष करून एखादा उद्दामपणानें दुसऱ्याचे सद्बुद्धीचाही विचार न करितां केवळ इच्छा ह्मणूनच नावेस छिद्र पाडण्याचा स्तुत्य उद्योग करूं लागल्यास तो प्रयत्न जरी त्याचे अभिरुचीचाच असला तरी तो आत्मघातकच होय. यास जास्त पुरावा कशाला ?

परंतु हल्लींचे कालांतील अनेक नवलांपैकींच प्रस्तुत म्हणजे एखादी गोष्ट अनुचित ह्मणून सांगण्याची सोय नाहीं. कारण सांगण्याची

कोणाला ? सुशिक्षितांस तर सांगण्याची सोयच नाहीं. कारण ते स्वतःच सुशिक्षित, यांतून देशाचे हितचिंतक ह्मणविणारे, समाजाचे अग्रेसर, त्यांचा उपदेश व व्याख्यानें ह्मणजे हिंदुस्थानची स्थिति सुधारणें, किंबहुना हेंच त्यांचें ध्येय. मग जो जागाच आहे त्यांस जागें करें करावयाचें ? तसेंच अडाणी–अशिक्षित–ते बोलून-चालूनच अज्ञानी.

त्यांची स्वाभाविक प्रवृत्ती ह्मणजे खाणें-पिणें, दोन पैसे कोणत्याही तऱ्हेनें मिळविणें; नाच-रंग, तमाशे, नाटकें व सिनेमा पाहणें; बूट, पटका व उपरणें लेऊन छडीपट्टा मिरविणें. ह्मणजे वर्षाकालांतील क्षणांत रूपरंग बदलणारे मेघाप्रमाणें ज्यांच्या एका दिवसांत तीन तऱ्हा, त्यांचे मनोवृत्तीवर देश-कल्याण, स्वार्थत्याग व परस्पर सहकारिता वगैरे भावनांची छाया पडावी कशी ? कारण ती मनोभूमी स्वार्थपरायणतेचे जाळ्यांत इतकी झाकली गेली असतेकीं, या भावनांस पाऊल ठेवण्यासही जागा मिळणें शक्य नाहीं. मग स्थिर राहण्याचा प्रश्न दूरच ! अशा स्थितींत जमिनीचे प्रकाराबद्दल विशेष विचार न करितां स्वधर्म म्हणून वर्षाव करणारे मेघाप्रमाणें सूज्ञ पुरुषानें सदुपदेश करीत राहणें हा महाजनांचा स्वधर्म आहे. अर्थात् हे महाजन म्हणजे “ मनासि वचासि कायें पुण्य पीयूष पूर्णा ” असेच असतात. लोक कल्याणाकरितां त्यांचें अंतःकरण व्यथित होतें. म्हणून ते स्वतःचे समाधानाकरितांच राष्ट्रकार्याची जबाबदारी व आघात सोसण्यास तयार होतात. त्यांचें अंतःकरण अर्थात् प्रेमळ, सरळ भाव, शुद्ध वाणी--मन--व जे विचार तेंच मन तोच आचार--वर्तन--व तोच उपदेश यांत कोठेंही विसंगतपणा दिसणार नाहीं. हेच खरे “ लोक-संग्रही ” अर्थात् खरे मार्गदर्शक, किंबहुना त्यांचा आचार, आचरण व वागणूक हाच इतरांस मार्ग. म्हणून “ महाजनो येन गताः सपथाः ” ह्मटलें आहे. एवढेंच आह्मीं त्यांस उत्तर देऊन हा विषय पुरा करितों.

आतां एक गोष्ट वरील गोष्टी इतकीच महत्वाची व तितकेंच

तिकडे दुर्लक्ष होत असलेली ह्मणजे ती ही कीं, अपसांतील द्वेषभाव—मत्सर—ज्यास साध्या भाषेंत सांगणें ह्मणजे भाऊबंदकी हा दुर्गुण समाजांत इतका रूढ झाला आहे कीं, त्याची विशेष चर्चा करण्याचीही जरूर नाहीं; परंतु तो इतका महत्वाचा व समाज-हित-विघातक आहे कीं, त्याची थोडीशी कल्पना करून देणें अप्रासंगिक होणार नाहीं. कारण जरी तो नित्य व्यवहारांत सर्वांचेच परिचयाचा झाला आहे तरी त्याच कारणामुळें त्याचा कोणी फारसा विचारही करीत नाहीं. नित्य सहवासांतील गोष्टींची स्थिती अशीच होते. सूर्य सर्व प्रकाशक असतां तो नित्य सहवासांतला म्हणून त्याचें महत्व आपणांस वाटत नाहीं. तसाच प्रकार दुर्गुणांचा--व्यसनांचा--आहे. ते नित्य सहवासांतले झाले म्हणजे त्यांचे दुर्गुण व दुष्परिणाम यांची कल्पनाच होत नाहीं. उलट ते सद्गुणच व आरोग्यदायकच वाटूं लागतात. मद्यपीयांस तें व्यसन पशुवत आचरण करविण्यास लावतें. परंतु त्यास त्याची किळस येत नाहीं. उलट प्रीयच वाटतें. तद्वतच आज कोर्टांत नित्यश: आपसांतील तंटे--भाऊहिश्यांचे, स्त्री-पुरुषांच्या परस्पर फारकतीचे दावे, अन्नवस्त्राचे दावे, विधवांस अन्नवस्त्राकरितां कोर्टांत जाणें, अज्ञानाचे इस्टेटीची अफरातफर व त्यांचे दावे या शिवाय खोटे दस्तऐवज, पावत्या व साक्षी-पुरावा वगैरे संबंधीं आज दिवाणी कोर्टांत राजरोष होत असलेला व्यवहार व कायद्याचा फायदा घेऊन न्यायांतील कोर्टांचे बदलणारे दाव्याचें व हुकुमनाम्याचें स्वरूप--रूपांतर—व त्या योगानें प्रोत्साहन मिळणारे व्यवहारांत आज उभय पक्षांचें किती नुकसान होत आहे याची कल्पनाही कोणास नाहीं. उलट दाव्यांची व त्याकरितां कोर्टांचीही संख्या वाढत आहे. या शिवाय मुलकी, फौजदारी तंटे निराळेच.

मुलकी, फौजदारी किंवा लष्करी वगैरे खात्यांस कराचे किंवा इतर द्वारा ह्मणजे मुलकीस जसें शेतसारा, फौजदारी खात्यांस इनकमट्याक्स वगैरे कांहीं ठराविक उत्पन्नाची बाब असते. परंतु हें दिवाणी खातें

विन आधारी--हजारों लाखों रुपयांचे दरमहाचे--खर्चाचें कशावर चाललें आहे ? याचा क्षणभरसुद्धां कोणी विचार करीत नाहीं, परंतु मागें सांगितल्याप्रमाणेंच येथेंही तीच वस्तुस्थिती. या खात्याचे परिपोषक व चालक कायदेपंडितच असून त्या वर्गानें याचा विचार करणें ह्मणजे मायेनें ब्रह्माचा विचार करण्यासारखेंच विसंगत. कारण आत्मस्वरूपावरण हेंच जिचें स्वरूप तिनें स्वस्वरूपाविष्करण करणें ह्मणजे आत्मनाश करणेंच होय. तद्वत या वर्गाकडून या विषयाची नुसती कल्पना करणें ह्मणजे आत्म-घाताचा प्रयत्न करण्यासारखें आहे. आतां दुरभिमानानें, स्वार्थबुद्धीनें व परस्वापहरण लालसेनें उद्युक्त झालेले पक्षकारांसही याचा विचार करितां येत नाहीं. कारण ते शुद्धांतःकरणानें, निर्मलबुद्धीनें, नैतिक दृष्टीनें, आर्थिक भावनेनें किंवा धार्मिक श्रद्धेनें यांपैकीं कोणत्याही विचारानें याचें मनन करण्यास लागतील तर त्यांस कोर्टांत जाण्यास उचललेलें पाऊल पुढें न टाकतां मागेंच घ्यावें लागेल. व ऐक्यतेचे भावनेनें उद्दिप्त झालेलें त्यांचें मन पूर्वीचे * पंचायतीचाच आश्रय करील.

---

* सर थॉमस मनरो हे पंचायतीसंबंधीं लिहितातः—

" It appears that under the Hindu administration there were no courts of justice excepting the Cutchery of patels and amildar and that all civil cases of importance were settled by Panchayats. The native who has a good cause, always applies for a Panchayat, while he who has a bad one, seeks the decision of a Collector or a Judge because he knows it is much easier to deceive them. The natives cannot surely, with any foundation be said to be judged by their own laws, while the trial by Panchayat to which they have always been accustomed is done away. I conscientiously believe that for the purpose of descriminating the motives of action and the chances af truth in the evidence of such a people, the entire life of most accute European Judge—devoted to that single object could not place him on level with an intelligent Hindu Panchayat which is an admirable instrument of decision." मोहनीकृत तेजस्वीशिक्षण पान १०४

किंबहुना त्यांतच त्यांस आर्थिकदृष्टया, समाजदृष्टया व नैतिकदृष्ट्या फायदाच दिसणार आहे. येवढेंच नव्हें तर पाश्चात्यांसही तिचें महत्व वाटत आहे. परंतु असें झाल्यास त्यांच्या हल्लींचे मनोरथ सिद्धीची वाट काय लागणार? परंतु या एकाच गोष्टीनें आज समाजाचें धार्मिक, नैतिक, आर्थिक बाबींचा कसा संहार होत आहे व त्यामुळें आज समाजाची काय स्थिती होत आहे ह्मणजे समाजांत दुरभिमान, स्वार्थबुद्धी व दुही यांचें कायमचें ठाणें बसून मानवी बुद्धीवर त्यांचें प्राबल्य इतकें दृढ होत चाललें आहे कीं, हीं मगरमिठी सुटणेंच आज अशक्य झालें आहे व ही परिस्थिती—ही वस्तुस्थिती—कायम ठेवून आमचे समाजाग्रणी आज हिंदुस्थानचें अंतिम कल्याणाचे पैजेचे विडे उचलीत आहेत हें आश्चर्य आहे.

आतां सरतेशेंवटीं एक विशिष्ट शेतकीचें साधन ह्मणून अवश्यक असें व ज्याकडे पूर्ण दुर्लक्ष होत आहे, किंबहुना जें नष्ट होत चाललें असूनही त्या संबंधीं उदासीनता दिसते, व ज्याचे अस्तित्वावरच त्यांचें मुख्य कृषीकर्म अवलंबून आहे, व ज्याचा क्षय होणें ह्मणजे शेतकरी-वर्ग पूर्ण पराधीन होऊन केवळ जवळ जवळ मजुरच बनण्याचा संभव आहे तें साधन ह्मणजे वृषभवर्ग व त्याचें उत्पत्तिस्थान ज्या धेनु हें होय. यांचें महत्व ऽभागवतात वर्णन केलें आहे.

---

ऽ जे गाईच्या कैवारा। घायें सहस्रबाहो केला चुरा। तीन सप्तकें वसुंधरा। मुख्य धुरा म्या मारिल्या ॥ ८४ ॥ रामावतारीं अति महिमान। तैं नघडेचि गो-सुश्रुषण। या लागीं गोकुळीं जाण। गाईचें सेवन म्या केलें ॥ ८५ ॥ गाईचे सेवे झाली पुष्टी। बाळपणीं मारिलें जेठीं। कंस चाणूर मारिले हटीं। बैसविला राज्यपटीं उग्रसेन ॥ ८६ ॥ गाईचे सेवेची अति गोडी। तेणें माझी कीर्ति जाहली चोखडी। फोडिली कंसाची बांदोडी। तोडिली बेडी पितरांची ॥ ८७ ॥ या लागीं गाई आणि ब्राह्मण। माझा जाण जीव-प्राण। माझें पूजेचें अधिष्ठान। सुलभ जाण इये दोन्हीं ॥ ८८ ॥ आपत्कालीं गोरक्षण। करी तो पढियंता मज जाण। त्या सवें मीं आपण। गोरक्षण करीतसें ॥ ८९ ॥ गाईचे सेवेचें विधान। गोग्रास घ्यावा जें तृण। करावें अंग कुरवाळण। इतुकेंनि प्रसन्न मीं होयें ॥ ९० ॥ निर्लोभ गाईची सेवा। करितां माझी प्राप्ती उद्धवा। ऐक वैष्णवाची सेवा। पूजा सद्भाव विभाग ॥ १३९१ ॥ ( एकनाथी भागवत अध्याय ११ श्लोक ४३ ओवी १३८४-९१ )

ह्मणून त्यांचें सद्यस्थितीचें दिग्दर्शन करून शेतकरी वर्गाची हल्लींची प्रवृत्ति हा विषय संपवूं. आज यासंबंधीं विचार करणें ह्मणजे त्यांचा जो प्रत्यही शेंकड्यानें नव्हें हजारानें क्षय होत आहे हेंच सांगणें आहे व तो कशाकरितां तर अहिंदु जनतेचे उदरभरणार्थ –त्यांचे पंचप्राणरूपी पंचाग्नीस सजीव जीवांचे तेही--अत्यंत अवश्यक व उपयुक्त पशूंचे बळी देणें व तेंही या सुधारणेंचे काळांत हें ऐकून कोणासही सखेदाश्चर्यच वाटलें पाहिजे. व हे यज्ञकर्ते कोण तर आमचा शेतकरी वर्गच. कलीमध्यें यज्ञसामुग्री दूषित झाल्यामुळें मंत्रसामर्थ्य व अधिकार विचार या आचारभ्रष्टतेमुळें नष्ट झाल्यानें यज्ञकर्म वर्ज सांगितलें आहे, परंतु “ यज्ञात् भवति पर्जन्यो ” व तो पर्जन्य अवश्यक असल्यामुळें, कारण “ पर्जन्यात् अन्न संभवः ” ह्मणून यज्ञकर्माचा अभाव अनिष्ठ वाटूनच कीं काय यांनीं ब्राम्हणांचे ऋत्विजाची दीक्षा स्वतःकडे घेऊनच यज्ञ-सामुग्रीची योजना वरील पशुवर्गांत करून–कारण त्यांत अर्थ प्राप्तीही होत आहे– हा यज्ञ सुरू करण्याचें योजिलें असावें असें दिसतें. कारण त्या शिवाय हा पशुयज्ञ नव्हें तर पर्यायानें व अप्रत्यक्ष रीतीनें आत्मयज्ञच ह्मटला पाहिजे व तो यांनीं सुरू केला नसता. आतां येथें शेतकरी असें ह्मणतील कीं, या यज्ञांत आह्मीं कोणताच भाग घेतला नाहीं. परंतु यज्ञाचे बळी तर याच वर्गांतून पुरविले जातात. कारण थोडीं फार आज जीं जनावरें विद्यमान आहेत त्यापैकीं बरीच संख्या या वर्गाचेच संग्रहीं आहे. तेव्हां यांना तीं बाजारांत नेल्याशिवाय त्यांची रवानगी यज्ञशाळेकडे होणें शक्य नाहीं. आतां पूर्वीचें धर्मशास्त्र जरी बाजूला ठेविलें, व तें ठेविलेंच पाहिजे; तरी अधुनिक कायद्याचें तत्व असें आहे कीं, गुन्हा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें करणारा, गुन्ह्याचा प्रयत्न करणारा, गुन्ह्यास प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मदत करणारा व उत्तेजन देणारा, गुन्हा घडण्यासारखी परिस्थिती उत्पन्न करणारा

छपविणारा व गुन्ह्याचा माल घेणारा किंवा दाबणारा ह्मणजे न सांगणारा हे सातही थोड्याबहुत प्रमाणानें शिक्षेस पात्र होतात. पूर्वीचें धर्मतत्वही हेंच आहे. एकदां एका गोवधाकरितां धर्मराजाचे दरबारांत सात इसम दोषी ठरले होते. असो,

आतां कर्माचें फळ मिळणें हा अधुनिकच सिद्धांत आहे. ह्मणजे क्रिया आणि प्रतिक्रिया " Action & Re-action " ह्मणून या यज्ञकर्माचें फळ ह्मणजे पर्जन्यवृष्टी. परंतु ती आकाशांतून न होतां आकाशाकडे पर्जन्याकरितां दृष्टी लावणाऱ्या त्याच शेतकरी वर्गाचे नेत्रस्थानांतून अश्रुरूपानें होत असते. कारण तमोगुणी यज्ञाची स्थिती अशीच उलट होत असते. प्रेत संजीवनी प्रयोग कांहीं लोक स्मशानांत जाऊन करतात. या विद्येला व मंत्राला कलींत अर्थात् सफलता असणारच. त्यांत प्रेत जागृत करण्यापूर्वी कांहीं खाद्य-पेय त्याचे जवळ ठेवितात. तें कमी पडल्यास किंवा वक्तशीर न दिल्यास तें जागृत होणारें प्रेत जागृत करणारासच भक्ष्य समजतें. असो,

ह्मणून हा तमोगुणी यज्ञ सर्व प्रकारें घातक असल्यामुळें तो यापुढें बंद करण्याचा शेतकरी वर्गानें प्रयत्न करणें इष्ट--जरूर--आहे. याची सविस्तर दुःखदायक कहाणी गोरक्षण संस्था गात असल्यामुळें येथें आम्हीं चालू दुःखदायक कहाणींत आणखी भर न घालतां तिकडेसच वाचकांचें लक्ष वेधून पुढील कथाभागाचा विचार करितों.

आतांपर्यंत अधुनिक सुधारणेनें व नवीन संस्कृतीनें एकंदर समाजाची घडी बिघडून फाजील शोक-चैनी--व गरजा वाढून एकत्र कुटुंबपद्धतीचा स्फोट होऊन शिक्षण पद्धतीनें नौकरीची लालसा वाढून व कुटुंबांतील एकत्रित माणसांचें परस्परांतील ऐक्य-सहानुभूति-व प्रेम नष्ट होऊन विभक्तपणामुळें हिताहितसंबंध दुरावून परस्परांत

द्वेष--मत्सर, परकीयपणा व स्वार्थपरायणता यांची वृद्धी होऊन आज समाजाची धार्मिक, नैतिक, शारीरिक व आर्थिक अशा या सर्व बाजूंनीं अवनती होत चालली आहे याचें दिग्दर्शन केलें. आज वऱ्हाडची स्थिती इतर देशांपेक्षां नैसर्गिकच श्रेष्ठ म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु त्या स्थितीचा फायदा व उपयोग करून घेण्यास आमचे अपसांतील द्वेषभाव व त्याकरितां कोर्टांत झगडण्याचा आज नित्य प्रसंग येत असल्यामुळें फुरसतच होत नाहीं. जगांत काय चाललें आहे व आपलें सद्यस्थितींत कर्तव्य काय याचा शांतपणें विचार करण्यासुद्धां आमच्या चित्ताची स्थिरता नाहीं. नवीन उद्योग-धंदे--कच्चे मालाचा शोध करून त्याचा संग्रह करणें, खेडयांतील वस्तुस्थितीचा उपयोग करून थोड्या खर्चांत व थोड्या श्रमांत काय करतां येईल इकडे कोणाचें लक्ष नाहीं. वास्तविक खेड्याचें महत्व व जुन्या संस्कृतीचा तेथें अजूनही अवशेष दिसून येत आहे. परंपरागत धंद्याचे लोक विद्यमान आहेत त्यांसच आपले ज्ञानाचा, नवीन संस्कृतीचा–सुधारणेचा–व अधुनिक ज्ञानाचा फायदा करून दिल्यास आज तेच उद्योगधंदे उदयास येऊन तत् सादृश्य इतरही अस्तित्वांत येण्याचा संभव आहे. परंतु आमची प्रवृत्ती अशा खेड्यांचें महत्व त्यांतील परंपरागत धंद्यांचे उपयुक्ततेचा विचारच करण्याकडे नसल्यामुळें शहरांत गर्दी करण्याकडे व महर्गतेंत आणखी भर घालण्याकडे असल्यामुळें याचा उपयोग व्हावा कसा व ही स्थिती सुधारणार कशी ? वास्तविक ज्या पाश्चात्यांसही खेडयांची जाणीव व महत्व इतकें वाटत आहे कीं, ते त्याची कल्पनातीत * प्रशंसा करितात. यांत कांहींतरी तथ्य असलें पाहिजे. ह्मणून येथील उन्नत्ती ह्मणजे धर्म-पालन–आचार रक्षण–जुन्या संस्कृतींचें अवलंबन व अवनती

---

* " इंडस्ट्रियल आर्ट ऑफ इंडिया " पुस्तकांत सर जॉर्ज बर्डवुड ह्मणतातः—

To the Indian land and village system, we owe altogether the hereditary cunning of the Hindu handicraftsman. It has

म्हणजे धर्मलोप--आचारलोप—व नवीन संस्कृतीचें अनुकरण, सुधारणेचा फायदा व उपयोग न करितां नुसतेच स्तुतिपाठक बनून तीस उदार आश्रयानें उत्तेजन देणें हें होय. आज या देशाचा इतिहास इतर राष्ट्रांपेक्षां फार प्राचीन आहे. व तेव्हांपासून तो अनेक अनुकुल व प्रतिकुल संकट परंपरांतून व स्थित्यंतरांतून एक धर्माचाराचे बलावरच टिकून राहिला आहे असें अलिकडील इतिहासावरूनसुद्धां स्पष्ट दिसून येईल. इतर राष्ट्रांचे उन्नतीचे मार्ग व ध्येयें पाहून येथील पुढारी आतांपर्यंत आपआपले बुद्धीनुरूप त्या त्या देशांचीं उदाहरणें पुढें ठेवून उन्नतीचे मार्गाचा उपदेश व प्रयत्न करीत आहेत व त्यांची प्रवृत्ती पाहून आमचे शास्त्री पंडितही वेदाचे श्रुत्यादि दाखले काढून त्यांचे इच्छेस व प्रवृत्तीस अनुकुल असे अर्थ करून त्यांचे संतोषार्थ जनतेस व्याख्यानांत आपले उद्गार प्रदर्शित करीत आहेत. पण स्पष्ट व सरळ न बोलतां मनधरणीखातर बोलतात हें आश्चर्य आहे. वास्तविक

---

created for him simple plenty, and a scheme of democratic life, in which all are co-ordinate parts of one undivided and indivisible whole, the provision and respect due to every man in it, being enforced under the highest religious sanctions, and every calling perpetuated from father to son by those cordial obligations on which the whole heir-archy of Hinduism hinges. India has undergone more religious and political revolutions than any other country in the world, but the village communities remain in full municipal vigour all over the peninsula. Scythian, Greek, Saracen, Afgan, Mongal and Maratha have come down from the mountains and Portuguese, Dutch, English, French and Dane up out of its seas, and set up their successive dominations in the land, but the religious trade union villages have remained as liftle affected by their coming and going as a rock by the rising and falling of the tide.

**Sir George Birdwood.**

( मोहनीकृत तेजस्वी शिक्षण पान १०० )

वेदविहित कर्माचा--नुसते स्नान-संध्यादि पंचमहा यज्ञांचीही--जेथें जरूर वाटत नाहीं तेथें स्वमत पुष्ट्यर्थ वेदाकडे वळणाऱ्यांची तारीफच करावी दुसरें काय ?

रोगाचीं लक्षणें व कारणें एकच असतात. परंतु त्यांवर औषध योजना ह्मणजे रोग निवारक प्रयत्न रोग्याचे बलाबलावर व हवापाण्यावर अवलंबून भिन्न भिन्न असतात. ह्मणून जर्मनी, जपान, अमेरिका वगैरे देशांस त्यांचे उन्नतीस जीं कारणें व परिस्थिती कारण झाली तींच इकडे लागू पडतील हा समज यथार्थच होईल असें ह्मणण्याचें आम्हीं धाडस करीत नाहीं. उलट या देशाचा अवनति काळ येतो तेव्हां देशोद्धार करण्यास मीं अवतीर्ण होतों ह्मणून भगवान ह्मणतात. परंतु येऊन करतात काय हें पाहिलें पाहिजे. कारण तेच राष्ट्रोद्धारक प्रयत्न होत. ते म्हणतातः--" परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम् ॥ धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ " ह्मणजे अवताराचा हेतु धर्मास परिस्थितीनुरूप नवीन वळण देण्यास नव्हें, शिक्षण-संस्था स्थापण्यास अथवा यांत्रिक सुधारणा करण्यास नव्हे, असें ते म्हणतात. मग याचें कारण काय असेल तें त्यांनीं न दिल्यामुळें त्यांनांच माहीत. परंतु हा काळ फार दिवसांचा व गीता व्यासांनींच रचिली. कारण एवढी गीता सांगण्यास भगवंतास वेळच नव्हता. ठीक आहे; अधुनिक काळांतच ज्यांनीं प्रत्यक्ष राजकारण केलें व ज्या यवनाक्रांत भूमींत जीवितही धोक्याचें जाहलें होतें, किंबहुना धर्मांतर हेंच जीवित-रक्षणाचें साधन झालें होतें; त्या वेळची स्थिती म्हणजे राष्ट्राचे आपत्तीचीच; ह्मणजे राष्ट्र लयास जाण्याचीच वेळ ह्मटल्यास हरकत नाहीं. अशा स्थितीचें कारण व परिस्थिती रामदास धर्माच्याच भाषेंत ह्मणजे धर्म-ग्लानीचे शद्बांनींच वर्णन करितात. " जिकडे तिकडे कली मातला। धर्म अवघाच बुडाला ॥ " " ब्राह्मणीं सांडिला आचार " वगैरे धर्माचार लोपानेंच करितात. स्पष्ट शद्बांतच त्यांचें मत पाहिजे असल्यास तें असें आहे.

" सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील तयाचें । परंतु येथें पाहिजे । अधिष्ठान परमेश्वराचें ॥ ".

तिसरा दाखला कलियुगांतीलच म्हणजे ज्ञानेश्वर कालिन. या सत्-पुरुषाबद्दल आज भरत-खंडांत जेथें जेथें त्यांची माहिती आहे तेथें तेथें पूज्यभावच आहे. ते काय म्हणतातः– " जैसें गतायुषीं शरीरीं । चैतन्य अधिवासु न करी । कां निदैवाचे घरीं । नराहे लक्ष्मी ॥ ३–१०९ ॥ तैसा स्वधर्मु जरी लोपला । तरी सर्व सुखाचा थारा मोडला । जैसा दीपासवें हरपला । प्रकाशु जाय ॥ २ ॥ तैसी निजवृत्ती जेथ सांडे । तेथ स्वतंत्रते वस्ती न घडे । आईका प्रजाहो फुडें । विरिंचि ह्मणे ॥ ३ ॥ ह्मणूनि स्वधर्मु जो सांडील । तयातें काळू दंडील । चोरु म्हणूनि हरील । सर्वस्व तयाचें ॥ ४ ॥ मग त्रिभुवनींचीं सर्व दुःखें । आणि नानाविध पातकें । दैन्य जात जितुकें । तेथेंचि वसे ॥ ५ ॥ जैसें जळचरां जळ सांडे । मग तत्क्षणीं तया मरण मांडे । हा स्वधर्मु तेणें पाडें । विसंबू नये ॥ ६ ॥ आतां कोदंड घेऊनि करीं । आरूढ पा इये रथीं । देई आलिंगन वीरवृत्ती । समाधानें ॥ ७ ॥ जगीं कीर्ति रूढवी । स्वधर्माचा मानु वाढवी । इया भारापासूनि सोडवी । मेदिनी हे ॥ ८ ॥ "

यांत आमच्या मतें राष्ट्राचे अवनतीचें कारण, त्याच्या अभ्युदयाचा प्रयत्न, अवनतीचा परिणाम वगैरे सर्व राजकारणाचा खुलासा झाला आहे. आतां स्वधर्म व निजवृत्ती हे दोनच शद्ब समजण्यास यांत कठीण आहेत. परंतु त्याचें विवेचन करण्यास बरींच पानें या पुस्तकाचीं एकाच शद्बाच्या अर्थ करण्यांत जातील. शिवाय तो आजचा मुख्य विषयही नाहीं. परंतु एवढ्यावरून इतका बोध होऊं शकतो कीं, धर्माचार व स्वधर्म-कर्म–कर्तव्य–म्हणून कांहीं आहे व तें योग्य न बजावल्यामुळें किंवा तिकडे दुर्लक्ष केल्यामुळें व्यक्तिशः किंवा राष्ट्रीय

२७९४

आपत्ती–पराधीनता–येते. व एवढेंच दाखविण्याचा येथें उद्देश आहे.

परंतु श्री ज्ञानेश्वर महाराजांचे वेळीं हा यांत्रिक सुधारणा व नवीन संस्कृती नव्हती तेव्हां अशा स्थितींत देश सुधारणेचा युक्तमार्ग कोणता ? याचा स्पष्ट उल्लेख नसल्यामुळें अजून कोणी साशंक असल्यास खालील पाश्चात्य * पंडितांची ( मेसर्स आरनॉल्ड व सेजविक साहेब )

---

* प्राचीन संस्कृतीस युरोपियन संस्कृतीकडून कसें नमविलें जातें तें " इंडियन फॉल्टस् एन्ड इंग्लिश कॉलमनीज " या पुस्तकांत आरनॉल्ड साहेबांनीं लिहिलें आहे:–

( रा. मोहनीकृत तेजस्वी शिक्षण पान १३६ )

No amount of slippery rhetoric can disguise the fact that the aims, hopes, fears, desires, loves and hates of an Asiatic & a European are opposed the one to the other. So long as we are in this country, our history will consist in making the Asiatic view of life bend to the European. If this is tyranny, let us be gone. But if we stay, let us have no hypocrisy. We cannot and ought not to look on life with Asiatic eyes, Our tendency is, and must be to Europeanise. Toleration, sympathy, tact may help, as they have helpad, to make this process less obnoxious, because less palpable to the natives. But the process goes on and will go on. And with the people which has to yield to it, it never can and will never be popular.

**Arnold.**

" इंडिया फॉर सेल " या पुस्तकांत सेजविक साहेब ह्मणतातः—( हिंदुस्थानची व्यापार-सूत्रें इंग्रजी व्यापाऱ्यांचे हातांतून गेल्यास काय स्थिती होईल त्यासंबंधीं ) वरील पुस्तकांतील पान ३६.

We do not appear to realise the fact that the loss of India will assuredly deprive us of all our eastern trade. and yet it is easy to see that it will be so; for not only will the marts of India be closed against us if we lose it, as firmly closed against us as are those of central Asia now – but besides this, India, with its raw produce and its people skilled in manufactures from the old, will soon, under a syftem of protection become a great manufacturing nation–will soon with its cheap labour and abundant supply of raw materials supplant us through the east.

ह्यांचे-सुधारणेचे कट्टे भक्त व पाश्चात्य संस्कृतीवरच ज्या देशाचें जीवन आहे. त्याच लोकांचे-लेखांतील उतारे पहा व त्यावरून कांहीं बोध होत असल्यास घ्यावा नच झाल्यास सर्वांत शेवटचा मार्ग अर्जुनास भगवंतांनीं सांगितलाच आहे. "यथेच्छसि तथा कुरु" इतकेंच या संबंधीं आह्मीं सांगून पुढील निरुपणास लागतों. कारण यांतील सर्वच विषय जवळ जवळ गुंतागुंतीचे परस्पर मतभेदानें युक्त व आत्मप्रवृत्तींचे पोषक असे असल्यामुळें हल्लींचे पद्धतीप्रमाणें त्यांचे रुचीप्रमाणें निरुपण --मार्ग व ध्येयें--असल्यास ठीक पडते. परंतु आमचा हेतू जें युक्त दिसेल तें सरळ सांगण्याचा आहे. व दुसरे प्रत्येक विषयास स्वतंत्र स्थळ पाहिजे. परंतु इतक्याच जागेंत सर्वांची थोडी फार सोय करण्याची असल्यामुळें वस्तुस्थितीचें दिग्दर्शन आह्मीं करीत चाललों असें समजावें परंतु सरते शेवटीं या संबंधीं एवढेंच सांगतों कीं, समर्थांचे वेळेपासून आमचे पूर्व संस्कृतीवर परिणाम परकीय स्वाऱ्यांमुळें होऊं लागले. त्यांच्या कारकिर्दींत मोठमोठ्या जागा मिळवून नौकरी करण्याची प्रवृत्ती ब्राह्मणांची सुरु झाली त्यामुळें स्वधर्माचें महत्व नष्ट होऊं लागलें. ती स्थिती वर वर्णन केलीच आहे. ह्मणजे दूपभाव-- मत्सर-स्वार्थपरायणता वगैरे परंपरेचें बीजारोपण या वेळेस झालें. समर्थांससुद्धां आपले कडून राष्ट्र अभ्युदयाचें कार्य होईल किंवा नाहीं ही शंकाच होती किंवा झालें तरी तें टिकाऊं होणार नाहीं. कारण ही निजवृत्ती ब्राम्हणांची बिघडण्यास सुरवात झाली यावरून ती उत्तरोत्तर स्थिती शोचनीयच होणार हें त्यांचें त्याच वेळीं लक्षांत आलें. कारण यास भविष्य-ज्ञानाची किंवा ज्योतिषाची जरूर नाहीं. सिद्धांत कोणताही असो, तो ठरीव सिद्धांत; व कमीजास्तपणा झाला कीं, परिस्थिती बिघडणें हा त्याचा नैसर्गिक परिणामच आहे. व तोच सिद्धांत वरील ज्ञानेश्वरांचे ओवींत आहे. असो, या प्रमाणें भविष्य म्हणजे समाजाची भवितव्यता कठीण होणार एवढेंच नव्हे तर त्याच वेळीं त्यांचे

सारखाच प्रभावशाली पुरुष झाला ह्मणूनच तारण झालें. हल्लींसारख्या समाज पुढाऱ्यांवरच जबाबदारी पडली असती तर तोही दोनशें वर्षांचा काल आज निराळाच दिसला असता. त्यांचे शब्दांतच वरील म्हणण्याचें प्रतिबिंब दिसत आहे. म्हणजे इतकें उद्वेगजनक तें वाक्य आहे; तें असें " कैसीं ब्राम्हण्यें वांचतील " येथें ब्राम्हण्यें हा लाक्षणिक शब्द आहे यावरून सर्वच वर्णांचा बोध घेण्याचा आहे. कारण सिद्धांतच असा आहे कीं, जूं तुटलें कीं गाडी पडणार, गाडी पडली कीं आंतील माणसेंही पडणारच. किंवा एंजीन बिघडलें कीं मागील डबे पडणार–त्यांची गती कुंठीत होणारच.–तद्वत ब्राम्हणवर्णाची अवनती किंवा आचाराचा लोप झाला ह्मणजे इतर वर्णांची अवनती ओघानेंच प्राप्त होते. आचार लोप झाल्याशिवाय अवनती होणें शक्य नाहीं. * अशी ही योजनाच आहे. आतां त्याप्रमाणें त्यांचे हयातींत त्यांनीं धर्म स्थापना व राज्य स्थापना तर केली. परंतु आचार स्थापना करण्यास वेळ मिळाला

---

* श्री रामचंद्रास रावण वधाचें संकट पडलें व त्याचें कारण श्री शंकराची प्रसन्नता मिळवून त्यांचें दर्शन झाल्यावर त्यांनीं व्यक्त केलें. ते म्हणतातः—

श्री राम उवाच–" तत्र लंकाभिधं दुर्गं । दुर्जयं देवदानवैः ॥ अनेक कोटयस्तत्र । राक्षसाबलवत्तराः ॥ ५–२५ ॥ शिव गीता.

परंतु विशेष अडचण कोणती ?

सर्वे स्वाध्यायनिरताः । शिवभक्ताः परायणाः ॥ अनेक मायासंयुक्ता । बुद्धिमंतोऽग्निहोत्रिणः ॥ २६ ॥ कथं एकाकिनाजेया मया भ्रात्राच संयुगे ॥ २७ ॥

त्यावर शंकर उत्तर देतात.

रावणस्य वधेराम । रक्षसामपि मारणे । विचारोनत्वया कार्यः । तस्यकालोऽयमागतः ॥ २८ ॥

[ कशामुळें ] अधर्मेतु प्रवृत्तास्ते । देवब्राह्मणपीडने ॥ तस्मात् आयुः क्षयं यातं । तेषां श्रीरपि सुव्रत ॥ २९ ॥ अधर्मनिरतः शत्रुः । भाग्येनैव हि लभ्यते ॥ "

[ यांत बऱ्याच गोष्टींचा खुलासा होत आहे. ]

नाहीं. कारण मठ स्थापनेचें काम पुरें होतें न होतें तों शिवछत्रपतींनीं राम ह्मटला. पुढें चिरंजीव शूर, दक्ष व बापापेक्षां सवाई होते. " कुसंगें नाडला साधू जैसा " ह्मणून तुकाराम महाराज ह्मणतात त्याप्रमाणें तो कामांतून गेला. त्यामुळें समर्थांनीं अवतार पूर्ण केला, व त्याबरोबरच लोकसंग्रहाची ज्योत मावळली. कारण पुढें कोणी वीर्यवान ह्मणजे धार्मिक–आत्मिक– तेजानें युक्त असा निपजला नाहीं. कारण हा जन्म इतर सामान्य मनुष्यप्राण्याप्रमाणें सहज व सुलभ प्राप्त होणारा नाहीं, " अथवा योगिनामेव कुले भवति धीमतां ॥ एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशम् ॥ भ. गीता ६–४२ ॥ असो.

इकडे स्वराज्य कारभार जरी होता तरी मनोभूमींत रूढ झालेलीं बीजें अंकूरदशेंत येतच होतीं व त्यांचे परिणाम त्या वेळेसही दृष्टीस पडतच होते. एरव्हीं पानिपतचे लढाईंत पराजय होण्याचें काय कारण? पुढें राघोबादादा, बापू गोखले वगैरे तत्कालिन सरदारांत परस्परांविषयीं स्पर्धा–अहमहमिका–सुरूच होती. त्यांत परकीय कंपनीचें आगमन, त्यांचें एतद्देशीयांस वैभवाचीं वचनें, व जास्त पगार बढती वगैरे अमिषांस ते भुलून कृष्ण कारस्थानास उद्युक्त होऊनच ह्मणजे आचार लोपानेंच स्वराज्य गमावण्याचा काल आला. व नंतर तर महाविद्येचा प्रभाव व सुधारणेचें इंजेक्शनानें आजची स्थिती सर्वांसमोर आहेच. याप्रमाणें अलीकडील इतिहासाचीं नुसतीं वरवर पानें चाळणाऱ्यांचेसुद्धां या अवनतीचें कारण लक्षांत येण्यासारखें आहे. येथें धर्माचा प्रश्न तर विचारांत घेतलाच नाहीं. फक्त एक लोभ –स्वार्थ–म्हणजे नैतिक ऱ्हास याचाच हा प्रभाव! म्हणून ब्राम्हणांनीं राज्य गमाविल्याचा आरोप त्यांचे एकट्यावरच इतरांनीं करण्यांत अर्थ नाहीं. व त्यांनींच गमाविलें असेंही धरून चाललों तरी वडिलांनीं स्वकष्टार्जित इस्टेट मिळविली ती त्यांनीं आपले हातांनीं गमाविली ह्मणून मुलास वाईट वाटण्याचें व त्यांस दोष देण्याचें काय कारण! तद्वत

ब्राम्हणांनीं मिळविलेलें--रक्षण केलेलें व वाढविलेलें--त्यांनींच गमाविलें यांत इतरांचें काय बिघडलें ? ( शिवछत्रपतीनें समर्थांचे झोळींत सर्व राष्ट्र दान--दानपत्र--दिल्याचें प्रसिद्धच आहे. ) म्हणून या मागील गोष्टी बऱ्यावाईट कशाही असोत त्या विसरून सध्यां सर्वांचेंच हिताहित ज्यांत आहे अशा बद्दल प्रत्येकाचें कर्तव्य काय हें सर्वांनीं मिळून प्रेमानें व सहानुभूतीनें विचार करणें अत्यंत जरूर आहे. " परंतु एवढी मोठी गोष्ट विसरणें शक्य नाहीं. " असें कोणी समजत असल्यास शक्य आहे. कारण ज्या परकीय व्यापारी मंडळींनीं एतद्देशीयांस परावलंबनेंत गोंविलें व आपण पुनः व्यापारास मोकळे झाले; त्यांचें हें कृत्य कीं, ज्यांतून आज मुक्त होऊन स्वावलंबनाचा मार्ग शोधण्याच्या विचारांत सर्व राष्ट्र पडलें ही लहान गोष्ट नसतां आपण विसरून उलट त्यांचे स्तुतिपाठक बनून गोडवे गात आहों. त्याच न्यायानें त्याच्याही पलीकडच्या काळांत झालेली गोष्ट विसरण्यास हरकत व अडचण कोणती ?

आतां ही गोष्ट खरी आहे कीं, त्यांनीं अशा रीतीनें एक प्रकारचा आमचेवर अनुग्रहच केला; कारण त्यापासून बराच बोध व पुढील प्रसंगीं उपयुक्त असा अनुभव आपणास मिळाला ही कांहीं लहान गोष्ट नाहीं. शिवाय त्यांचा पुर्वींचे जुलमी राजांप्रमाणें कांहीं त्रासही नाहीं, ते येथें कायमचे राहतसुद्धां नाहींत मग येथील लोकांत मिसळणें, इस्टेट करणें हें तर दूरच राहिलें. हें निरपेक्षतेचें उदाहरण झालें व धर्माचे बाबतींत पूर्ण तटस्थता इतिहासांत परकीय अमलांत नमूद नाहीं. या शिवाय व्यापार, उद्योग, शिक्षण वगैरे बाबतींत अनंत फायदे, सोयी व लाभ आपणास झाले व होत आहेत तेव्हां अशा स्थितींत परावलंबनाचें विशेषसें महत्व नाहीं. व हें समजूनच आह्मीं कृतज्ञतेनें तें सर्व विसरून त्यांचे आभार मानींत आहोंत. हें आमचे संस्कृतीस अनुरूपच आहे.

परंतु आह्मीं तरी अजून हा संबंध तुटावा अशी कोठें इच्छा करितों ? उलट आमचा हल्लींचा प्रयत्न ह्मणजे वस्तुतः हा उभयतांचा संबंध अधिक दृढ व अखंड कायम ठेवण्याचा आहे. फक्त पूर्वींचे आमचे संस्कृतीस अनुसरूनच हा आजचा प्रयत्न आहे. पूर्वीं क्षत्रियांत वारंवार यज्ञाचे मिषानें वगैरे युद्धप्रसंग होत होतेच. त्यावेळेस जेत्यानें फक्त आपलें प्रभुत्व–स्वामित्व--त्यांजकडून कबूल करवून घ्यावें व तत्प्रीत्यर्थ दरसाल खंडणी घेत जावी. बाकी त्यांचे अंतस्थ राज्यव्यवस्थेंत, कायदे कानूंत, धर्मकर्मादि बाबींत व व्यापारविषयक हिताहितांत ते लक्ष देत नसत, व यामुळें उभयतांसही सोईस्कर पडत असे. उभयतांस प्रसंगविशेषीं परस्परांची मदत होत असे. व मांडलिकांची संख्या जास्त होऊं लागल्यास तितका त्रास स्वतः सार्वभौमराजास घेण्याचें कारण न पडून स्वतःचे राष्ट्राचा उत्कर्ष करण्यास व व्यवस्था ठेवण्यास सुलभ पडत असे. व तीच परंपरा–चालत आलेली व्यवस्था–राहाणे हेंच बहुतेक आजकालचें स्वराज्य मागणीचें तत्व असावें असा आमचा समज आहे. असो.

मूळ विषय दूर राहून आचार विषयच वाढत चालला याजबद्दल आह्मांसही मधून मधून आठव होतो. परंतु शेतकरी हा विषय बहुतेक आटोपल्यासारखाच आहे व आचार विषय व्यापकच असल्यामुळें तो कितीही आटोपता घेऊं ह्मटलें तरी जुळत नाहीं. वास्तविक आमचा मूळ विषय एकच–शेतकरी–परंतु तो प्रतिपादन करतांना आचार धर्माची जरूर पडणार हें जाणूनच आह्मीं सदर लेखास तसें नांव देऊन ठेविलें आहे. परंतु त्यांतील गौण विषयांसही अनेक शाखा फुटल्या. तेव्हां “ राजा शिकारीस गेला ” या शब्दानें जसा पारधी एकटाच जाळें खांद्यावर टाकून किंवा एखादा कुत्रा बरोबर घेऊन जातो तसा एकटाच राजा गेला असें न समजतां आपले सर्व परिवारासह तो गेला असें जसें समजणें, तद्वत हा आचार विषय समजावा.

हल्लींचे जनतेची स्थिती इतकी नाजुक व बिकट झाली आहे कीं, आज हिंदुसमाज जिवंत राहणेंच शक्य आहे किंवा नाहीं अशी पुढाऱ्यांस भीति प्राप्त झाली आहे व ती एका दृष्टीनें खरी आहे. तेव्हां प्रत्येक व्यक्तीनें त्याची जाणीव करून घेऊन व त्या करितां पूर्व निरुपणाप्रमाणें स्वार्थबुद्धीचें नियमन करून उदात्त कल्पना व उच्च ध्येय पुढें ठेऊन प्रत्येकानें प्रत्यक्ष कार्य करण्यास पाऊल पुढें टाकणें इष्ट आहे. व्याख्यानाचें कार्य आमचे मतानें झालें आहे. कारण तितकी जागृती कर्तव्याबद्दल जनतेची झाली व कांहीं अवशिष्ट राहिली असल्यास ती वृत्तपत्रें करितातच. परंतु कार्य काय करण्याचें हें त्यांजपुढें मार्गदर्शिकत्वाचे दृष्टीनें आज नसल्यामुळें त्यांनीं काय करावें हा प्रश्नच आहे. जो उठतो तो बुद्धीच सांगतो व प्रत्येक कार्यांत इच्छित फलप्राप्तीस परमेश्वरी अधिष्ठानाची जरूर असल्यामुळें या बाबतींत काय करणें उचित आहे हेच दोन प्रश्न आज विचारांत घेण्यासारखे आहेत. पहिले प्रश्नासंबंधीं उपाय योजना--कार्यारंभाची दिशा--शेवटीं याच लेखांत दिली आहे. दुसऱ्या प्रश्नासंबंधीं आचार प्रतिपालन हेंच कर्तव्य असल्यामुळें याचा विचार आह्मीं यांत करीतच आहों, व याच हेतूनें आमचे सर्व व्यवहारास--कर्मास--साधनास--किंबहुना कायद्यासही पूर्व संस्कृतींत धार्मिक स्वरूप देण्यांत आलें होतें. व यांत पूर्वजांची दूरदृष्टी दिसून येते.

समर्थांनीं शिवछत्रपतीस मठ स्थापनेची आज्ञा केल्याचें मागें लिहिलेंच आहे ह्मणजे याच मार्गाचे अवलंबनास सुरवात केल्याचें दिसून येतें. त्या मठांचे उद्देश, त्यांचें कार्य वगैरे संबंधीं सर्व खुलासा त्यांचेच शद्बांत--दासबोधांत--आज जनतेसमोर आहे; व हा पुरुष अगदीं आधुनिक कालांतलाच असल्यामुळें व त्याचें ध्येयही हेंच असल्यामुळें त्याचें मार्गदर्शिकत्व पत्करण्यास कोणासही अनमान

वाटणार नाहीं. आतां याचें अवलंबन आह्मीं करीत नाहीं असें नाहीं. त्याचे मनाचे श्लोक ह्मणत आह्मीं स्वयंसेवकांकडून झोळी फिरवितों. शिवाजी, बाजीराव वगैरे पुण्य-विभूतींचे जयंत्यादि महोत्सव करितों. परंतु आमचे कृतीचा–कर्माचा–आचरणाचा–परिणाम अनुकूळ असा जनतेवर होत असल्याचें दिसत नाहीं. याचीं कारणें दोन आहेत. एकतर जनतेची स्वार्थावर व तत्सदृश गुणांचे ठिकाणीं दृढ आसक्ती व आतांपर्यंतचा त्या मनोवृत्तीवर पगडा. दुसरें, उपदेशकाची ती निवृत्त करण्याइतकी बलवत्तर प्रतिक्रिया करणाऱ्या शक्तीची कमतरता. तेंच समर्थांच्या शद्बांत सांगणें ह्मणजे " परंतु त्यांची निष्ठा कांहीं तैशी नसे " यास दुजोरा तुकाराम महाराजांनींही दिलाः–" जेणें सावन मात्रा घ्यावी । तेणें पथ्यें सांभाळावीं ।। " नाहींतर उपयोग होत नाहीं दुसरें काय? समर्थच एकदां ह्मणतातः–" ब्राह्मणाची मुख्य दीक्षा मागितली पाहिजे भिक्षा " जसें रसायन किंवा बचनाग औषध ह्मणून घेतात. परंतु ते पचवितां आले पाहिजेत. नाहींतर नुकसान होतें. तसेंच ती भिक्षा आचारयुक्त असली ह्मणजे वैराग्य प्रभाव प्रगट होऊन जनतेवर परिणाम घडतो. नाहींतर " भिक्षापात्र अवलंबणें । जळो जिणें लाजिरवाणें ।। " म्हणून दुसरे ठिकाणीं तेच म्हणतात. वास्तविक खरें आहे. हजारों जटाधारी, ब्रम्हचारी व भिक्षेकरी रेल्वेत धक्केखात प्रवास करीत श्रीमंतांचे दारीं पडलेले दिसतात. परंतु त्यांस उदरंभरण करणें असतें. तशी आज या स्वयंसेवकांची गोष्ट नाहीं. आज वऱ्हाड प्रांत किंवा हिंदुस्थान इतका निर्धन झाला नाहीं. कीं, देशाचे राष्ट्रकार्याकरितां त्याच्या भावी पिढीस गळ्यांत भिक्षेची झोळी घालून मुष्टिफंडाचे रूपानें मुष्टि मुष्टि धान्य गोळा करण्याची पाळी यावी ! व तेवढ्यावर–भिक्षेवर–देशकार्याकरितां राष्ट्रनिधीची कल्पना ठरविणें हें थोडेसें विलक्षण दिसतें.

आज वऱ्हाड इतका निर्धन नाहीं. अजून धनिक व व्यापारीवर्ग

सुस्थितींत आहेत. एवढेंच नव्हें तर एकंदरींत जनतेकडूनही नाटकें, सिनेमा वगैरे कंपन्यांस उदार आश्रय मिळत आहे. वारुणी, तमाशे त्याच प्रमाणें या वर्गांत मोडणारीं इतर व्यसनें सर्वत्र दिसून येतात. व त्यांस अवश्यक द्रव्याचा पुरवठा जनतेकडून होतच आहे. तसेंच नैसर्गिक गरजांशिवाय इतर सुख-सोई, करमणुकीच्या खेळाच्या वस्तू खरेदी करण्यास आमचे जवळ अजून पैसा आहे अनवश्यक व जरूर अशा कामाशिवाय केवळ चैनी करितां फिरणाऱ्यांचीही संख्या कमी नाहीं. व त्यामुळें रेल्वे, ट्रॅम, मोटार वगैरे हल्लींची विद्यमान संख्याही अपुरी पडत आहे. व त्यायोगानें सर्वांतच इतकी गर्दी होत आहे कीं, बसण्यासच नव्हें तर उभें राहण्याससुद्धां जागा मिळत नाहीं अशा स्थितींत पुरुषांसतर असो परंतु स्त्रियांस व मुलांस जी गैरसोय व तकलीफ होत आहे त्याची सर्वांसच जाणीव असल्यामुळें विशेष लिहिण्याचें प्रयोजन नाहीं. तसेंच वरील प्रवासानें चहा, हॉटेल व इतर फराळाचे व फलादिकांचे खरेदींत बराच पैसा खर्च होत आहे. परंतु तोही खर्च करण्यास अजून आह्मांस शक्ती आहे. फक्त धर्माचे बाबतींत, सार्वजनिक कार्यास, परस्पर सहकार्यांस व राष्ट्रकार्यांसच त्याची तूट पडली हें कोणास सत्य वाटेल? परंतु याही बाबतींत धर्मानें योजना करून ठेविली आहे ती ही कीं, तें एक कर्तव्यच प्राणिमात्रांचें ह्मणून ठरवून दिलें आहे. धार्मिक दृष्ट्याच नव्हें तर व्यवहार दृष्ट्याही तें करणें प्रत्येकास जरूर म्हणून सांगितलें आहे. व तें पुढील शद्बांत सांगतां येईल. “अनुकुलता असून याचकाची किंवा कोणाचीही इच्छा न पुरविणें हा अधर्म होय.” यांत सार्वजनिक कार्याची दृष्टी आहेच. परंतु व्यक्तिमात्रापर्यंतसुद्धां त्याची व्याप्ती आहे हें उघडच होत आहे. ह्मणून सार्वजनिक किंवा राष्ट्रीय कार्याकरितां या पुढें भिक्षावृत्ती न ठेवितां तो राष्ट्राचा हक्क ह्मणून प्रत्येकाचे उत्पन्नाचे अत्यल्प मानानें म्हणजे दरमहा साठ रुपये मिळविणारावर दर रुपायास

एक पैसा या मानानें सरासरी प्रमाण दरमहा एक रुपाया पडणार तो कोणास असह्य होईल असें वाटत नाहीं. कारण इतकी धर्मबुद्धी आज नष्ट झालेली नाहीं. परंतु इतक्या अल्पल्प सहजसाध्य कर्तव्यास प्रत्येक जण जागल्यास राष्ट्रनिधी थोड्याच कालांत कल्पनातीत होईल. एवढेंच नव्हे तर इतर धार्मिक बाबी ह्मणजे देवस्थानची दुरुस्ती, उत्साह, जयंती, गोरक्षण, विद्यालयें, वेदशाळा वगैरेकरितां जे अनेक लोक फिरतात म्हणून " सर्वच वर्गणी मागणारे झाले " अशी लोकांची ओरड ऐकण्याचीही जरूर पडणार नाहीं. कारण कोणीही परस्पर वर्गणीकरितां जाऊं नये व गेल्यास कोणी देऊं नये. असें ठरल्यास ज्यास जरूरच लागेल तो या निधीचे व्यवस्थापकाकडेसच येईल. व त्याचा कार्यभाग व महत्व जाणून काय ती त्याची संभावना या व्यवस्थापकाकडून होत गेल्यास कोणासही निराश होण्याचें कारण पडणार नाहीं. करितां प्रत्येक ठिकाणीं " राष्ट्रफंड " म्हणून एक मुख्य संस्था स्थापन करून तिच्या शाखा, उपशाखा करून त्यांचा परस्परांशीं संबंध जोडून संघटना ठेवावी. हा फंड अर्थात चार प्रकारचा होईल. गिरणीत किंवा स्टेशनवर काम करणाऱ्या रोज मजुरांपासून तों व्यापाऱ्यांचे वार्षिक उत्पन्नापर्यंत दैनिक, साप्ताहिक, मासिक व वार्षिक अशा चार प्रकारचा होईल. व प्रत्येकानें स्वतः होऊन तो आणून दिल्यास व इतकी स्वल्प राष्ट्रकार्याची जाणीव व सहानुभूति दाखविणें ह्मणजे कठिण आहे असें नाहीं. व तशी ती ठेवल्यास वसुलीचा त्रास व खर्चही वांचून तितकीच बचत ह्मणून मदतच होईल. परंतु प्रथमतः स्वयंसेवक मंडळाची आवश्यकता आहेच. वास्तविक या राष्ट्रफंडास कायमचें स्वरूप येण्यास व त्याचें कार्य सुरळीत व नियमितपणें चालण्यास पगारी पद्धतिचीच योजना होणें उचित आहे. परंतु प्रथमतः स्वयंसेवकांकडून सदर कार्य सुरू होऊन फंडास सुस्थिती येतांच त्यांसच पगारी करितां येईल.

आतां आचारधर्माचें महत्व व सामर्थ्य यांची कल्पना होण्यास एक कथाभाग सांगतों. परंतु त्याचे पूर्वी एवढें सांगितलें पाहिजे कीं, तो एखाद्या पाश्चात्य पंडिताचा किंवा तत्ववेत्याचा चरित्रभाग नसून प्राचीन कालचा आहे. ह्मणून तेवढ्यावरच अधुनिकांनीं उत्साह रहित होऊं नये. कारण एकतर मला अधुनिक परकीय तत्वज्ञांचा विशेष परिचय नाहीं. परंतु तितक्यानें विशेष बिघडतें असें मात्र नाहीं. कारण एखादे खेडेगांवांत राहणाऱ्या एखाद्या सुखवस्तु गृहस्थाकडे शहरांतील खाद्य पेयांची संवय असलेला पाहुणा आल्यास तो त्याचे शक्तीप्रमाणे व विद्यमान व स्थानिक मिळणाऱ्या वस्तूंनीं त्याचें आदरातिथ्य करण्यास उत्सुक असतो व करितोही. ह्मणजे साखर खाणारे पाहुण्याचा सत्कार गुळावरच करील. परंतु पाहुणा जर तत्वग्राहक असला तर तो त्याचे आदरबुद्धीवरच तृप्ती मानील. व तसा तो संतुष्ट झालेला पाहून त्यासही समाधान वाटेल. पण तो जर " यथा गृहे तथा वने " जसें घरीं तसें दारीं मिळालें तर ठीक नाहींतर तब्येत जाते अशापैकीं असला तर त्यास विषाद वाटतो. परंतु त्यास या गृहस्थाचा काय इलाज ? त्यानें आपलें कर्तव्य केलें व त्याबद्दल हॉटेलकीपर प्रमाणें बीलही त्यास देण्याचें नसल्यामुळें त्यास वाईटही वाटण्याचें कारण नसतें. जेथें आमचे देव पितरसुद्धां " यथा मिलितोपचार द्रव्यैः " किंवा स्पष्ट सांगणें ह्मणजे " वयं यदन्नाः पितरस्तदन्नाः " यावरच संतुष्ट होतात व धर्मशास्त्रही त्यास संमतें देतें. तेथें अतिथीस तोच न्याय लागू केल्याबद्दल तो दोषी होत नाहीं. या न्यायानें विद्वज्जन प्रसन्नतेचा आमचा हेतु आहे. परंतु त्या करितां दुसरीकडे याचना करण्याची विशेष आज जरुरीही दिसत नाहीं. कारण एकतर त्यांचे समाधानापुरता किंबहुना जास्त संग्रह या वाङ्मयांत आहे. मग घरीं अनुकुलता असल्यावर शेजारीं उसनें मागण्यास जाण्याचें विशेष प्रयोजन पडतच नाहीं हा व्यवहार आहे. व दुसरें त्या करितां इतस्ततः भटकणें

ह्मणजे आत्मविश्वास नष्ट करून परकीय महत्वाची स्वबुद्धीस भावना करून विपरित संवय लावण्यासारखेंच आहे, ह्मणून स्वकीयांसंबंधीं आदर, प्रेम व महत्व प्रगट होइल तर ठीकच आहे. अशा भावनेनें हा स्वदेश-प्रताप-रवीच्या मंगलदायक, बोधरूप किरणांचा प्रकाश परानुकरण तिमिरावृतबुद्धीभूमीवर पाडण्याचाही प्रस्तुत लेखाचा हेतू आहे. असो.

त्रेतायुगाचा काल:–प्रसिद्ध राजा दशरथ राज्य करीत असता एकदां असा प्रसंग आला कीं, ब्रह्मर्षि विश्वामित्र ऋषी सभेंत आले. ज्याप्रमाणें नारदमुनींचें आगमन म्हणजे कलीस भांडणास पाचरण ठरलेलें त्याप्रमाणें या महर्षींचें येणें क्रोधास मूळ पाठविणेंच होय. वासिष्ठांनीं कामधेनु स्वर्गांतून आणवून यांचें एकदां ससैन्य स्वागत केलें. परंतु तोच सत्कार त्यांचे रोषास कारण झाला. ह्मणून या वेळीं आतां काय अनर्थ गुदरेल याची राजा दशरथास चिंता उत्पन्न होणें साहजिकच होतें. परंतु त्याचें आचरण शुद्ध व सरळ, पराक्रम ह्मणजे इंद्रासही ज्याचे साह्याची अपेक्षा, ज्याचा सद्वंश म्हणजे प्रत्यक्ष सर्वप्रकाशक सूर्यनारायण हा मूळ पुरुष एवढेंच नव्हे तर ज्याची धर्मनिष्ठा म्हणजे पुत्रकामेष्टि यज्ञांत प्रत्यक्ष यज्ञनारायणानें मूर्तिमंत प्रगट होऊन पुत्र प्राप्तीचें पायसामृत दिलें, व ज्याचें तप सामर्थ्य हें कीं, प्रत्यक्ष परब्रम्ह पुत्र रूपानें ज्याचा वंशवृक्ष विशेष आलंकृत करण्यास प्राप्त झालें त्या दशरथाचें भाग्य व पुण्य प्रताप वर्णन करण्यास कोण समर्थ आहे ? अशा प्रकारें तो दशरथ राजा सर्व प्रकारें संपन्न असल्यामुळें तो विश्वामित्राचे रागास थोडाच जुमानणार होता !

एक एकादशी व्रत करणारा अंबरिष राजा गुणानें विश्वामित्राचा प्रत्यक्ष बंधूच असा जो जमदग्नि–ह्मणजे मूर्तिमंत क्रोधच– परंतु त्यासही न जुमानतां त्यासच स्वरक्षणार्थ त्रिभुवन पायाखालीं

घालण्यास लाविलें. कारण सुदर्शन चक्र मागें लागलें होतें. अशा प्रकारचे त्यावेळचे स्त्री-पुरुष व मुलें आचार संपन्न असल्यामुळें दुसऱ्याचे मदतीचीसुद्धां त्यांस अपेक्षा वाटत नसे. त्यावेळेस शस्त्रांचाही भार विशेष वाहावा लागत नसे. किंवा मिलिटरी ट्रेनिंगही घेण्याचें कारण पडत नसे. लवांकुशासारखीं पांच सात वर्षांचीं मुलें भरत शत्रुघ्न व मारुतीसारखे वीर व सेनापती यांजबरोबर दोनहात करण्यास समर्थ होतीं. नल राजास आपले पत्नीचा त्याग करण्याचा प्रसंग आला असतांही तिचें रक्षण कसें होईल ही त्यास मुळींच शंका आली नाहीं. श्रीरामचंद्रानीं प्रजेमध्यें आपणाविषयीं–आपले आचरणाविषयीं–संशय–शंका–किंवा गैरसमज होऊं नये ह्मणून आपल्या गर्भिणी पत्नीचाही त्याग केला. अशा प्रकारचा तो काल होता. आज आह्मीं यास रानटी कालच ह्मणूं. कारण स्त्रियांचा अशा रीतीनें त्याग करणें म्हणजे पाषाणहृदयीपणाचेंच द्योतक समजून त्यांच्यावर अमानुष सत्ता गाजविणारे लोकांची पशु कोटींतच गणना करूं. प्रस्तुतचा काल निराळा, तो अशिक्षित व हा सुशिक्षित काल. मग काय थोडा फरक झाला! म्हणूनच एकंदर वैभवसुखांतही त्यामानानेंच फरक राहणार. परंतु काल निराळा ह्मणण्यापेक्षां बुद्धीच निराळी. हल्लीं स्त्रिया समान दर्जाचे हक्काकरितां लायकी प्रतिपादन करून पुरुषांविरुद्ध ठराव सभांतून पास करीत आहेत. तेव्हां त्या व या बुद्धींशीं फरक राहणारच. असो,

धर्माचा व्यासंग सुटला कीं, त्या बरोबर धर्माचार सुटणें साहजिकच आहे. मग त्याचें महत्व काय वाटणार? किंबहुना सत्यतेबद्दलही शंकाच असणार.

अनेक वैचित्र्यांनीं सुंदर वनोपवनें–उद्यानें–व नैसर्गिक सृष्टिरचना व देखावे यांनीं युक्त व चंद्र-सूर्यानें प्रकाशित होणारे जगताची जन्मांधांस जशी कल्पना होणें शक्य नाहीं. तद्वत सति सावित्रीचे ठिकाणीं

प्रत्यक्ष यमधर्मासही अडवून ठेवण्याची शक्ती कशी प्राप्त झाली? गांधारीस नुसत्या दृष्टीनेंच एखाद्याची काया अमर करण्याची शक्ती कोणत्या कारणानें आली? अर्जुन केवळ बाणानेंच आपला संदेश इंद्रास कळविण्यास कसा समर्थ झाला वगैरे अनेक गोष्टींची सत्यता व कल्पना कशी येणार? चौघां जन्मांधांची गोष्ट अशी सांगतात कीं, ते फिरत फिरत ब्रह्मासंबंधीं ज्ञान प्राप्तीचा विचार करीत एका ग्रामाजवळच्या पटांगणांत आले. तेथें एक महात हत्तीस शतपावली करितां घेऊन येत असतां तो हत्ती तेथें मध्येंच बसला. व ह्या चौघां ब्रह्मजिज्ञासूंचे वाटेंतच तो आल्यामुळें एकाचा त्याचे सोंडेस, दुसऱ्याचा पायास, तिसऱ्याचा कानास व चवथ्याचा शेंपटीस स्पर्श झाला. त्या सरसा त्यांस अत्यानंद झाला व एकदम " ब्रह्म सांपडलें " म्हणून सर्वांनींच पुकारा केला. जवळच महात होता त्यास अर्थातच आश्चर्य व कौतुक वाटून तो त्यांस विचारूं लागला कीं, त्याची स्वरूप कल्पना तरी मला सांगा. तेव्हां एक ह्मणतो बगळ्याचे मानेसारखें, दुसरा ह्मणतो नाहीं खांबासारखें, तिसरा ह्मणतो नाहीं सुपासारखें, चवथा ह्मणतो नाहीं सर्पासारखें. या प्रमाणें आज या सुधारणेचे काळांत आमचे बुद्धीस सहस्र शाखा फुटून मतामतांचा गलबला होत आहे. अशा परिस्थितींत क्वचित सुखाचा लाभ कोणाचे केव्हां वांटणीस येईल तो येवो. याचा प्रत्यय आजकाल नित्य येत आहे. वर्तमानपत्रांतून सतत त्याची चर्चा होतच आहे. तसेंच व्याख्यानमालेंतूनही परस्पर विरोधात्मक विधानें होतातच; व हे सर्वच पदवीधर. परंतु एकेरीवर आले ह्मणजे वर्तमानपत्रांतून लेख लिहितांना सभ्यपणाचे भाषेसही हातीं धरणें त्यांस गौण वाटतें. परंतु वास्तविक धरण्याचें प्रयोजन तरी काय? कारण पक्षाभिमान पूर्वींच धरलेला असतो. आपला विषय सुटला, पण तो मनांतून गेला नाहीं. कारण तसें असतें तर आठव झाला नसता; तेव्हां तो सूक्ष्म रूपानें ठिकाणावरच आहे.

शिवाय अप्रत्यक्षपणें आचार निरुपणच होत असल्यामुळें प्रस्तुत विषयही विपयातिक्रमण नाहीं. परंतु त्याचेंच दुसऱ्या शाखेनें आपलें स्वरूप दृश्य केल्यामुळें तो विषय बाजूला झाल्यासारखें वाटणें साहजिकच आहे असो.

वर सांगितल्याप्रमाणें सर्वसंपन्न राजा दशरथ असल्यामुळें तो त्याची ( मुनीची ) वस्तुतः पर्वा करणारा नव्हता. व सत्याला केव्हांही मान हा आहेच. हल्लींही व्यवहारांत कर नाहीं त्याला डर काय? ही ह्मण यथार्थ आहे. बाजारांत किंवा गर्दीचे ठिकाणीं पोलीस शिपायास धक्का लागल्यास त्याची आपणास भीति वाटत नाहीं. तोच गुन्हेगार शिपायाचें दर्शनसुद्धां टाळण्यास राजमार्ग वर्ज करितो परंतु याही बाबतींत हल्लीं सुधारणा होत आहे. सरदाराप्रमाणें पोशाख करून रेल्वेंतून प्रवास करीत करीत कोठें कोणाचें घड्याळ तर कोठें ट्रंक, कोणाचें नोटांचें पुडकेंच वगैरेवर हात मारून संभाविताप्रमाणें फिरणारे लोक आज ऐकण्यांत येतात. तसेंच बनावट चेक करणारे व खोटी सही करून चेकचे पैसे आणणारेही ऐकूं येतात *

---

* इटालियन फारयान म्हणतोः—

Ferriani, the distinguished Italian criminologist, who made a special study of juvenile offenders, does not hesitate to say that " An ignorant honest man is worth a thousand educated rascals, " and that, while the elementary schools may be increasingly useful in the amelioration and the prevention of crime and criminal tendencies, exeessive education may play an important role in developing the germs of crime in children more or less degenerately affected. It is indeed, he says, the educated classes, who, in many respects, are the very worst offenders. It is hard to estimate the total effect upon society their conventionalities, white lies, opportunism, loose ideas of morals and justice, definance of law and neglect of necessary duties &c. Encyclopadia of Education.

( मोहनी कृत तेजस्वी शिक्षण पान ७९ )

परंतु त्यांचे आविष्करणांत केव्हां केव्हां निरपराध्यांसही प्रायश्चित्त मिळतें. परंतु त्यास काय इलाज ? त्यांस कोणी जाणूनबुजून त्रास देतो असें नाहीं. दहा पांच दगड मारल्यास एखादा विविक्षित ध्येय वस्तूस लागतो. ही सामान्य दृष्टिपथांतील वस्तूची गोष्ट, मग अदृश्यास गोचर करणें किती कठीण आहे याची कल्पना इतरांस होणें शक्य नाहीं. त्यांतून कायद्यानें याही वर्गास ह्मणजे स्वैर सोडलें आहे असें नाहीं. "कोणास मारहाण करितां येत नाहीं." कारवाईनेंच गुन्ह्याचा तपास लावण्याचा असतो. कारण कायद्याचें तत्वच असें आहे कीं, गुन्हा पूर्णपणें शाबीत होईपर्यंत सर्व निरपराधीच समजावे. व याच तत्वावर संशयाचाही फायदा आरोपीस मिळतो. अशा परिस्थितींत दोषाविष्करणाचें काम किती कठीण आहे याची कल्पनाच करावी. प्रत्यक्ष सर्व पुरावा असून, पोलीसांत कबुली जबाब देऊन, व मुद्देमाल स्वतः दाखवून दिल्यावरसुद्धां कोर्टांत गुन्हा नाकबूल करितां येतो. मग अशा स्थितींत या खात्याचें काम किती कठीण झालें आहे याची कल्पनाच केली पाहिजे. व अशा रीतीनें कायद्याचा फायदा घेणारांस कायद्याचे स्तुत्य हेतू पर्यायानें अशा लोकांस–गुन्हेगारांस–कांहीं अंशीं उत्तेजकच होतात. परंतु त्यास काय इलाज ? वास्तविक पूर्वींचे कायद्यांत ही जी सुधारणा झाली आहे ती खरोखरच स्तुत्य आहे. एवढेंच नव्हे तर या खात्याचा कांहींसा होत असलेला कांहीं दिवसांपूर्वींचा त्रास व त्यामुळें लोकांचा गैरसमज हे सागर ट्रेनिंग सुरू होऊन त्यांतून सुशिक्षित वर्गाची इकडेस योजना होऊं लागल्यापासून बरेच कमी झाले आहेत. व आज या बाबतींत कोणासही विशेष तक्रार करण्यास जागा आहे असें आम्हांस तरी निदान वाटत नाहीं. एवढें सांगून आह्मीं चालू कथानकाकडे वळतों.

मागें निरुपण केल्याप्रमाणें सर्वसंपन्न दशरथ राजा असतांही त्याचे ठिकाणीं यत्किंचितही अभिमान नव्हता. आजकाल थोड्याशा

अधिकारानें किंवा लक्ष्मीनें युक्त अशा कांहीं पुरुषांस स्वर्ग दोन बोटेंच उरलेला दिसतो. परंतु त्यावेळचें धर्मशिक्षणच तसें होतें. त्यांचीं मनें, शांतीचें आगर, निरपेक्षता व स्वार्थत्याग यांनीं मंडित अशा पवित्र ऋषींचे आश्रमांत सुसंस्कृत होत होतीं व बाहेरही तदनुरूपच वातावरण असल्यामुळें त्यांची मनोभूमी वयांत येण्यापूर्वीच नीतिमान, कार्यदक्ष-उद्योगी-व साहसी अशीं तयार होत असल्यामुळें विरुद्ध गुणांस प्रवेश करण्यास त्यांत रिकामें स्थलच मिळत नसे. कवी मोरोपंतानीं याचें वर्णन एकाठिकाणीं केलें आहे कीं, " मन्मति दरींत न शिरे कोप मतंगज विवेक हरी जागे ". परंतु एखादा कोंडून ठेविलेला पाण्याचा सांठा थोडीशी वाट मिळतांच जसें आपलें उग्रस्वरूप धारण करितो व तेवढ्याच सूक्ष्म विवरमार्गाचा आश्रय मिळतांच तो सबंध बांध फोडतो, किंवा बहुत दिवसांचा उपवासी सुग्रास अन्न मुबलक मिळतांच जठराग्नीचा विचार करीत नाहीं. अथवा कुपथ्याची संधी मिळतांच धातुगतज्वर आपलें स्वरूप प्रगट करितो; तद्वतच या अभिमानास इतके दिवस उक्तस्थल—शरीर व मनोभूमी—न मिळाल्यामुळें परस्पराविषयीं सहानुभूतीस अर्थातच अर्धचंद्र मिळाला. असो, महर्षीचें आगमन होतांच राजानें स्थानावरून उठून त्यांचा योग्य आदरसत्कार व राजवैभवयुक्त पूजा करून कुशल विचारिलें. ह्मणजे त्यांचे स्त्रीपुत्रादिकांचें नाहीं तर त्यांचे स्वधर्मासंबंधीं. तो कोणता तर लोककल्याणार्थ यज्ञयाग करणें व त्या करितां क्षत्रियांचें सहाय-द्रव्यद्वारा व यज्ञास विघ्न करणाऱ्यांस शासनद्वारा-मागणें वगैरे होय. व याच संबंधानें कुशल विचारिलें. हल्लींचा काळ ह्मणजे नौकरीकरितां फिरणें व तीही कष्टसाध्य. परंतु प्राप्त होतांच अधिकार देवतेची प्रसन्नता राखणें किंवा पदवीधर झाल्यास किंवा युक्त शिक्षण होतांच-डॉक्टरी, इंजिनिअरी वगैरे उच्च व सन्मान्य धंदा पत्करणें व त्यांत धर्मबाह्य कामें करावीं लागलीं तरी योगक्षेम चालविण्यास साधन नसल्यामुळें

तिकडे दुर्लक्ष करून उद्योग करणें; यामुळें धर्मतेज नष्ट झालें. व त्यायोगें वंद्य व लोकादरास पात्रस्थानीं जो पूर्वीचा वर्ग होता त्यास आज विरुद्ध दिशा पत्करण्याचा योग आला आहे; हा तरी अधुनिक आचार प्रभावच ह्मटला पाहिजे! असो, याप्रमाणें उभयतांचें कुशल विचारणें झाल्यावर आगमनाचें प्रयोजन राजानें नम्रतापूर्वक विचारिलें. " माझे कडून कांहीं आपली सेवा होण्यासारखी असल्यास आज्ञा व्हावी. मीं आपला आज्ञांकित आहे. माझी सर्व प्रजा, राष्ट्र किंबहुना खजिना हे सुद्धां आपलेच आहेत. तेव्हां काय आज्ञा ती व्हावी ". असें हा सार्वभौम राजा एका ब्राह्मणास ह्मणतो, ह्मणजे अशा ब्राह्मणाचें तेज राजावर पडण्यास त्याचे ठिकाणीं किती ब्रह्मतेज, तपसामर्थ्य असलें पाहिजे! याची आतां कल्पनाच करणें भाग आहे. कारण प्रत्यक्ष त्याचा अनुभव आज दृष्टिगोचर होणें शक्य नाहीं. असो, राजाचें अभिवचन ह्मणजे आजकालचे वचनचिठ्ठींतील नव्हे तर तें खरोखरच वचन. एकादां वाचादत्त झालें ह्मणजे त्यांत सर्वस्वाचें जरी अर्पण करण्याची वेळ आली तरी तें वचन अल्पांशानेंसुद्धां मागें घेणें शक्य नाहीं. हाच ह्या वेळचा खरा क्षत्रियधर्म. एवढेंच नव्हे तर स्वप्नांतील वचन सत्य करणारे व त्याकरितां सर्वस्व अर्पण करणारे पुण्यपुरुषाचेंही उदाहरण सर्वांस विश्रुत आहे. असो याप्रमाणें अभिवचन मिळतांच विश्वामित्रास आपलें कार्य झालें ह्मणून मनांत हर्ष होऊन त्यानें यज्ञरक्षणाकरितां श्रीरामाची याचना केली. परंतु ही कल्पना दशरथाचे ध्यानींमनींसुद्धां नव्हती; व असणेंही शक्य नाहीं. आपण स्वतः सर्व कार्य करण्यास समर्थ असतां आपल्या बारा वर्षांचे अत्यंत प्रिय पुत्रास ऋषीश्रेष्ठ मागणी करतील ही कल्पना संभवणार कशी? वृद्धावस्थेंत पुत्र झाल्यामुळें तो त्याचा जीवकींप्राण होता. परंतु वचनबद्ध झाल्यामुळें तो पेंचांत पडला. त्यानें ऋषीस सामोपचारानें विनवून पाहिलें. " हे मुने! राम अल्पवयी व अज्ञान आहे, पायीं चालण्याची त्यास संवय नाहीं,

युद्धकर्म कधीं पाहिलें देखील नाहीं. तेव्हां आपणांस त्याचा उपयोग होणार नाहीं, व पुत्रासही धोका होण्याचा संभव आहे तेव्हां मला वृद्धावस्थेंत दुःख दिल्याचें श्रेय आपण तरी कां घेतां? तेव्हां हा आग्रह सोडा. मीं स्वतः तुमचें इष्टकार्य करण्यास तयार आहें. माझा पराक्रम आज इंद्रासही विदित आहे. आपणास ही आत्मप्रशंसा वाटेल परंतु तसा प्रकार नाहीं, हा आचार प्रभाव आहे. हें माझें सामर्थ्य नसून केवळ आचाराचेंच आहे हें आपणही जाणून आहां." परंतु ऋषीला दशरथाला नेऊन काय कर्तव्य होतें? त्याला भावी पिढीची उन्नती करून वैभव वाढविण्याचें होतें हें त्यास काय माहीत! व त्याकरितां बालपणींच शिक्षण दिलें पाहिजे तेव्हां बाह्यात्कारीं त्यानें आपलाच आग्रह धरला. त्याचें ह्मणणें पडलें कीं, रामाशिवाय सर्व त्रिभुवन मला दिलें तरी नको. वास्तविक खरें आहे ज्यांत राम नाहीं तें अमोलिक जरीं असलें तरी घेऊन काय फायदा; परंतु ही पूर्वींची दृष्टी. हल्लीं अल्प संतुष्टता हेंच आमचें वैभव व भूषण होय. असो, याप्रमाणें उभयतांचा आग्रह पाहून वसिष्ठ ऋषींनीं पुढील रामायणाची त्यास जाणीव करून देऊन त्याजबरोबर श्रीरामाचीच रवानगी करविली. तो सीतास्वयंवरांतील कथाभाग—विश्वामित्र व दशरथ यांचा संवाद—खालीं दिला आहे व त्यांतच आचाराचें महत्ववर्णन आहे.

विश्वामित्राचे उत्तरीं। रायासि भेदिलें जिव्हारीं। परि धरूनियां धीरा। राजा बोलता झाला ॥ १ ॥ ह्मणे माग स्वर्गींचें बरवें। माग पाताळींचें आघवें। देईन पुरुपार्थ वैभवें। दिशा वलयांकित हे धरा ॥ २ ॥ श्रेष्ठ स्वामी मुनिराज। रामा वेगळें माग मज। वज्र घेऊनि सुरराज। देईन तुज सांगातें ॥ ३ ॥ याग रक्षणा पाहिजेती। देईन दिशांचे दिग्पती। नवग्रहही तुजप्रति। याग रक्षणा देईन मीं ॥ ४ ॥ आणिक देतों मुनिराज। सूर्य आमुचा पूर्वज। वडील आणि तेजःपुंज। सर्व प्रकाशक तो नेई ॥ ५ ॥ ह्मणसी हे कैचें तुज आधीन।

तरी हे सत्य सामर्थ्यापुढें लीन । शुद्ध क्रियेसि बहुत मान । काय वदों मीं तुजपुढें ॥ ६ ॥ विश्वामित्र ह्मणे रायासी । चाड नाहीं त्रैलोक्यासी । राया राम दे आह्मांसी । इतुकेंचि पुरे ॥ ७ ॥ देशीं ब्रह्मांडीचें सामर्थ्य । हें मीं जाणतों यथार्थ । सत्य सूर्यवंशीं पुरुषार्थ । तुमचा ऐसाचि आहे ॥ ८ ॥ राया ऐक आतां एक । रामा वेगळें अलौकिक । त्वां मज दिधले तिन्ही लोक । तरी मीं नेघें सर्वथा ॥ ९ ॥

हल्लींचे परिस्थितीनें व वस्तुस्थितीनें आचार महत्व आज सुशिक्षित लोकांस अनुभवानें ह्मणजे परिस्थितीचे परिणामानें—शिकविण्याचा उपक्रम होत आहे हें या विषयावर होत असलेलें लोकांचें कवन, व्याख्यान वगैरेनीं स्पष्ट दिसत आहे. परंतु गीतेंत त्यांचें एका श्लोकांत सर्व सार येत असल्यामुळें अधुनिक कवनाचा नुसता नामनिर्देश करूनच तो गीतेंतील श्लोक खालीं देतों.

सन्नियम्येंद्रियग्रामं । सर्वत्र समबुद्धयः ॥
ते प्राप्नुवंति मामेव । सर्वभूतहितेरताः ॥ १ ॥

असो, या प्रमाणें आचाराचें महत्व व प्रभाव आहे.

स्वधर्माचारावर—सदाचारावर—आजपर्यंत स्वराज्यश्री, ऐश्वर्य, वैभव व संपन्नता, सुखशांतिसह या भरतखंडांत आपल्या पूर्ण तेजानें —स्वातंत्र्यानें--प्रकाशमान होत होता. एवढेंच नव्हे तर इतर सर्व देशांस आपल्या बुद्धी, कला, ज्ञान इत्यादिकांनीं दिपवून आपली व्यापारी सत्ताही गाजवीत होता; तोच आज निस्तेज व कलाहीन होऊन नामशेष झाला आहे व पारतंत्र्याचे—परावलंबनाचे--गाढ अंधःकारांत दिसेनासा झाला आहे. व यास आमचा आचारलोप, कर्तव्यदुर्लक्षता, स्वार्थपरायणता, अपसांतील द्वेषभाव, मत्सर व ऐक्याचा अभाव हींच कारणें आहेत. परकीयांच्या स्वाऱ्या व आगमन होत असतां त्यांचे

धोरणावर--हालचालीवर--लक्ष ठेवून जर त्यांचे हेतूंची जाणीव आह्मीं करून घेतली असती व त्यांचे लोभमूलक व व्यक्तिविपयक फायद्याकडे आह्मीं लक्ष देऊन जर आपले कर्तव्यापासून च्युत झालों नसतों तर आज ही स्थिती येण्याचें वास्तविक कारणच पडलें नसतें असें विचारांतीं लक्षांत येईल व आजही या पाश्चात्य सुधारणेचे व वैभवाचे जाळ्यांत हा देश सांपडला नसता; हें मागील इतिहासावरून स्पष्ट होत आहे. कारण स्वावलंबनाचें महत्वच तसें आहे; कितीही आघात झाले तरी स्वराज्याचा हा कोट इतका मजबूत व अभेद्य आहे कीं, त्यावर फक्त स्वार्थ व दुही यांचे शिवाय कशाचेंच सामर्थ्य तो भेदण्यास उपयोगीं पडत नाहीं. व अवनतीचे कालांतही याच तत्वाचें अवलंबन केलें जातें. हें इतर देशांचे इतिहासावरून सांगतां येईल. सारांश कोणत्याही कालांत राष्ट्ररक्षण स्वराज्यप्राप्ती व उन्नती यांस जर कोणता युद्धाशिवाय उपाय असेल तर तो एक स्वावलंबन हाच होय. हें मागें दिलेल्या पाश्चात्य पंडितांचे उताऱ्यांवरून सहज लक्षांत येण्यासारखें आहे. कारण त्यांचे सर्व प्रयत्न; इकडील स्वावलंबन, आचारलोप, पूर्व संस्कृती व ऐक्यता यांचें निर्मूलन करून शिक्षणपद्धतीचे द्वारां व इतर मार्गांनीं परावलंबन, परानुकरण व परस्परांत दुही वाढविण्यांतच होत आहेत. व जोंपर्यंत आमची इकडे प्रवृत्ति आहे तोंपर्यंत या देशास स्वातंत्र्य व सुख प्राप्तीची आशा करणें व्यर्थ होईल.

पूर्वेतिहास पुराणांतरीं असल्यामुळें व त्याबद्दल आमचे मनांत कुतर्क व गैरसमज उत्पन्न करण्यात आल्यामुळे त्यांतील सर्व भाग आह्मांस ऋषिप्रणित काव्यशक्तीचा प्रभाव व सरस्वतीचा विहारच वाटून किंबहुना तो काल्पनिक कादंबरी व दंतकथाच वाटत आहे. हा कालमहिमाच ह्मणावयाचा दुसरें काय? परंतु कालाचा प्रभाव कांहीं वर्षांनीं हल्लीं जो इतिहास ह्मणून आपण समजतों, ज्या शूर, वीर

पुरुषांचीं चरित्रें व शौर्य आज आपण सत्य समजतों त्या श्री शिवछत्रपती, बाजीराव, अहिल्याबाई, राणी लक्ष्मीबाई, तानाजी, बापु गोखले, राणा प्रतापसिंह, शूर-वीर भाऊसाहेब, संभाजी, राजकार्यधुरंधर नाना फडणीस वगैरे नररत्नांची चरित्रें उद्यां काल्पनिक कल्पनातरंगांतील तुषार ह्मणूनच समजले जाण्याचा संभव आहे. कारण नवीन पिढीचा इतिहास सत्य मानला जाऊन या संबंधीं शंका उत्पन्न होणें हा कालप्रभावच आहे. किंबहुना अग्नी, जल, विद्युत् यांचे सहायानें नानाविध व दृष्टीस अंध करणारे आश्चर्यकारक चमत्कार व यंत्ररचना त्या त्या साधनांचे अभावीं नामशेष झाल्यावर त्यांचींही कार्यें बंद पडण्याचा संभव आहे. व त्या कालांत आज प्रत्यक्ष अनुभविली जाणारी सुधारणादेवीची लीला गंधर्व नगरीचा चमत्कारच ठरेल. व घटोत्कचाची माया, श्रीरामोपासक हनुमंताचे अद्भुत पराक्रम, पीक भक्षण करणारे पृथ्वीस शासन करणारे राजांचीं कृत्यें, इंद्रजिताचे पराक्रम, रावणाच्या सुधारणेचीं कामें व देवदानवांचीं युद्धें वगैरे सर्व जसा मायावी बाजारच किंवा एक प्रकारचा सिनेमाचा खेळच ह्मणून आज भास होत आहे, त्याचप्रमाणें या यांत्रिक कलांची व तत्कार्याची प्रगती बंद होतांच स्थिती होईल यांत काय नवल आहे? परंतु अशा स्थितींतही हें सनातन धर्माचें बीज नष्ट होणार नाहीं. हें आचारतत्व नामशेष होणार नाहीं. कारण तें सत्य व ज्ञानरूप असल्यामुळें त्रिकालाबाधित आहे. कारण तें दुसऱ्या कशावर अवलंबून नसून स्वयंप्रकाशक आहे. व या अखिल जगताचा पाया शुद्ध सत्वावरच उभारला आहे. ह्मणून जगत् आहे तोंपर्यंत तें अव्याहत राहणारच. पाश्चात्य तत्ववेत्ते मॅक्समूलर साहेब, वेदांतावर ज्यानीं व्हाल्युम लिहिले त्यांत स्पष्ट कबुली देतात कीं:—" This is the only philosophy that can last for ever ".

जगतास धारण करणाऱ्या पंचमहाभूतांत यादवी सुरू होऊन

जगताचा लय समय आला ह्मणजे पृथ्वीचे पोटांतील खनिज द्रव्याचा सांठा संपून ती हलकी होत जाऊन चेंडू प्रमाणें डळमळूं लागेल. पेट्रोल, घासलेट व कोळसा किंबहुना जलाचीही तूट पडून जो सूर्य आज प्रकाशकिरणांनीं भासमान होतो तोही कालांतरानें पृथ्वी त्याचे समीप जात असल्यामुळें अग्निज्वाळाचे रूपानें भासूं लागेल. शीतल किरणांनीं आल्हाद देणारा चंद्रमाही प्रखरता धारण करील. व या जगाचा आदिकर्ता, पालक व संहर्ता विश्राम पावण्याकरितां हा जगत्‌रूपी खेळ थांबविण्यास आदिमायेस आज्ञा करील व सिनेमाची लीला विद्युत् शक्तीचा ओघ थांबतांच जशी बंद पडते तद्वतच हा जगदाभासाचा खेळ अदृश्य झाल्यावरही ज्या सत्यज्ञानास तो परमात्मा न विसंबतां हृदयाशीं घट्ट संभाळून ठेवील ह्मणजे वास्तविक त्या सत्यस्वरूपांतच जो स्वस्वरूपानुभव घेत राहील. तेव्हां त्याचा लय कसा संभवणार ? एवढेंच नव्हे तर या अखिल ब्रह्मांडाचे सर्व चळवळींत, ब्रह्मदेवाचे सृष्टिकर्माचे घडामोडींत, मेघाचे अतिवृष्टींत, विद्युल्लतेचे गडगडटांत, थंडीचे अत्यंत शीतलत्वांत, सूर्याच्या प्रखर उष्णतेंत व महायुद्धाचे प्रचंड गडबडींतही ज्याची शांति यत्किंचितही ज्या सत्यज्ञानानें विकार पावत नाहीं किंबहुना हा ज्ञानानुभव ज्या महात्म्यास होतो त्याचीही शांती व सुखाचा वरप्रमाणें भंग होत नाहीं; व हेंच प्राणिमात्राच्या जीविताचें अंतिम ध्येय असल्यामुळें त्याचा विनाश कोणत्याही परिस्थितींत होणें शक्य नाहीं. असो, अशा कालचक्राचे फेऱ्यांत मागें कितीतरी घडामोडी झाल्या व पुढें कितीतरी होतील हें कोण सांगूं शकणार ? या उन्नतीचे उच्च स्थानापन्न स्थितींतसुद्धां जेथें उद्यां काय होणार हेंही समजणें अशक्य तेथें कालाचे अनंतत्वांत भावी परिस्थिती व स्थित्यंतरें यांचें माप कोण करील ? व अशा वस्तुस्थितींत यांत्रिक कलांचा अखेरपर्यंत टिकाव लागेल याची खात्री व हमी कोण देऊं शकणार ? व मग आज

जें आह्मांस त्याचें महत्व वाटत आहे तें आमच्या पुरतेंच होय. ह्मणून तेवढ्याकरितांच निसर्गाच्या प्रवृत्तिविरुद्ध चाललेली पाश्चात्य संस्कृति व निसर्गाला धरून असलेली पूर्व संस्कृति यांतील हल्लींचे महायुद्धांत कालाचा विचार करितां अखेर टिकाव धरून कोणाची सरशी होण्याचा संभव आहे; याचा सूक्ष्म विचार केल्यास निराशाच पदरीं येण्याचा संभव आहे. याची कल्पना कालगणना * खालीं दिली आहे ती लक्षांत घेतां येण्यासारखी आहे व विश्वास वाटत असल्यास रावण चरित्रांतील सुधारणेचें रहस्यही हेंच दिसून येईल. हेंही असो, आज शत वर्षांतच काय स्थिती झाली याचा विचार केल्यास घासलेटची मध्यंतरी कमतरता झाल्याचें ऐकिवांत आहे व त्यामुळें भाव वाढला होता. पेट्रोलचा भाव वाढतच आहे. रेल्वेंत गर्दी होतच आहे ह्मणजे ही साधनसंख्या—गाड्यांची संख्या—अपुरी पडत आहे. पाण्याची कमतरता दिवसें दिवस होत आहे वगैरे गोष्टींची भावी कल्पना केल्यास या संबंधीं भावी स्थितीचें अनुमान करितां येण्यासारखें आहे.

सारांश सत्यज्ञानाचें महत्व व अखंडता—कालाचें दीर्घकालिनत्व—व सुधारणेचें परावलंबनत्व यांचा विचार करितां यांजकडेस पूर्वजांनीं दुर्लक्ष केलें किंबहुना ( रावणाचे इतिहासावरून ती सुधारणेची संस्कृति नामशेष करून ) निसर्ग संस्कृतीच स्थापन केली. यांत दूरदर्शित्वच

---

* आतां च्यारी लक्ष बत्तीससहस्र ऐसें। कलियुग प्रमाण असे। द्वापार त्याचेंनि द्विगुण असे। अधिक केलें ॥ ८२ ॥ त्रेत बारालक्ष सहस्र शाण्णव। कृत सतरालक्ष अठ्ठाविस जाणावें। हें प्रमाण आघवें। चहूं युगीं ॥ ८३ ॥ चहूं युगां चौकडी। ते ब्रह्मया पळा एवढी। ऐशी सहस्र एक चौकडी। तो ब्रह्मया दिवस एक ॥ ८४ ॥ ऐशा शतवर्षे ब्रह्मा सरे। सहस्र ब्रह्मया विष्णूची घडी भरे। ऐसे द्वादशलक्ष विष्णू पुरे। तंव अर्ध प्रहर रुद्राचा ॥ ८५ ॥ येणें गणणें रुद्रसंख्ये। अकरा रुद्र एका निमिषें। ते महामाया आयुष्यें। काळें वेंचलीं ॥ ८६ ॥ भक्तराज ज्ञानेश्वर कृत पान १९ ओंवी १८२.

प्रगट होतें. एरव्हीं ज्यांस भूत, भविष्य व वर्तमान कालाचें ज्ञान होतें ह्मणून वर्णन आहे; त्यांस रेल्वे, तारायंत्र किंवा विद्युत्शक्तीच्या प्रभावाचें ज्ञान झालें नसेल हें संभवत नाहीं. आतां वरील गोष्टी ह्मणजे त्यांचीं पौराणिक कथानकें काल्पनिक ह्मणून जरी धरलीं तरी त्या कल्पनासागरांत याही वर्णनाचा समावेश होण्यास अडचण काय होती ? कारण अद्याप आह्मांस साध्य न झालेल्या विमानांचें वर्णन त्यांत आहेच. असो,

ह्मणून पूर्वजांचें लक्ष याच सत्यज्ञान स्वरूपाचा अनुभव देऊन नैसर्गिक संस्कृति मार्गानेंच उन्नती करण्याकडे लागलें होतें. कारण हें नैसर्गिक संस्कृती विरुद्ध ज्ञान व्यसनानें दूषित झालें आहे. अत्यत मौल्यवान व सिद्धांत परिपूर्ण तत्वशोध या सुधारणेच्या कालांत लागलेले असून त्यांचा प्राणिमात्राच्या नश्वर देहादि इंद्रियवासना तृप्तीकडेसच उपयोग होत आहे. जसा शिक्षणाचे व कायद्याचे ज्ञानाचा उपयोग व फायदा आह्मीं परस्वापहरणाकडे, असत्याचें अवलंबन करण्याकडे वगैरे करीत आहों. तद्वत या सुधारणेचा, युद्ध कौशल्याचा व सामर्थ्याचा उपयोग अज्ञानी व मागसलेल्या राष्ट्रांस व्यापारी दृष्टीनें अंकित करून सर्वस्वी वर्चस्वाखालीं ठेवून आपले देशाची आर्थिक वृद्धी करण्याकडेसच होत आहे. एवढेंच नव्हे तर अमेरिकेसारखें सुशिक्षित राष्ट्रही जपानचे लोकांस तेथील स्थाईकपणाचा हक्क देण्यास कबूल नाहीं ह्मणून ऐकतों. एवढा आपपर भाव अजून जेथें विद्यमान आहे तेथें अखिल मानवी प्राण्यांचे हिताहिताचे उदात्त विचारांस प्रवृत्त झालेलें किंबहुना हेंच ज्या ज्ञानाचें ध्येय आहे तें ज्ञान ह्मणजे या सुशिक्षित परंतु विटाळलेले ज्ञानास शुद्ध करणारें पवित्र असल्यामुळें श्रेष्ठच होय. याचें ज्ञानेश्वरांनीं वर्णनही असेंच केलें आहे. " जेथ विटाळलें ज्ञान चोख किजे " ह्मणून जगताचे व्यवहार सुरळीत व सुखदायक होण्यास ज्या एका विशिष्ट ज्ञानाची

अवश्यकता आहे तेंच हें ज्ञान असल्यामुळें तें नष्ट होण्याची जी आमचे कांहीं पुढाऱ्यांस भीति वाटत आहे तिचें मुळींच कारण नाहीं. व त्या करितां धर्माची ओढाताण करून सब्रगोलंकार आजच करण्याचे जे प्रयत्न होत आहेत तो काल अजून बराच दूर असल्यामुळें आजच घाई करण्याचें कारण दिसत नाहीं. व त्यांत त्यांनां यशही येणें शक्य नाहीं. एवढी सूचना आज देणें अगत्याचें वाटतें. कारण हजारों तारांगणांनीं आकाश शोभायमान दिसेल परंतु अंधकार नाहींसा करण्यास त्यांचा उपयोग होत नाहीं. यास काय इलाज ? त्यास चंद्रमाच पाहिजे. परशत्रूशीं सामना करण्यास संख्येंत वाढवा दाखविल्यानें उपयोग होत नाहीं. तेथें निवडक, वीर्यवान शरीरबलसंपन्न असून देहाची पर्वा न करणारे असे निवडकच योद्धे पाहिजे असतात. ह्मणून या सनातन धर्माचें तत्व पूर्णपणें शुद्ध ठेवण्यास संख्येची भरती वर्णसंकर करून करणें अयुक्त आहे. याचा अर्थ पतित—परावर्तन करूं नये असा नाहीं. कारण संख्येकडे अगदींच दुर्लक्ष केल्यास उद्यांचें मरण आजच आणल्यासारखें होणार आहे. तर हा वर्ग स्वतंत्र जातिविशिष्ट ह्मणून ठेवणें इष्ट होईल. तसेंच अस्पृश्य विचारांचा प्रश्नही धार्मिक भावनेंत विकार उत्पन्न न करितांच सोडवणें इष्ट होईल. या संबंधीं स्थलसंकोचास्तव एवढेंच सुचवून हे दोन्ही विषय आह्मीं " ज्ञानेश्वरीसारामृतांत " घेणार असल्यामुळें येथें इतकीच सूचना पुरेशी होईल.

हंगामांत धान्यांच्या राशीच्या राशी शेतकरी जमिनींतून काढितो. परंतु तेवढें बीज ह्मणून रहात नाहीं; व राहणेंही शक्य नाहीं. किंवा तें पुढें काढूं अशीही उपेक्षा करून चालावयाचें नाहीं. कारण पुढें तें संकरानें—नाना प्रकारच्या सजातीय धान्यांचे मिश्रणानें—देखील विशिष्ट बीजाची उत्पादक शक्ती कमी होते; व कीड वगैरे लागून

सर्वच कामांतून जाण्यास लायक होतें ह्मणून शेतकरी प्रथमच तें अलग काढून त्यास हवासुद्धां न लागूं देतां फारच काळजीनें जपून ठेवितो. तद्वतच समाजधूरिणांनीं या बाबतींत जरूर ती खबरदारी घेतली पाहिजे. हें सूज्ञांस विशेष स्पष्ट सांगण्याची अवश्यकता नाहीं. हल्लींचा काल विशेष महत्वाचा आहे. कारण कालाचे युगानुरूप चार भाग झाले आहेत. त्यांतील हा शेवटचा ह्मणजे सोंगणीचा आहे. व येथेंच सनातन धर्माचें बीज राखून ठेवण्याची जबाबदारी पुढाऱ्यांवर आहे नाहींतर ऐन पानिपतचें यश मिळण्याचे वेळीं किंवा प्रस्तुत राजकालाचे सुरवातीस तत्कालिन लोकांचें धोरण व कर्तव्य चुकल्यामुळें आज जी स्थिती प्राप्त झाली तदनुरूप या धार्मिक बाबतींत झाल्यास बरीच हानी होण्याचा संभव आहे; एवढा सरतेशेवटीं त्यांस इषारा देऊन आह्मीं हा विषय येथें संपवितों.

येथपर्यंत शेतकरी वर्गाची सध्यांची प्रवृत्ति–व्यवहार–व आचार ( सर्व साधारण जनतेचे आचारासह ) यांचें निरुपण केलें. म्हणजे शेतकरी वर्गाचे कष्टसाध्य रोगाकरितां अवश्यक असा पथ्यापथ्य विचार झाला. त्यावरून शेतकरी वर्गाचे सावकारांस अखंड पोषक असें वर्तन –व्यवहार–तसेंच सदाचार विरुद्ध स्वार्थपरायणता, अपसांतील वैमनस्य, मत्सर, ऐक्याचा अभाव, फाजील गरजा, शोक, चैनी, दुर्व्यसनें या सर्वांचा कुपथ्यांत समावेश होत असल्यामुळें हीं त्याज्य म्हणून वर्ज केलीं पाहिजेत. व तद्विरुद्ध प्रवृत्ति व सदाचरणाचें अवलंबन म्हणजे पथ्य सेवन केलें पाहिजे. ह्मणजे आतां औषध योजनेचा विचार–सद्यस्थिती सुधारणेचा उपाय–करण्यांत येईल. परंतु त्या पूर्वीं सिंहावलोकनानें मागील प्रश्नावळींचीं उत्तरें त्याच अनुक्रमानें काय निघतात हें स्पष्ट मांडणें जरूर असल्यामुळें ते खालीं देत आहों:—

१ प्रथमतः निरुपण केल्याप्रमाणें वस्तुस्थिती आहे.

२ ती शोचनीय आहे एवढेंच नव्हे तर ती दिवसेंदिवस खालावत चालली आहे.

३ यामुळें आर्थिकस्थिति असमाधानकारक झाली असून कित्येकांस अन्नवस्त्राचीही पंचाईत पडत आहे.

४ ही स्थिती येण्याचें कारण–कर्जबाजारीपणा कमी न होणें व कर्ज देणारे सावकारांस शेतकरीवर्ग पोषक बनल्यामुळें ती कर्जबाजारीपणाची स्थिती–दारिद्र–अकिंचनता–वाढत जाऊन शेतकरीवर्गच या स्थितीस कारण झाला आहे.

५ सावकारांशीं नित्य संबंध ठेवणें–शर्तीचे कागदपत्र लिहून देणें, दलालीचे रूपानें त्यांस पूर्ण मदत करणें, जनावरांचे बाबतींत दुर्लक्ष, फाजील चैनी, दुर्व्यसनें, अपसांतील द्वेषभाव, दुही, स्वार्थपरायणता वगैरे चुका होत आहेत; व त्या सुधारणें शक्य आहेत.

६ स्वावलंबन हा एकच उपाय व त्यास सदाचरण, स्वार्थत्याग व परस्पर सहानुभूतिची कल्पना जागृत ठेवणें जरूर आहे. स्वार्थत्याग करणारे, या वर्गाशीं सहानुभुति ठेवणारे व प्रत्यक्ष कार्य करणारे अशा लायक माणसांची व द्रव्याची अडचण आहे. त्याकरितां मध्यम सुशिक्षित व नौकरीकरितां फिरणारे माणसांचा उपयोग करून घेणें, राष्ट्रीय फंड व शेतकी मंडळ स्थापणें अवश्यक आहे.

येणें प्रमाणें सर्व प्रश्नांचीं उत्तरें वरील निरुपणावरून निघतात. तरी वर विचारणा केल्याप्रमाणें तीं तुमचे अनुभवास व बुद्धीस कितपत पटतात ? व पटत असल्यास त्याजबद्दल जरूर ती उपाययोजना अमलांत आणण्यास तुमची सहानुभूति आहे काय ? याचें उत्तर मात्र तुमचें तुह्मींच स्वतंत्रपणें विचार करून देण्याचें असल्यामुळें त्या करितां तुह्मांस वेळ देतों व तों पर्यंत आह्मीं पुढील निरुपण करितों.

आमचे नियोजित कार्यक्रमाची सुरुवात खेड्यांतूनच करण्याचें आम्हीं कां ठरविलें याजबद्दलचें कारण रा. हरी कृष्ण मोहनी यांनीं " तेजस्वीशिक्षण " या पुस्तकांत ग्रामसंस्था-संघटना-यांपासून काय फायदा किंवा कोणकोणत्या गोष्टी करितां येण्यासारख्या आहेत या संबंधीं बरेच मार्मिक, अनुभविक व विचार-परिपूर्ण * विवेचन केलें आहे यावरून ध्यानीं येईल.

* " हिंदुस्थानांत तर ही दुधारी तरवार आहे. " स्वतःमधील संघटना जसजशी वाढत जाईल तसतसे पारतंत्र्याचे पाश सैल पडत जातील. जनतेमधील असहायतेचे विचार नष्ट होऊन व दैववादाच्या, बेहिमतीच्या खाच्यानाव्या कल्पना मागें पडून त्यांस आपल्या कर्तबगारीची जाणीव होईल. व आत्मविश्वास वाढेल......गूळ तयार करण्यासाठीं लोखंडी चरक व कढ्या यांची तरतूद आपआपसांत करितांना जी भावना त्याचे कामीं येते. हीच सगळीकडे उपयोगीं पडेल. ह्याच भावनेचे जोरावर सरकारी पतपेढ्या काय परंतु आपणास लागणाऱ्या वस्तु घाऊक दरानें विकत घेऊन त्यांचीं दुकानें चालवितां येतील. व आपला माल किफायतशीर विकला जाईल. अशा सहकारी संस्था काढितां येतील. इकडचा माल तिकडे करण्यांत अनेकांचे खिसे भरण्याचें काम त्यांस बंद करितां येईल. मारवाडी, दलाल व अनेक मध्यस्थ ह्यांचा फायदा नाहींसा करून तो सार्वजनिक हितासाठीं खेड्यांतच राहील अशी योजना करितां येईल. अशा अनेक संस्था उत्पन्न करून त्यांस जमिनीसाठीं खताचाही पुरवठा करितां येईल. चांगल्या गुरांची पैदास करितां येईल. व धान्यांचीं कोठारें स्थापन करितां येतील. अशा सार्वजनिक संस्थांचे द्वारां जमीन नांगरण्यासाठीं यंत्रें मागविणें, भाताच्या, पिठाच्या व तेलाच्या गिरण्या काढणें, दुग्धालयें उत्पन्न करणें, कापूस लोढणारे लहान लहान कारखाने स्थापणें, शेतीकरितां व खेड्यांकरितां पाण्याची तरतूद करणें, आपल्या खेड्यांतील मजूर बाहेर पाठविणें, व निरनिराळ्या कामांचे मक्ते घेणें, त्यांस अगदीं अशक्य होईल असे नाहीं. कोणता धंदा आपले गांवीं किफायतशीर होईल याचें ज्ञान त्यांस होऊन विणकाम, रेशीम, कुंभारकाम, कांच, बांगड्या, धातुकाम, रंग, सुतारी बांधकाम, कातडी, साखर, लाख, मध, वेतकाम इत्यादि अनेक घरगुती उद्योग धंद्यांची आपल्या परिस्थित्यनुसार त्यांस निवड करितां येईल. ह्यांपैकीं निवळ एकाच धंद्यावर ह्मणजे खादीवरच जरी सर्वस्वी जोर दिला तरी स्वराज्य हस्तगत होईल असें असहकारितावादी म्हणतात, ह्यांत जरी अर्थवाद दिसून येत असला तरी त्यांत जें सत्य अंतर्हित आहे त्याकडे दुर्लक्ष करितां येणें शक्य नाहीं.

मागील प्रश्नावळींचे उत्तरांचा विचार करण्यास आम्हीं शेतकरी वर्गास वेळ दिला. त्या प्रमाणें त्यांतील गोष्टी त्यांस कबूल असल्यास त्यांनीं खालील प्रतिज्ञालेखावर सही आपले परमपूज्य धर्मास, बांधवांस व परमेश्वरास स्मरून निर्मळ अंतःकरणानें, निष्कपट भावनेनें व सत्यास स्मरून व तें न सोडण्याचे दृढ भावनेनें सही करून आपली संमती व्यक्त करावी. आतां ही वचनचिठ्ठी कोर्टाचे नित्य व्यवहाराप्रमाणें कायद्याचे सल्लयानें बदलणारे स्वरूपाची नसून आपलें व आपल्या देशबांधवांचें सुख व कल्याण यांचा विचार करण्यास व तदनुसार आचरण ठेवण्याकरितांच असल्यामुळें आपले स्वसंतोषानें—कोणाचेही प्रेरणेनें नाहीं—काया-वाचा-मनानें या वचनापासून यत्किंचितही न ढळण्याचे दृढनिश्चयानेंच सही करण्याची आहे असें सर्वांस आम्हीं बजावून त्याचा नमुना खालीं देत आहों.

---

स्वराज्य संघटित सामर्थ्यामध्यें आहे. आयस्कण एकेठिकाणीं आणले आणि शुद्ध केले ह्मणजे पोलादी गोळा बनतो व तो घणानें फोडण्याचा प्रयत्न करणाऱ्यास श्रमहानी शिवाय दुसरा लाभ होत नाहीं.

सरकारी पतपेढ्यांमुळें जो फायदा शेतकऱ्यांस मिळतो तो बीबियाणाचे वाढीदिढीत व दलालीचे घालमेलींत सहज लुप्त होतो व [ यामुळें ] सहकारी संस्थांमध्येंच आपला तरणोपाय आहे अशी दृढ भावना त्यांचे चित्तांत खोल जाऊन पाळेंमुळें धारण करीत नाहीं सवलतीचे दरानें शेतकऱ्यांस बीं मिळवून देणाऱ्या व व्यवहारोपयोगी जिन्नस खात्रीलायक व बाजारभावापेक्षां स्वस्त विकणाऱ्या, तसेंच भाजीपाला, फळफळावळ इत्यादि त्यांच्या शेतांतील माल किफायतशीर विकून देणाऱ्या सहकारी संस्थांची आमच्या शेतकऱ्यांस गरज आहे. जातिभेदाची समाजरचना आयतीच सहकार्य वाढविण्यास उपयोगीं पडेल. खेड्यांतील सुतार, लोहार, तेली, माळी, कुंभार, चांभार, ह्यांस सहकारी संस्थांच्या द्वारां काम देतां येईल. व विशिष्ट प्रकारच्या कारागिरांचें वैपुल्य ज्या देशांत असेल त्या प्रदेशांतील कारागिरांस बाहेरची मागणी येईल, अशी व्यवस्था करितां येईल. पाश्चात्य देशांत सहकार्याचा संसार एवढा आहे कीं, ह्याच चळवळीचे जोरावर त्यांस नवीन पद्धतशीर व सौंदर्ययुक्त रीतीनें खेडीं वसवितां आलीं आहेत.

[ तेजस्वी शिक्षण पान १२३ ]

# प्रतिज्ञा लेख.

वऱ्हाचें भावी शेतकरी मंडळ यांस,

१. आम्हीं खालीं सही करणार सर्व धर्मांचे, जातींचे व पक्षांचे लोक राहणार वस्ती तालुका जिल्हा आपआपले धर्मास, पंथास व तत्प्रातिपाद्य देवतेस स्मरून स्वसंतोषानें, सहानुभूतीनें, निष्कपट बुद्धीनें व सरळ भावानें लिहून देतों कीं, आमचे सद्यस्थितींतून निर्मुक्त करण्यास जी उपाय योजना प्रत्यक्ष कार्यरूपानें अमलांत आणण्याचें ठरत आहे; व ज्या योजनेचा नमुना आम्हीं वाचला आहे त्यांत सर्वांनुमतें युक्त फेरफार होऊन कायम होईल तिला अनुसरून आम्हीं एकादिलानें वागण्यास तयार व कबूल आहों.

२. सदर योजनेंत जे जे नियम आहेत किंवा होतील ते सर्व आम्हीं संतोषानें व निष्कपटबुद्धीनें पाळून इतरांसही पाळण्यास लावूं.

३. ही उपाय योजना कायम समजून आम्हीं सर्व आपआपले पुढील पिढीचीही सहानुभूति मिळविण्यास उद्युक्त होऊन त्याची जबाबदारी आमचेवर घेऊं.

४. कांहीं अपरिहार्य अडचणीमुळें एखादे बाबतींत कोणाची अडचण किंवा गैरसोय असल्यास ती कांहींकाल माफींत ठेवण्यास सदर योजनेचे कार्यकारी मंडळाची किंवा सभेची लेखी संमति घेतल्याशिवाय अमान्य करणार नाहीं.

५. ही योजना संस्थांचे चालक–व्यवस्थापक–[ ग्राम-संस्थेचे बाबतींत ] आम्हीं सर्वांनुमतें नेमून त्याजबद्दल तालुका किंवा पेठेवरील स्थापन झालेल्या किंवा होणाऱ्या ज्या संस्थेस ही ग्रामसंस्था जोडली जाईल तिचे चालकास कळवूं. व त्यांचे सल्ल्यानें सर्व कामें करूं. व चालकांपैकींच अध्यक्ष नेमून त्यांचे सर्व नियम व संस्थेचे पास होणारे ठराव आम्हीं कायद्याप्रमाणें पाळूं.

६. आमचे समदुःखी व आमच्या इतकेच विपन्नावस्थेस

पोहोंचलेले सुशिक्षित मध्यम वर्गासंबंधीं आमची पूर्ण सहानुभूति असून त्यांशीं प्रेमानें व सरळ भावानें वागण्यास आह्मीं तयार असून त्यांस या संस्थेचा शक्य तो फायदा देण्यास आह्मीं कबूल आहों.

७. या संस्थेची वाढ शेजारच्या निदान दहा गांवांत करण्याचा प्रयत्न करून त्या या संस्थेच्या उपशाखा ह्मणून आह्मीं चालवूं. तसेंच मध्यवर्ती व वरिष्ट अशी तालुका किंवा पेठ संस्था व प्रांतिक संस्था यांशीं नेहमीं दळणवळणाचे रूपानें संबंध ठेवूं.

८. या संस्थेचें मुख्य ध्येय आर्थिक दृष्टीचें-सुधारणेचें-असल्यामुळें आह्मीं परस्परांत प्रेमभाव व ऐक्य यांची वृद्धी करूं व अपसांतील हल्लींचे व पुढें होणारे द्वेषभाव व तंटे याच संस्थेमार्फत व येथेंच मिटवूं. शक्य नसल्यास पेठ व प्रांतिक संस्थांची मदत घेऊं. परंतु कोर्टाचा आश्रय घेणार नाहीं. व हेंच उदाहरण इतरांस मार्गदर्शकत्वाचे दृष्टीनें, प्रत्यक्ष आचरणानें इतरांचे निदर्शनास आणून देऊं. तसेंच कपाशीचे दलालीचा फायदा या संस्थेशिवाय इतरांस—दलालांस—देणार नाहीं. व या ग्रामफंडांतून लहान लहान दुकानें खेड्यांच्या गरजा भागविण्यास उघडण्याचा तसेंच खेड्यांत चालणारे लहान प्रमाणावर धंदे चालविण्याची व हल्लीं आहेत त्यांस मदत करण्याची व सुधारणा करण्याची खटपट करूं. त्यांस लागणारे द्रव्यनिधीस एक रुपया उत्पन्नामागें कायमचा एक पैसा--पावआणा--देऊं व इतर वेळींही शक्त्यनुसार मदत करूं.

९. कोणतेही कारणानें अपसांत बेबनाव, दुही, द्वेष, मत्सर, स्वार्थ व परस्वापहरण बुद्धी वगैरे दुर्गुणांस व व्यसनांस आश्रय देणार नाहीं. किंबहुना त्यांचें बीजारोपण होण्यासारखें आचरण न होण्याची खबरदारी घेऊं.

१०. होईलतोंपर्यंत आपले प्रांताचा, देशाचा, धर्माचा व जातीचा अभिमान कायम ठेवून विदेशी वस्तुसंपर्क नामशेष करण्याचा प्रयत्न करूं.

११. सहकारी पतपेढ्यांशीं सहकारिता ठेवून त्यांचे मदतीचा शक्य तो फायदा व उपयोग करून घेऊं.

आतां वरील प्रतिज्ञा लेख विचाराकरितां ठेवून त्या संबंधीं विचार करण्यास शेतकरी व ग्रामवासी यांस वेळ देऊन त्यांची लेखी संमति-सही-मिळण्यास वेळ देऊन तों पावेतों त्यांचे समदुःखी मध्यम वर्गाचे स्थितीचा विचार करण्यास आह्मीं वळतों.

हल्लींचे राजछत्राखालीं ज्या सुधारणा व फायदे देशास प्राप्त झाले त्यांत मुख्य व महत्वाचा लाभ ह्मणजे सर्वत्र शिक्षण संस्थांची स्थापना हा होय. आज हजारों लोक नित्य या संस्थेच्या द्वारें सुशिक्षित होऊन त्यांचें आचार, विचार व ध्येय यांत रुपांतर होऊन मुख्यतः मध्यम वर्गास हें उपजीविकेचें साधन झाल्यामुळें अनेक कुटुंबें आपला निर्वाह करीत आहेत. अगदीं प्रथमारंभींची स्थिति ह्मणजे अशी होती कीं, कोठें इंग्रजी दोन तीन इयत्ता झाल्या न झाल्या तोंच नौकरी तयारच. विशेष खटपट करण्याचें कारणही पडत नसे. ते लोक कमिशनरचे शिरस्तेदारीपर्यंतही पोहोंचल्याचीं उदाहरणें आपले पाहण्यांत आहेत. व नौकरींत त्या त्या लोकांचें वैभव व वजनही इतकें असे कीं, अधिकारीवर्ग त्यांचाच सल्ला घेत असत. या लोकांसही जनतेची सहानुभूति असल्यामुळें द्रव्य खर्चून न होणारीं गोरगरिबांचीं कामेंसुद्धां सहज होत असत. साहेबलोक दवऱ्यावर आल्यास अर्जाचेंही कारण न पडतां बरींच कामें त्यावेळीं अडाणी असलेल्या लोकांचीं होत असत. इतके अधिकारी लोकही कनवाळू असत. ही सरासरी ३०।४० वर्षांपूर्वींची गोष्ट. परंतु हल्लींची परिस्थिति व काल यांचा विचार केल्यास त्या मानानें नवीनच सृष्टि झाल्यासारखें झालें आहे. व नवीन पिढी-त्यावेळचीं लहान मुलेंच-आज जनता ह्मणून असल्यामुळें व शिक्षणाचा पूर्ण लाभ मिळाल्यामुळें परिपक्व दशा येणें साहजिकच आहे. व शिक्षणानें दरसाल शेंकडों लोक विद्यालयांतून बाहेर येण्याचें सुरूंच असल्यामुळें एवढ्यांची नौकरींत योजना होणें अशक्यच. व देशांत महर्गताही वाढत चालल्यामुळें जे हल्लीं

या नोकरींत आहेत त्यांची स्थिति समाधानकारक नसणें यांत नवल नाहीं. कारण नोकरीचें उत्पन्न ह्मणजे ठरीव, त्या शिवाय अन्य उत्पन्नास मार्गच नसतो. त्यांतून कामही दिवसेंदिवस वाढत असल्यामुळें घरींदारीं सुद्धां काम करून शिल्लक राहतेंच. यामुळेंच स्वतःचें कार्यप्रसंगही थोड्या रजेंतच उरकून घ्यावे लागतात. मग जातिबांधवांचे कार्यप्रसंगांस जाण्याचें तर दूरच राहिलें. यामुळें परस्परांत सहानुभूतीचा प्रश्नच राहतो. नित्य बरेच लोकांस दवऱ्याचें काम असल्यामुळें व घरीं जास्त माणसें सर्वत्र नसल्यामुळें अडचणच. आर्थिक बाबतींत तर विचारण्याचें कारणच नाहीं. पगार सायंकाळीं घरीं आणून रात्रभर पाहिला ह्मणजे झालें. सकाळीं बाजारांत महिनाभर उधार आणलेले सामानाचा हिशोब दुकानदारांचा झाला कीं; याचा खिसाही झाला रिकामा. किंबहुना कांहीं देणें राहतेंच. कारण एकच देणेंदार नसतो. धान्याचा वेगळा, किराणावाला वेगळा, कापडवाला वेगळाच शिवाय दूध वगैरे इतर किरकोळ बाबी वेगळ्याच. सारांश कित्येकांचा आठ दिवस तर कित्येकांचा पंधरा दिवस; परंतु दुसऱ्या पगाराची भेट होईपर्यंत पहिला पगार राहणें ह्मणजे महद्भाग्य. त्यांतून एखादें कार्य झालें तर दोन दोन वर्षें त्याचें देणें साफसुफ करण्यास लागतात. उतार वयामुळें कित्येक या परिस्थितीला कंटाळलेलेही असतात. परंतु उपाय काय? काम बरोबर होत नाहीं त्यामुळें अधिकाऱ्यांची गैरमर्जी होते. जास्त जिवापाड करावें तर प्रकृती हातची नाहीं. रजा घ्यावी तर बाहेर देणेंदार उभेच. सोडावी तर पेन्शनचे दिवस. ही कहाणी शेतकऱ्याप्रमाणें लांबलचक आहे. परंतु तिची सर्वांस कल्पना असल्यामुळें आटोपतीच घेतों. परंतु अशा परिस्थितींतसुद्धां आमचे सद्गुणांचा व नीतीचा विचार करूं लागल्यास अल्प ऐश्वर्यांतसुद्धां गर्व किंवा अभिमान इतका असतो कीं, कोणी कामाकाजाकरितां सहज जर दृष्टिगोचर झाला तर त्याकडे पाहणार नाहींत. त्यानें दृष्टी पुढें जाण्याचा प्रयत्न

केला तर बोलणार नाहींत. बोलले तर कपाळास आंठ्या पडून भिंवया चढून जातात. नेत्र आरक्त होतात; मग अशा चर्येंत वाणी किती मधुर व समाधानकारक निघत असेल याची कल्पनाच करणें बरें.

ही नौकरवर्गाची स्थिति. आतां नौकरांचे गरजूंची स्थिति ह्मणजे कशी असणार याची सांगण्यापूर्वींच वाचकांस कल्पना झाली असेल इतकी ती स्पष्ट आहे. एखादी रिकाम्या जागेची वार्ता ऐकतांच किंवा वर्तमानपत्रांतून वाचतांच अशांना नवचैतन्य प्राप्त होतें. कारण एरव्हीं निराश होऊन पडलेले असतात. अशा एखाद्या जागेकरितां किती अंतरावरून व किती संख्येनें अर्ज येतात याची गणतीच करितां येत नाहीं. हा त्रास चुकविण्यास अलिकडे कंपन्या व फर्म वगैरेंनीं एक युक्ति काढिली आहे. ऑफीसला " नो व्हेकन्सी " ह्मणून कायमचाच बोर्ड लाविलेला असतो. कारण नौकरीकरितां फिरणाऱ्यांचा ओघ सुरूंच असतो.

आतां अशा परिस्थितींत त्यांस उपजीविका कशी करावी लागत असेल, त्या करितां प्रवासखर्च ते कोठून करीत असतील ह्या गोष्टीची कल्पनेनेंच जाणीव करावी. दुसरी गोष्ट कोणत्याही धंद्याचा अभ्यास नाहीं—अनुभव नाहीं—भांडवल नाहीं, धैर्य नाहीं व त्याकरितां लागणारे गुण व श्रम करण्याची शक्तिही पुरेशी अंगीं नाहीं. तेव्हां कारकुनी शिवाय दुसरी योग्य नौकरी यांचे उपयोगीं पडत नाहीं. ह्मणून ती मिळेपर्यंत त्यांना कांहीं स्वास्थ्य नसतें. शिवाय मानसिक चिंता तरुणपणांतच असल्यामुळें त्याचा परिणाम शरीरप्रकृतीवर होणें साहजिकच आहे. कारण " चिंता समं नास्ति शरीर शोषणं " अशी आज कित्येक तरुणांची स्थिती होत आहे. याची जर कल्पना केली तर नसतीच चिंता उत्पन्न होते, परंतु अशी जरी स्थिती आहे तरी शिक्षण संस्था बंद पडत चालल्या अशी भीति मात्र बाळगण्याचें कारण नाहीं. कारण

ट्रेव्हेलियन साहेबांचें भविष्यच यथार्थ ठरतें आहे कीं,— " And we shall raise up a class of influential intelligent youth who will, in the course of a few years become the active profagaters of our system, with little or no assistance from us. " व ह्मणूनच त्यांचा उत्कर्ष व वाढ होत आहे. शिवाय प्राथमिक शिक्षण व स्त्री शिक्षण अशा दोन संस्था त्यांच्या मदतीस येत आहेत व लवकरच त्यांचाही प्रभाव जनतेस दिसूं लागेल; ह्मणजे मग सर्व संस्थांचा त्रिवेणी संगम होऊन त्यांत पूर्वीच्या सर्व आचार, विचार, वेडगळ कल्पना, धर्माचें फाजील महत्व, परंपरेचें प्राबल्य व अंधश्रद्धा यांचेबद्दल प्रायश्चित्त घेऊन पुनीत झालेले नवीन पिढीचें स्त्रीपुरुषांचें जनतेंत बहुमत दिसूं लागलें ह्मणजे मग देशाचे सौख्याचा प्रश्न सत्वर सुटणार. तों पावेतों कांहीं काळ आपत्कालच समजून दिवस काढणें भाग आहे. परंतु हल्लीं प्रयत्न जारीनें सुरू असल्यामुळें त्यांचे शीघ्र प्राप्तीची आशा आहे भावी सुखाची कल्पना प्रत्यक्ष सुखानुभवापेक्षां जास्त सुखकारक होत असते कारण तोंपर्यंत त्यांच्यांत उत्साह, कार्यदक्षता व उद्योग यांची समृद्धी असते व ह्मणूनच मंडळींचा बुद्धिभेद आह्मीं करूं इच्छित नाहीं. या बाबतींत कांहीं अधुनिक सुशिक्षितांचा अनुभव व विचार वेगळ्या दृष्टीचे आहेत; परंतु तेही आह्मीं सर्व देत नाहीं. तर अधुनिक विद्वानांचेच कांहीं * उतारे देऊन रा. हरी कृष्ण मोहनी यांचें ' तेजस्वी शिक्षण ' हें पुस्तक वाचण्याची सूचना करितों.

* [ मोहनी कृत तेजस्वी शिक्षण पान ७ ] नरेंद्रनाथलॉ.

1. It should be borne in mind that the first efforts of the East Indian Company, to defuse education, ware prompted by a religious motive viz, the evangelization.

— Promotion of learning in India by early settlers up-to about 1800 A. D.

परंतु आजही या प्रचलित शिक्षणपद्धतीचाच दोष दाखवून निषेध करणाराही सुशिक्षितांतच एक वर्ग दिसत आहे, ह्मणून यावर आमचा अभिप्राय थोडासा दिल्यास अगदींच अप्रयोजक होईल असें नाहीं ह्मणून थोडक्यांतच आह्मीं त्याची कल्पना देतों.

---

[ मोहनी कृत तेजस्वी शिक्षण पान ३७ ] डॉ. ॲनीबिझांट.

2. Nothing can more swiftly emasculate the national life, nothing can more surely weaken national character than allowing the education of the young to be controlled by foreign influences and to be dominated by foreign learning, foreign habits, foreign manners, foreign dress, foreign ways, are all enforced in a foreign language, within missionery schools, a foreign agncy to boot, sterilising the boy's heart and dispirituating his whole nature.

[ मोहनी कृत तेजस्वी शिक्षण पान २७ ] माऊंट स्टुअर्ट एल्फिस्टनसाहेब.

3 The most important branch of education in my opinion is that, designed to prepare natives for public employment......

I conceive that the study of English ought to be encouraged by all maens, and that few things will be so effectual in enlightening the natives and bringing them nearer to us. The result of educating natives both in English and in their own language must be favourable to the progress of christianity.

[ मोहनी कृत तेजस्वी शिक्षण पान २९ ] ट्रेव्हलियन साहेब.

4 The spirit of English literature, on the other hand, cannot but be favourable to the English connection. Familiarly acquainted with us by means of our literature, the Indian youth almost cease to regard us as foreigners. They speak of our great men with the same enthusiasm as we do. Educated in the same way, interested in the same subjects and engaged in the same persuits with ourselves, they become more English than Hindus, just as the Roman provincials became more Romans than Guals or Italians.

आज प्राथमिक शिक्षणाचा अनुभव असा येत आहे कीं, ते लोक त्यांचे मूळचे पिढीजाद धंद्यासही निरुपयोगीं होतात. शेतकरी वर्गाचा थोडक्यांतच अनुभव असा आहे कीं, ते लोक शेतीचे देखरेखीससुद्धां कंटाळतात. मग प्रत्यक्ष कामाची गोष्ट कशाला ? आतां आर्थिक दृष्टीनें विचार केल्यास तेथेंही समाधानास जागा नाहीं. स्टेशनावरील हमाल, चहा, पान व विडीसारखे छोटेखानी धंदेवाले गुजराथी, हिंदुस्थानी स्वदेश सोडून इतके दूर आलेले, तसेच मोठमोठे व्यापारीवर्गांतील कच्छी, बोहरी, गुजराथी, भाटे व मारवाडी यांना शिक्षणाची ( शाळांतून शिक्षण घेण्याची ] जरूर भासत नाहीं. वरील वर्गांतील एकही मुलगा शाळेत दिसणार नाहीं. व त्या सर्वांची आर्थिकच नव्हे तर शारीरिक स्थितीही समाधानकारक असते. हें उघड व स्पष्ट दिसत असतांनाही आमचे डोक्यांतील सुधारणेंची कल्पना व उन्नतीचें ध्येय इतकें या शिक्षण संस्थांत गढून गेलें आहे कीं, त्या शिवाय हिंदुस्थानास उन्नतीचा मार्गच नाहीं असा आमचा दृढ समज नव्हे आत्मविश्वास झाला आहे. एवढेंच नव्हे तर शिक्षणानें आज पुरुष जसे इतर उद्योग धंद्यास निरुपयोगी झाले आहेत; तोच परिणाम प्राथमिक शिक्षणाचा कांहीं पूर्वपरंपरानुरूप अवशिष्ट राहिलेल्या धंद्यावर होऊन तेही नामशेष होण्याचा बराच संभव आहे. तसेंच शिक्षणानें नौकरीकडे प्रवृत्ती होऊन नव्हे तर तो एकच मार्ग आज राहिला आहे अशी ज्या

---

[ मोहनी कृत तेजस्वी शिक्षण पान ४२ ] मि. नित्से.

5 A new commandment I set over youth. Become hard my brotheren; for we are imancipated. The world belongs to us — if men do not give us best things, we take them. The best food, the purest sky, the strongest thoughts, the fairest women.

प्रमाणें पुरुषांचे बाबतींत स्थिति झाली आहे व त्या प्रमाणें कुटुंब विभक्तता पूर्वी सांगितल्याप्रमाणें झाली आहे तोच परिणाम स्त्रीशिक्षणानें होणार आहे. कुटुंब शब्दाचा अर्थ आज जो केवळ दोन माणसांतच समाविष्ट झाला आहे, त्यांतही विभक्तता परिस्थितीनें प्राप्त होणार आहे. कारण आरंभींचे पुरुषवर्गाप्रमाणें थोड्याशा शिक्षणावरही स्त्रियांस नोकरीचीं निमंत्रणें येतात व पुढेंही येतील–सहज मिळूं शकतात व मिळतील–व पगारही पुरुषांपेक्षां जास्त. कारण त्यांस शिक्षणाची गोडी लावून उत्तेजन देणें आहे. आतां मात्र हिंदुस्थानास सुखाचे दिवस लवकरच येतील यांत शंका नाहीं. कारण शिक्षणाचा उद्देशच तो आहे. इतके दिवस सुधारणेंत एक अंग कमी होतें, ह्मणजे ती आठ आणेच होती, आतां मात्र ती पुरेपूर सोळा आणे आमचे पदरांत लवकरच पडून उन्नत्तीचे शिखरावर हा देश शीघ्र उड्डाण करील. व त्याचें सर्वस्वी श्रेय आमचे स्त्रीवर्गास मिळणार हें पाहून आह्मांस विशेष समाधान व आल्हाद वाटत आहे. आतां याचे समर्थनार्थ जे अनेक मुद्दे प्रतिपादन केले जात आहेत. त्या संबंधीं माहिती आह्मीं “ ब्रह्मसाम्राज्यदीपिका ” ह्मणून पुस्तक लिहिलें आहे त्यांत सविस्तर दिली आहे. असो.

आतांपर्यंत शेतकरी व त्यांचे समदुःखी मध्यम वर्गांतील सुशिक्षितांचे सद्यस्थितीसंबंधीं आमचे विचार शेतकरी वर्गापुढें ठेविले आहेत कारण या वर्गाची सहानुभूतिच उभयतांसही त्यांतून निर्फल करण्याचे भावी योजनेचा पाया असल्यामुळें त्यावरच पुढील कार्याची इमारत उभारली जाणार आहे. प्रतिज्ञालेखद्वारां ती त्यांजकडून मिळाल्यावर उपरिनिर्दिष्ट अवशेष प्रश्नांचा विचार ह्मणजे कार्याची योजना अमलांत आणण्याची आहे. तिचा नमुना खालीं देत आहों. अर्थात यांत कोणासही योग्य सूचना करावयाची अवश्यकता वाटल्यास करितां येतील.

# वऱ्हाड शेतकी मंडळ.

१. शेतकरी वर्गांतील व सुशिक्षित मध्यम स्थितींतील लोकांची होत चाललेली शोचनीय स्थिती दिवसेंदिवस निकृष्ट होत चालली आहे हें लक्षांत घेऊन यांतून त्यांस निर्मुक्त करण्याचे उदात्त कल्पनेनें व विचारानें "वऱ्हाड शेतकी मंडळ" ह्मणून संस्था स्थापन करण्यांत यावी. व तिला "वऱ्हाड शेतकी मंडळ" हें नांव द्यावें, व ती शक्य तितक्या लवकर सुरू करण्यांत यावी.

२. सदर संस्थेचें मुख्य ठिकाण उमरावती येथें असावें. व तिचे अध्यक्ष श्री. रा. बाबासाहेब खापर्डे यांस किंवा सर्वांनुमतें ठरेल त्यांस निवडण्यांत यावें व सदर संस्थेचें कार्यकारी मंडळ स्वतंत्र व कार्यदक्ष असे तेथील कायमचे रहिवाशी असावेत. व ते सर्वांनुमतें निवडण्यांत यावेत. तूर्त या संस्थेचे चालक म्हणून अध्यक्ष, उपाध्यक्ष, खजिनदार, हिशेब ठेवणारा, पत्रव्यवहार करणारा व जरूर ती माहिती मिळवून सरकारी कामकाज करणारा असे इसम असावेत.

३. सदर संस्थेच्या शाखा कपाशीचे पेठेचे गावांवर वरील तत्वावर व संख्येवरच सुरू करण्यांत याव्या. ज्या गावाहून प्रतिज्ञा लेखावर गांवचे घर संख्येचे मानानें निमेहून अधिक संख्येचे सह्यांचा अर्ज येईल त्या ठिकाणीं सुरू करण्यात याव्या. तेथील व्यवस्थापकांची संख्या पांच पर्यंत असून ते निवडणुकीचे तत्वानेंच नेमण्यांत यावेत. ज्या गांवांत ज्या विशेष जातींचा भरणा असेल त्या मानानें मेंबरांची संख्या कमीजास्ती जातवार असावी. या प्रथम सुरू केलेल्या ग्रामसंस्थेंत शेजारचीं पांच गांवें किंवा लहान असल्यास दहापर्यंत समावेश व्हावा व त्यांस अनुक्रमें प्रांतिक संस्था, पेठ संस्था व ग्राम संस्था अशीं नांवें द्यावीत.

४. सदर संस्थेचा विस्तार उपशाखांनीं करून त्यांवर प्रचारक तीन महिन्यांचे प्रोबेशनवर नेमण्यांत यावे, व त्यांचे कामगिरी व लायकीप्रमाणें त्यांजवर जबाबदारीचीं कामें सोंपवावीं व या प्रचारकांकडूनही प्रथमारंभीं अर्जासोबत प्रतिज्ञालेख घेण्यांत यावा.

५. सदर संस्थेचे उद्देश देशाची आर्थिकस्थिती सुधारणें, उद्योगधंद्यास उत्तेजन देणें, आपसांतील द्वैतभाव, द्वेष, मत्सर, वैमनस्यें मोडून, ऐक्यता, प्रेमभाव, सत्यता, सरळ व्यवहार, निष्कपट आचरण वृद्धिंगत करणें, स्वार्थ व परस्वापहरण-बुद्धी यांचें निर्मूलन करणें, नैतिक, धार्मिक व सामाजिक स्थिति सुधारणें हे होत. परंतु हल्लींचे विद्यमान जातिभेद, रुढिमार्ग यांत ढवळाढवळ करूं नये. व कोणत्याही धर्मभावना दुखविण्याचा प्रयत्न करूं नये.

६. सदर संस्थांचें परस्पर नातें अनुक्रमें वरिष्ठ व कनिष्ठ दर्जाचें असावें. प्रत्येकांनीं आपआपले पेठ शाखांचा व शाखांनीं प्रांतिक संस्थेचा–मंडळाच्या–विचार घ्यावा; त्याशिवाय नवीन कोणतेंही कृत्य करूं नये. तसेंच नवल विशेष सर्व बाबींची हकीकत वर कळवीत जावी व पत्रव्यवहारानें अखंड दळणवळण ठेवीत असावें.

७. मंडळाची सार्वजनिक सभा एप्रील व आक्टोबर महिन्यांत दरसाल दोन वेळां भरावी. पहिलींत सालाचा एकंदर कामाचा रिपोर्ट वाचण्यांत येऊन दुसरींत पुढील हंगामाबद्दल सूचना व योजना ठरविण्यांत याव्या.

८. सदर संस्थेचे कार्यास द्रव्य सहाय मिळविण्यास यांत सुचविलेल्या योजने प्रमाणें “ राष्ट्रीय फंडाची ” तजवीज होऊन त्याचा उपयोग करण्यांत यावा; व शेअर काढून फंड जमविण्यांत यावा.

९. या संस्थेचे कार्यास कपाशीचे हंगामापासून सुरुवात होऊन पेठेचे प्रत्येक ठिकाणीं वरील प्रचारकांपैकीं ( हे लोक अर्थात मध्यम वर्गांतील नौकरीकरितां फिरणाऱ्यांपैकीं असावेत व त्यांस कांहीं दिवस व्यापारी शिक्षण दिलें जावें. नेमणुकीचे अर्जासोबत प्रतिज्ञालेख व दोन लायक माणसांची त्यांचे खात्रीबद्दल सार्टीफिकिटें असावींत. ) विश्वासू व समाधानकारक काम केलेल्यामधून दोन इसम ठेवावे एकानें दररोजचा मुंबईचा बाजारभाव मागवून त्या मानानें त्या त्या पेठेवर काय भाव परवडतो हें नक्की ठरवून शेतकी मंडळाचे उपशाखेंतून —मार्फत—येणाऱ्या गाड्यांची किफायतशीर विक्री करून देण्याचें काम करावें. व दुसऱ्यानें दुकानावर चुकोती हिशोब गाड्या व शेतकरी यांची व्यवस्था ठेवणें वगैरें काम पहावें ( कपाशीची विक्री अर्थात पुरेसें भांडवल जमा झाल्यास बंद करून ती वटवून सरकी काढून बीजे विकावे व या करितां शेअरचे रकमेचा उपयोग करावा. ) मापारी वगैरे लोक पगारी पद्धतीवर ठेवावे. व प्रत्येक गाडीचे मागे दोन किंवा तीन रुपये फी ठेवावी. दलाली ह्मणून नव्हे. यांतून किराणा व इतर मालाची लहान लहान दुकानें उपशाखेमार्फत उघडण्यांत यावीं. याप्रमाणें किराणा, स्टेशनरी, लोखंडी सामान, कापड वगैरेंचीं दुकानें हळूं हळूं सुरू करावीं. व त्यांवर वरील प्रचारकांपैकींच लायक माणसें नेमावीं. दररोज मंडळाचे शाखेचे मेंबरांनीं हिशेब व गाड्यांची तपासणी करावी.

१०. सरकी तशीच राखून ती इतरांस न देतां उपशाखेचे शेतकरी लोकांसच देण्यांत यावी. लागवडीस फंड असल्यास निवडक बीं खरेदी करावें. कोणा शेतकऱ्यांस सरकी उधार घेणें असल्यास उपशाखेचे अध्यक्षांचे सहीची चिठ्ठी आणावी. व त्याचें वसुलाची जबाबदारी त्याच शाखेवर राहील. याचप्रमाणें इतर मालासंबंधीं

समजावें. ॲग्रिकलचरल खात्याचे मदतीचा बीज व यंत्रासंबंधीं उपयोग करावा. तसेंच शेतकऱ्यांस कर्जमुक्त करण्यास पतपेढीचे मदतीचा उपयोग करावा.

११. जेथें उपशाखा स्थापन झाली तेथील लोकस्थिती कशी आहे; गांवांत एकंदर कर्ज किती, कोणास व कोणाचें, दर, शर्ती वगैरेसंबंधीं माहिती प्रचारकांनीं कलम ४ यांत सांगितलेल्या कामाकरितां फिरत असतांनाच गोळा करावी व ती संपूर्ण व साग्र वरिष्ठ मंडळाकडे शाखेचे मार्फत पाठवावी. शाखेचे चालकांनीं योग्य सूचना व अभिप्रायासह वर रवाना करावी. या सर्व माहितीचा मंडळानें विचार करून योग्य ती योजना करावी.

१२. गांवांत एकंदर फिर्यादी–तंटे–कोणांत आहेत, कोर्टांत सुरूं कोणते, ते गावांत मिटण्यासारखे आहेत अगर नाहींत याजबद्दल माहिती सर्व खुलाशासह कलम ११ यांत सांगितल्याप्रमाणें ताबडतोब शाखेकडेस रवाना करावी, शाखेनें वर न पाठवितां या कामाकरितां वयस्क व अनुभविक वकील किंवा तज्ञ पेन्शनर अशा लायक माणसांतून निवडलेल्या व स्थापन केलेल्या मंडळींकडेस पाठवून त्यांपैकीं प्रत्येक वेळीं दोन माणसांनीं गांवीं जाऊन तेथील आणखी लायक अशीं दोन माणसें बोलावून कमेटी भरवून मग त्याचा निकाल करून व त्याबद्दल रिपोर्ट मंडळाकडेस शाखेमार्फत करावा. या बाबतींत होणारा प्रवास व इतर योग्य खर्च त्या त्या शाखेंतून दिला जावा. जेथें शक्य व जरूर तेथें ग्रामपंचायतीची स्थापना करावी.

१३. संस्थेचे कोणतेही मेंबरानें, उपशाखेनें किंवा उपशाखा जेथें स्थापन झाली तेथील कोणाही इसमानें इतर संस्थांशीं, दलालांशीं किंवा दुकानदारांशीं देवघेवीचा व्यवहार करूं नये किंवा संबंध ठेवूं नये.

तसेंच स्वदेशी माल शक्य तितका वापरण्यांत यावा.

१४. मजुरीचा दर हंगामांत व इतर वेळीं सर्वानुमतें ठरवावा. मजुरी ज्यावेळीं नसेल व वृद्धपणामुळें व कोणी पालक नसल्यामुळें मजुरीस असमर्थ अशा कायमच्या स्त्री-पुरुषांची यादी तयार करून चरक्यांची सुरुवात करून त्यांचे मजुरीची तजवीज करावी. तसेंच गांवांतील जमीन नफ्यानें परगांवचे इसमांस न देतां गांवांतच देण्याची व्यवस्था व्हावी.

१५. चांभार, माहार, धनगर, विणकरी, कुंभार यांस त्यांचें धंद्यास मदत करावी–सुधारणा सुचविण्यांत याव्या--कच्चे मालाची यादी उपशाखेनें ठेवावी. खादी काढण्यास त्या त्या लोकांस मदत करावी.

१६. गावांत अनीति, दुराचरण, दुर्व्यसन याजवर बारकाईनें उपशाखेनें लक्ष ठेवावें. शक्यतों तें बंद करण्याचा प्रयत्न करावा. व त्याजबद्दल माहिती शाखेकडेस पाठवावी.

१७. साधारण लिहिणें, वाचणें, हिशोब, मोडी व बाळबोध अक्षर लेखन वाचन, गणीत हे विषय ठेवून ग्राम शिक्षण संस्था उपशाखेनें सुरू कराव्या व प्रचारकांपैकीं शिक्षकांची योजना व्हावी. प्रचारकांची यादी प्रत्येक शाखेकडेस असावी; व मंडळांत सार्वजनिक यादी ठेऊन त्यांत कमीजास्ती फेरफार मंडळास विदित करावा. उपशाखेनें त्यांचे कामाचा रिपोर्ट दर तीन महिन्यांनीं करीत जावा. प्रचारकांनीं धर्मशिक्षण व सद्यस्थितीची माहिती लोकांस वर्तमानपत्रांतून व पुस्तकांतून आलेली वाचून समजून देत जावी. तसेंच पुराणादिकांचें वाचनही मधून मधून होत असावें.

१८. गांवांत " ग्रामफंड " राष्ट्रफंडाचे योजनेप्रमाणें सतत

सुरूं ठेवून शिवाय लग्नकार्य, सत्यनारायण, भंडारा, वगैरे प्रसंगीं विशेष फंड जमविण्याकडे लक्ष द्यावें.

१९. प्रत्येक गांवीं गोरक्षण संस्था सुरूं करावी. कोणीही बाजारांत शेतकऱ्यांना किंवा त्यांचा जे स्वतःच उपयोग करणारे आहेत अशांनाच जनावरें विकावीं. दलालांमार्फत विकूं नये. बहुतेक बाजारपेठेवर शाखा राहील तिचे मार्फत विक्री करावी. तसेंच धान्य, तूप वगैरे शेतीचा ठोक माल शाखेचे चालकांमार्फत विकावा.

२० गांवांत कोठें देवस्थान, मठ वगैरेंच्या पंच कमेट्या असतील त्या याच उपशाखेंत सामील कराव्या.

२१. मंडळाचे नियम, हस्तपत्रकें वगैरे जरूर तीं कामें तूर्त कोणा योग्य माणसाकडेस देण्यांत यावीं, व त्या संबंधीं सर्व माहिती एका विशिष्ट सर्वमान्य पत्रांतून प्रसिद्ध होत असावी. ( केसरी पत्राची तूर्त आह्मीं सूचना करितों. )

२२. मंडळाचे नांवें कोणीही सभेचे ठरावाशिवाय देवघेवीचा व्यवहार करूं नये. तसेंच शाखा उपशाखा यांनींही समजावें.

२३. या संबंधीं पत्रव्यवहार करणें झाल्यास तो मंडळाची स्थापना होईपर्यंत आमचेकडेस खालील पत्त्यावर करावा.

क्षिरसागर, कमर्शियल एजन्सी, मेनरोड, नासिक.

---

आह्मीं ता. १ जानेवारी १९२५ चे जाहिर विनंतींत प्रसिद्ध केल्याप्रमाणें शेतकरी व मध्यम वर्गाच्या स्थितिसंबंधीं विचार व त्यांचे मुक्ततेबद्दलचे उपाय योजनेचें हें प्रथम पुष्प जनतेस ऐक्यभावनेनें

समर्पण करीत आहों. आमचा हेतु हा एकंदर पुष्पपंचकांचा गुच्छ जनतेस समर्पण करण्याचा होता. तीं पुष्पें ह्मणजे " ज्ञानेश्वरी-सारामृत, स्वराज्य कादंबरी अथवा भारतसिंहाची गोष्ट, ब्रह्मसाम्राज्यदीपिका व कर्मविवेक हीं होत. परंतु आमचे सद्यस्थितीच्या मानानें व अपेक्षित मदतीच्या अभावामुळें आह्मीं हा गुच्छ एकदम समर्पण करण्यास तूर्त असमर्थ असल्यामुळें पुष्परूपानेंच तो अर्पण करीत आहों. व तो अनुक्रम वर दिल्याप्रमाणेंच राहील. एवढें सांगून व आमचे भावी कार्यास जनतेकडून उत्साह व मदत मिळेल अशी आह्मीं उमेद ठेवून उपसंहार तूर्त प्रकाशित न करितां एवढाच उपसंहार करून ज्या सर्वशक्तिमान परमेश्वराचे इच्छेनें हें कार्य आज परिपूर्ण झालें. त्याचे अनंत उपकार मानून भावी कार्यास त्याचे कृपादृष्टीबद्दल प्रार्थना करून आह्मीं येथें आपले सद्धेतूप्रमाणें सर्वांस इच्छित फलप्राप्ती होवो अशी सदिच्छा प्रदर्शित करून व सत्पुरुष तुकारामाचे दृष्टांतच अखेरचा हितोपदेश जनतेस सादर करून सर्वांची रजा घेतों.

आतां तरी पुढें हाचि उपदेश । नका करूं नाश स्वहिताचा ॥
सकाळांच्या पाया माझें दंडवत । आपुलालें चित्त शुद्ध करा ॥
हिततें करावें सर्वत्र मिळोनि । करुनियां मन शुद्ध भावें ॥
तुका ह्मणे हित होय तो व्यापार । करा फार काय शिकवावें ॥ १ ॥

# परिशिष्ट १.

## शेतकी संस्था.

वऱ्हाडचा शेतकरी व मध्यम वर्ग यांची स्थिति सुधारणेंच्या हेतूनें आह्मीं पूर्वीं प्रसिद्ध केलेले जाहिरातीप्रमाणें "वऱ्हाडचा शेतकरी व आचार" हें पुस्तक छापविलें आहे. त्यांत शेतकरी व मध्यम वर्गांतील नौकरीसाठीं बेकार फिरणारे लोक यांजकरितां उपाय योजना निर्दिष्ट केली आहे. परंतु तिचा फायदा प्रत्यक्ष नौकरींत असलेल्या मंडळीस स्वतः घेतां येत नसल्यामुळें त्यांस मिळणें अशक्य आहे. तसेंच त्यांना नौकरींत असल्यामुळें स्वतःचे संततीकरितां व स्वतःकरितां कायमची व्यवस्था कांहींच करितां येत नाहीं. कारण शंभर रुपये दरमहा पर्यंत पगाराचे इसमास हल्लींचे महर्गतेचे दिवसांत (व ही महर्गता कायमच राहण्याची चिन्हें दिसत असल्यामुळें) प्रापंचिक अवश्यक खर्च भागवून बचत ठेवणें शक्य नाहीं. या करितां सहकारी तत्वावर आह्मीं खालील योजना घडवून आणण्याचा प्रयत्न करीत आहों. व तिचा फायदा सर्वांनीं घ्यावा ह्मणून ती सर्वांपुढें मांडीत आहों.

वऱ्हाडची किंवा हिंदुस्थानची स्थिति लक्षांत घेतां येथील सार्वत्रिक सुखाचें साधन अनेक कारणांनीं * शेती हेंच ठरत आहे. परंतु वऱ्हाडांत आज शेतीची किंमत कल्पनातीत वाढली असल्यामुळें व खर्चाची-मजुरी वगैरेचीही-तीच स्थिति जाहल्यामुळें नवीन शेती करणारांस ती फायदेशीर होण्याचा संभव दिसत नाहीं. व जरी असला तरी त्याकरितां लागणारें भांडवल ज्या वर्गाकरितां आह्मीं विचार करीत आहों त्यांतून जमा होणें कठीण आहे. ह्मणून ज्या भागांत सर्व प्रकारची स्वस्तता आहे व शेतीस किंमत पडत नाहीं अशा इंदुर

* केसरी अंक ता. १४-७-२५ यांतील "शेतीचे धंद्यांतील अडचणी" हा लेख पहा.

संस्थानांत " शेतकी संस्था–शेतीचे फार्म–स्थापण्यास कांहीं जमीन घेऊन प्रयत्न केल्यास तो इष्ट–फलदायी–होईल. व या संबंधीं सवलतीही तिकडे मिळत आहेत. व त्या करितां कांहीं मंडळी तेथें स्थाईकही झाली आहे. परंतु या दिशेनें विशेष प्रयत्न कोणी केल्याचें दिसून येत नाहीं. याचें कारण द्रव्याची अडचण व कार्यदक्ष माणसांचा अभाव, तरी अशा परिस्थितींत ती यशस्वी कशी करितां येईल हें दाखविण्यास आह्मीं आपली नियोजित योजना सर्वांपुढें मांडून डिसेंबर अखेर पर्यंत या संबंधांत खटपट करून ती कितपत पटते हें पाहणार आहों. या संबंधांत जे आक्षेप घेण्यांत आले आहेत किंवा येतील त्यांचा प्रथम विचार करून नंतर आमची उद्दिष्ट योजना काय ती सांगू.

१ तिकडे लोक मिळत नाहींत. २ कपाशी पिकत नाहीं. ३ शेतीचा माल बाहेर पाठवितां येत नाहीं. ४ जमीन पिकाऊ नाहीं. ५ दुसरे उत्पन्नाचें साधन नाहीं.

वरील सर्व आक्षेपांसंबंधीं एकच उत्तर थोडक्यांत देणें ह्मणजे हे आक्षेप प्रत्यक्ष परिस्थिती पाहून कोणीं घेतलेले नाहींत. दोन दिवस तिकडे फिरून व कर्णोपकर्णीं ऐकलेल्या गोष्टींवरच हीं अनुमानें केलीं आहेत. आतां यासंबंधीं क्रमशः सूक्ष्म विचार पुढीलप्रमाणें करून संक्षेपतः सांगण्यांत येईल.

१ लोकवस्ती तिकडे कमी आहे ही गोष्ट खरी आहे. परंतु आपले कार्याचे व सुरवातीचे मानानें लोक पुरेसे मिळूं शकतात. शिवाय ॲग्रिकलचर क्लासमध्यें मध्यम वर्गांतील लोक शेतीचीं कांहीं कामें करितात त्याच पद्धतीवर इकडील मध्यम वर्गास तेथें शिक्षण देण्याचें असल्यामुळें या बाबतींत जी उणीव वाटत

आहे ती भासणार नाहीं, व नोकरीचेंहा परावलंबन कमी होईल.

२ पूर्वी कपाशी कोणी पेरीत नसत परंतु हल्लीं तिची गोडी तिकडेही लागून कपाशीचा पेरा होत आहे, व अलीकडे चोहोंकडेच पर्जन्य कमी होत असल्यामुळें कपाशीचें पीक होतें, व ती बाहेर पाठविण्यास मनाई नाहीं.

३ शेतीचा माल बाहेर पाठवितां येत नाहीं परंतु त्यापासून विशेष अडचण न येतां ती उलट फायदेशीरच आहे, ह्मणून धान्याचा संग्रह राहतो, शिवाय त्यावर शेतीच्या मजुरीचीं वगैरे कामें होतात. ह्मणजे नगदी पैसा या करितां खिशांतून काढावा लागत नाहीं.

४ जमीन पिकाऊ आहे. परंतु मेहनत नाहीं. व तीच सुधारणा प्रथम करणें आहे. व त्या करितां सुधारलेलीं आऊतें, खतें वगैरेचा उपयोग करून ती करणें आहे. शिवाय विशेषेंकरून बागाईती फळफळावळ यांची लागवड केल्यास हा प्रश्नही महत्वाचा वाटणार नाहीं.

५ हीं साधनें उत्पन्न करण्याचीं आहेत:—दळण्याची चक्की, कपाशीचे सुधारलेले रेंचे, ऊंसाचे चरक, धान्य उपणण्याचीं यंत्रें, ऑईल एंजीन व इरिगेशन वगैरे सारखीं इतर साधनें सुरूं करून उत्पन्नाची बाब वाढविणें. या शिवाय स्थानिक गोष्टी व इतर जरूर त्या सुधारणा घडवून आणतां येतील व त्यांत नवीन पिढीस स्वावलंबनाचें उदात्त शिक्षण मिळून वेगळेंच वळण लावितां येईल.

आतां या संबंधीं कार्याची दिशा व कार्यक्रम यांचें थोडक्यांत दिग्दर्शन करून ही सूचना पुरी करितों.

१ सुरवातीस कमींतकमी पांचशें मेंबर झाल्याशिवाय कामास सुरुवात करितां येणें शक्य नाहीं. त्या करितां शेअर ह्मणून ते

गोळा करणें जरूर आहे. व त्या शेअरची योजना पुढें दिल्याप्रमाणें आहे. दरमहा ४० रुपये पगाराचे माणसास १० रुपये दोन हप्त्यांनीं देण्याचे, व शंभर रुपये पगारापर्यंत एकदम १० रुपये देण्याचे. व शंभर किंवा वरील पगाराचे माणसास २५ रुपये देण्याचे आहेत, ही रक्कम आज सर्वच नगदी देण्याची नसून त्या रकमेच्या शेअर अर्जाचे नमुना फार्मावर सही करून शेअर भरण्याचा फार्म परिशिष्ट २-२ प्रमाणें देण्याची आहे. प्रत्येक शेअर २५ रुपयांचा आहे.

२ इकडील दहा किंवा तेरा सुशिक्षित पेन्शनर इसमांची कमेटी स्थापन होऊन ही शेतकी संस्था रजिष्टर केली जाईल; व जमीनी संस्थेच्या नांवानें घेण्यांत येतील.

३ मेंबरांपैकीं एका इसमास एकदांच फक्त फार्मची व्यवस्था व देखरेख ठेवण्याकरितां ३।४ महिने तेथें रहावें लागेल. यामुळें कोणासही सतत राहणें कंटाळवाणें न होतां व इकडील त्यांचा नेहमींचा व्यवसाय न सोडतां घर बसल्या या स्कीमचा फायदा घेतां येईल व सर्व शेअरहोल्डर्सनाहीं अर्थात याचप्रमाणें नौकरींत राहूनही फायदा मिळूं शकणार आहे; व तोही थोड्या रकमेंत ! कमेटीच्या मेंबरांची फेर निवडणूक दर चवथे वर्षीं होईल.

४ सर्व रकमेचा जमाखर्च ठेविला जाऊन तो वर्षांतून दोन वेळां शेअरहोल्डर (शेअर घेणार) लोकांची सभा भरवून तींत षण्मासिक रिपोर्टासह वाचण्यांत येईल; व नवीन करण्याच्या गोष्टी आगाऊ कळविल्या जातील.

५ नौकरवर्गाशिवाय इतरांसही कलम १२ व १३ यांतील वृत्तपत्र व पुस्तकांस आगाऊ ग्राहक झाल्यास याचा फायदा मिळूं शकेल.

६ कोणास केव्हांही संस्थेच्या मालमत्तेचा भाग किंवा जिन्नस हिश्याप्रमाणें वांटून मिळणार नाहीं. ज्यास शेअर काढून घेणें असेल त्यास तो विकून दिला जाईल.

७ कोणास कायमचे तिकडे राहणें असल्यास त्याची स्वतंत्र व स्थाईक व्यवस्था करण्यांत येईल.

८ तीन वर्षे पर्यंत कोणास याचा मोबदला प्रत्यक्ष मिळणार नाहीं; फक्त हिशोब मिळेल; व शेअरची रकम पुरी होईपर्यंत व्याज सुरू होणार नाहीं. [ नौकरवर्गासच ही हप्त्यांची सवलत ठेविली आहे. ]

९ प्रत्येक शेअरला दरमहा दर शेंकडा ८ आणे व्याज मिळून संस्थेचे उत्पन्नाचा हिश्याप्रमाणें फायदा मिळेल.

१० ही संस्था "वऱ्हाड शेतकी मंडळाची" शाखा ह्मणून राहील.

११ संस्थेची स्थावर मिळकत असल्यामुळें शेअर बुडण्याची केव्हांही भीति नाहीं. एवढेंच नव्हें तर पुढील पिढीस यापासून बरेच फायदे होणार आहेत. ते आजच सर्व सांगत बसण्यांत अर्थ नाहीं. थोडक्यांत याची कल्पना ह्मणजे शेअर घेणारांचे मुलांस हा आश्रम व शिक्षणालय होऊन त्यांस सर्व प्रकारचें शिक्षण बिनखर्ची मिळेल.

१२ या संस्थेचें व वऱ्हाड शेतकी मंडळाचें काम कसें चाललें आहे तें नियमितपणें प्रसिद्ध करण्यास प्रचलित विषयासंबंधीं तसेंच शेती, व्यापार, उद्योग-धंदे वगैरे यांची माहिती देणारें वृत्तपत्रही वरील वर्गणीदारांइतका आंकडा पूर्ण होतांच नासिक येथें सुरू होईल. त्या करितां आगाऊ ग्राहकांनीं परिशिष्ट २ [ १-२ ] मध्यें दिलेल्या नमुन्याचे फॉर्मवर सही करून पाठविणें.

१३ तसेंच क्रमानें प्रसिद्ध होणाऱ्या आमच्या १५ रुपयांच्या पुस्तकांस व वरील वृत्तपत्रास आगाऊ ग्राहक होणारांसही या संस्थेच्या फायदा मिळेल. तूर्त "ज्ञानेश्वरी सारामृत" हें पुस्तक छापण्याचें काम सुरू आहे. त्या करितां एक रुपया टपाल—व्ही. पी.

खर्चाबद्दल—त्वरित पाठवून नांवें नोंदवावींत. इतर पुस्तकांबद्दल जाहिरात पाहून परिशिष्ट २ [ ३ ] मध्यें दिलेल्या फॉर्मवर सही करून पाठविणें.

सदर पुस्तकांचे व वृत्तपत्राचे उत्पन्नांतून या संस्थेस मदत करण्याची आहे.

तूर्त एवढेंच विचाराकरितां ठेवून मंडळीच्या सहानुभूतिची आम्हीं अपेक्षा करितों. सर्व पत्रव्यवहार " कमर्शियल एजन्सी " मेनरोड, नासिक सिटी या पत्त्यावर करावा. उत्तराकरितां रिप्लाय-कार्ड किंवा तिकीट पाठवावें.

---

## उपाय योजनेसंबंधीं खुलासा.

आतां नौकरवर्गाचे परिस्थितिनुरूप त्यांस जड न होतां बऱ्याच अंशीं मोबदला मिळून सदर संस्थेच्या कार्याची कल्पना होणें जरूर असल्यामुळें थोडा जास्त खुलासा करीत आहों.

प्रत्येक शेअर २५ रुपयांचा ह्मणून वर सांगितलेंच आहे. त्यांत प्रथमतः शेअरचे मागणी अर्जासोबत ५ रुपये पाठविण्याचे असून त्याचे मोबदल्यांत त्यांस " वऱ्हाडचा शेतकरी " हें तयार असलेलें व लौकरच तयार होणारें " ज्ञानेश्वरी सारामृत " अशीं दोन पुस्तकें मिळतील. पुढें प्रत्येक तीन महिन्यांनीं पांच पांच रुपये पाठविण्याचे आहेत. त्यांत " स्वराज्य " कादंबरी, " ब्रह्मसाम्राज्य दीपिका ", वृत्तपत्र ( एक वर्ष ) व " कर्मविवेक " अशीं क्रमानें मिळतील. ही सवलत कनिष्ठ नौकरवर्गापुरतीच आहे. इतरांनीं एक व दोन हप्त्यांनीं मागणी प्रमाणें शेअर पुरा करण्याचा आहे. वरील निरुपणावरून हें लक्षांत येईल कीं, वास्तविक शेअरचे रकमेचा पूर्ण मोबदला त्यांचे पदरांत पडून त्या शिवाय पुढील पिढीस सर्व प्रकारचें शिक्षण मोफत

मिळून त्यांचे पुढील आयुष्यक्रमाचीही तजवीज यांत होणार आहे. या खेरीज शेअर घेणारांस तात्कालिक फायदा—शेअर रकमेवरील व्याज व संस्थेची स्थावर मिळकत व सुधारणा यांवर मिळणाऱ्या हिश्याप्रमाणें नफा—हा होय. सदर संस्थेच्या प्रगतीची माहिती वऱ्हाडच्या सर्वमान्य " उदय " पत्रांतून प्रसिद्ध केली जाईल.

आज अस्तित्वांत असलेलीं व पुढें येणारीं सर्व वर्तमानपत्रें, मासिकें, नाटकें, कादंबऱ्या किंवा धार्मिक व सद्यस्थितिसंबंधीं ग्रंथमाला वगैरे जनतेचे उदार आश्रयावरच सुरू आहेत. परंतु त्यांचा मोबदला तितक्यापुरताच ह्मणजे सद्यस्थितिची जाणीव व करमणूक या पलीकडे होत नाहीं. एवढेंच नव्हें तर या ज्ञानसत्रांत समर्पण केलेले द्रव्याचा हिशोबसुद्धां कोणास मागण्याचा हक्क नाहीं. शिवाय वरील ज्ञानदात्यांपैकीं कोणीही एखाद्या सार्वजनिक व उपयुक्त कार्यांत त्यांतील कांहीं अंशसुद्धां खर्ची घातल्याचें ऐकिवांत नाहीं. यावरून सदर ग्रंथमाला व वृत्तपत्र ज्या उद्देशानें सुरू होणार ते उद्देश व त्यापासून होणारे भावी फायदे लक्षांत घेऊन त्यांस योग्य मदत करण्याचें जनतेच्या निर्णयावरच ठेऊन आह्मीं कार्यास सुरुवात करितों.

आतां प्रस्तुत पुस्तकद्वयासंबंधीं दोनशद्ब सांगून हा भाग पुरा करितों " वऱ्हाडचा शेतकरी " हे नांव ऐकून सदर पुस्तक वऱ्हाडचेच खास उपयोगाचें आहे असा समज पुस्तक न पाहणाराचा होईल. परंतु तसें नसून सर्व हिंदुस्थानचे उपयुक्ततेकरितां तें आहे असें दिसून येईल.

वऱ्हाड हें नांव लाक्षणिक आहे. या वरून वऱ्हाड ह्मणजे हिंदुस्थान, शेतकरी ह्मणजे हिंदी जनता, सावकार ह्मणजे हिंदुस्थानशीं संबंध ठेवणारीं सर्व सुधारलेलीं राष्ट्रें, वकील ह्मणजे परराष्ट्रीय व्यापारी, दलाल ह्मणजे विदेशी कंपन्यांचे एजंट व नौकर ह्मणजे

इकडील बडे व्यापारी हे होत. यावरून हिंदी जनता आपले परकीय राष्ट्ररुपी सावकारास अखंड पोषक बनल्यामुळें हिंदुस्थानांत कायमची महर्गता, दारिद्य व परावलंबन वास करीत आहेत हा इत्यर्थ. या दृष्टीनें सदर पुस्तकाचें अवलोकन केल्यास तें सर्वांसच उपयुक्त असें दिसेल. दुसरी गोष्ट इतर पुस्तकांप्रमाणें एकदां वाचून संपणारें हें पुस्तक नसून अखंड मार्गदर्शकत्वाचें काम करणारा एक आदर्शच होय. व जरी आज वजनदार सुशिक्षित वर्ग आपले नित्य व्यवसायामुळें इकडेस दुर्लक्ष करील व त्यामुळें यांतील उपाय योजना अमलांत येण्यासंबंधीं कोणी साशंक राहतील तरी उद्यां याच प्रश्नांचा विचार त्यांना करावा लागेल अशी आमची खात्री आहे. कारण पथ्यापथ्य विचाराशिवाय इतर बाह्य उपाय या रोगास उपाय ते अपायच ठरतील हें आम्हींच ह्मणत नाहीं तर पाश्चात्य विद्वान देखील ह्मणतात व आपलेपेक्षां वस्तुस्थितिच्या परिणामाचें भविष्यज्ञान त्यांना यथार्थ होतें हें कोणासही नाकबूल करितां येणार नाहीं. व यांत प्रतिपादन केलेले उपाय व तत्व यांचीच त्यांना विशेष काळजी वाटत आहे; ह्मणजे इतरास ते महत्व देत नाहींत हें सिद्धच होतें. (सेजविक साहेबांचा उतारा पान ५१).

आतां सदर पुस्तकांतील उपाय योजना वर दर्शविल्याप्रमाणें वजनदार व्यक्तींचे, स्वार्थत्यागतत्पर शेतकरी वर्गाचे व ग्राम-पुढाऱ्यांचे सर्वस्वी स्वाधीन असल्यामुळें तिचें मूर्त स्वरूप त्याच्याच परस्पर सहानुभूतिपर प्रयत्नांवर अवलंबून आहे हें उघड आहे; ह्मणून ती त्यांजवर सोंपविणें भाग आहे करितां आह्मीं त्याप्रमाणें करितों.

प्रस्तुत परिशिष्टांत नमूद केलेल्या उपाय योजनेला तशी अडचण नाहीं. ती स्वतंत्र व केवळ जनतेच्या उदार आश्रयावर अवलंबून आहे ह्मणून आह्मीं हातीं घेण्याचें ठरविलें आहे. व त्या करितांच ही ग्रंथमाला व वृत्तपत्र यांची योजना आहे. या संस्थेच्या अध्यक्षपदाचा

मान श्री. रा. रा. दादासाहेब सरंजामे यांस समर्पण करण्याचा आमचा विचार आहे. यापेक्षा जास्त उघड व स्पष्ट आमचे उद्देश जनतेपुढें ठेवण्याची विशेष आवश्यकता आहे असें आह्मांस तूर्त तरी वाटत नाहीं.

आतां दुसरें पुस्तक " ज्ञानेश्वरी सारांमृत " या संबंधानें विशेष लिहिण्याचें प्रयोजन दिसत नाहीं. कारण त्या ग्रंथाचें महत्व व लोकप्रियताच त्याची साक्ष देत आहे. त्यांतून अधुनिक विचारसरणीनें व निरुपणपद्धतीनें तो विशेष शोभायमान व अलंकृत झालेला दिसून येईल. सारांश दुग्ध स्वभावतःच स्वादिष्ट व पौष्टिक असतें; मग त्याचें सार जें घृत त्यांत तत्गुण वैशिष्ट्य असणें साहाजिकच आहे. तद्वत भक्तिमय अशा मूळ ग्रंथाचे सारांमृतांत भक्तिरस पात्राबाहेर वोसंडतांना प्रत्ययास येईल एवढेंच सांगितलें ह्मणजे पुरें होईल.

आतां सरतेशेवटीं एक गोष्ट सांगण्याची ती ही कीं, नौकरवर्ग ह्मणजे सरकारी, निमसरकारी व खाजगी कोणत्याही जातीचे, पक्षाचें व धंद्यांतील लोक वऱ्हाडचेच नव्हे तर हिंदुस्तानचे असा अर्थ समजावा. यावरून या संस्थेची कल्पना संकुचित नसून व्यापक असल्याचें लक्षांत येईल; व जितक्या प्रमाणानें तिला आश्रय मिळेल तितक्या प्रमाणानें ती विस्तृत होत जाईल. एवढें सांगून ही पुरवणी पुरी करितों.

टीप—सर्व रकमेबद्दल पावती दिली जाईल. व प्रिलिमिनरी शेअर सर्टिफिकेट शेअर घेणाराकडेस वृत्तपत्राचे दुसेर अंकाबरोबर पाठविण्यांत येईल. शेअर अर्जाचे, हप्ते भरण्याचे व पुस्तकांच्या ऑर्डरीचें छापील कार्ड एक आण्याचें तिकीट पाठवून मागविणें.

# परिशिष्ट २.

## १. नौकर वर्गाचे संस्थेचे शेअर अर्जाचा नमुना.

कमर्शियल एजन्सी, मेनरोड, नासिक सिटी.

आह्मीं खालीं सही करणार वस्ती तालुका पोस्ट नौकरवर्गाच्या संस्थेचे शेअर घेऊं इच्छितों. व त्यासंबंधीं सुचविलेली उपाय योजना व पुढें होणारे नियम आह्मांस मान्य आहेत. शेअरचे हप्ते सोबतचे पत्रांत लिहिल्याप्रमाणें बिनचुक पाठवूं. सार्टिफिकेट, पावती, व्ही. पी. वगैरे खालील पत्यावर पाठविणें. कळावें, तारीख

सही. ( पूर्ण )

## २. शेअर हप्ते भरण्यासंबंधीं पत्राचा नमुना

कमर्शियल एजन्सी, मेनरोड, नासिक सिटी.

वि. वि. आह्मीं या सोबत नौकरवर्गाच्या संस्थेचा शेअरअर्ज व त्याच्या प्रथम हप्त्याची रक्कम दर शेअरला पांच रुपये प्रमाणें रुपये पाठविले आहेत. इतर हप्त्यांची रक्कम खालील पुस्तकांच्या व्ही. पी. चे स्वीकाररूपानें पाठवींत आहों. त्याचा तपशील:—

ज्ञानेश्वरीसारांमृत—जानेवारी, ब्रह्मसाम्राज्य दीपिका—एप्रील, वृत्तपत्र प्रथम अंक—जुलई व कर्मविवेक—आक्टोबर १९२६ येणें प्रमाणें हप्ते पाठवूं.

सही.

## पुस्तकाच्या आर्डरीचा नमुना.

कमर्शियल एजन्सी, मेनरोड, नासिक सिटी.

वि. वि. “ वऱ्हाडचा शेतकरी ” हें पुस्तक पाठवावें. वृत्तपत्र सुरू होतांच प्रथम अंक व्ही. पी. नें आमचेकडेस खालील पत्यावर पाठवावा. तूर्त वर्गणीदारांचे यादींत नांव नोंदवावें. “ ज्ञानेश्वरी सारांमृत ” या पुस्तकाचे व्ही. पी. खर्चास एक रुपया पाठविला आहे. कळावें, ता.

सही ( पूर्ण ) ————————————

गांव तालुका पोस्ट

क्र. क.

# परिशिष्ट ३

## इंग्रजी उताऱ्यांचे भाषांतर

१. ट्रेव्हिलियन साहेब ह्मणतात [ पान ३३ ]:—

हिंदुस्थानांतील आर्य संस्कृतीच्या पुरस्कर्त्यांना चीड येईल किंवा अयोग्य वाटेल अशा प्रकारच्या झगड्याचें काम आह्मीं न करितां उच्च प्रकारच्या ज्ञान प्राप्तीची गुरुकिल्ली त्यांच्या हातीं देणार आहों. मग या नवीन संस्कृतीचा त्यांच्या मनावर सकृत्दर्शनीं होणारा परिणाम ह्मणजे आर्य संस्कृतीविषयीं त्यांच्या अंतःकरणांत वसत असलेला पूज्यभाव समूळ नष्ट करणें हा होय. ( कोणत्याही देशाचे ) हल्लींचे तरुण पिढीचे लोक थोड्याशा कालांत राष्ट्रपुरुष बनणें हें क्रमप्राप्तच आहे. ह्मणून या लोकांचें शील व स्वभाव यांत आपणांस क्रांती घडवून आणण्याची असल्यास त्यांना बालपणींच आपणांस हातीं धरलें पाहिजे; व पुढें ज्या दिशेनें त्यांनीं जावें अशी आपली इच्छा असेल त्या दृष्टीनेंच त्यांना शिक्षण दिलें पाहिजे. असें झालें ह्मणजे त्यांच्या शिक्षणाप्रीत्यर्थ झालेला सर्व खर्च योग्य कारणीं लागला असें होईल. मग त्यांचे पूर्वदूषित ग्रहांशीं आह्मांस झगडण्याचें कारणच राहणार नाहीं. कारण ( पूर्व वयांत तशा हेतूनेंच शिक्षण मिळाल्यामुळें ) ज्यांचीं मनें लवचिक बनलेलीं आहेत असेच पुरुष देशांत दिसतील व त्यांतूनच अल्प कालांत असा एक वजनदार सुशिक्षित वर्ग निर्माण होईल कीं, थोड्याच मदतीनें किंबहुना आपली मदतही न घेतां ( पूर्व वयात अनुभविलेल्या ) याच शिक्षणपद्धतीचा पुरस्कार करण्यास तो स्वतःच प्रवृत्त होईल.

२. सर थॉमस मनरो साहेब ह्मणतात [ पान ४३ ]:—

हिंदूंच्या राज्यव्यवस्थेंत पाटील चावडी आणि अमलदारांच्या कचेऱ्या

यां खेरीज इतर न्यायासनें नव्हतीं व सर्व दिवाणी दाव्यांचा निवाडा पंचायतीमार्फत होत असे असें दिसतें. ( हल्लीं ) ज्याचा पक्ष सबळ आहे, असा एतद्देशीय मनुष्य नेहमीं पंचायतीसाठीं अर्ज करितो; परंतु ज्याचा पक्ष दुर्बळ आहे तो दाव्याचा निकाल कलेक्टर किंवा जज्ज यांच्याकडून व्हावा असेंच इच्छितो. कारण त्यांस फसविणें अधिक सोपें आहे हें तो जाणून असतो. यावरून ग्रामपंचायतीशीं एतद्देशीयांचा नेहमींचा परिचय आहे. व त्या नष्ट केल्यास नेटिव्ह लोकांस त्यांच्याच कायद्यानें न्याय मिळतो असें ह्मणण्यासही कांहींच आधार नाहीं. [ कोर्टातून न्याय इच्छिणाऱ्या ] लोकांच्या कृत्यांतील हेतु आणि त्यांनीं दिलेल्या पुराव्याच्या सत्यासत्यतेची छाननी करून योग्य न्याय-निकाल-देण्याचे बाबतींत, न्यायासनाचे कामांत सर्व आयुष्य घातलेल्या एखाद्या चाणाक्ष पाश्चात्य न्यायाधिशाससुद्धां हिंदु पंचायतींतील बुद्धिमान पंचांची बरोबरी करितां येणें शक्य नाहीं असें हें आश्चर्यकारक न्यायाश्रय होय, असें माझे विवेकबुद्धीस निश्चयानें वाटत आहे.

**३. सर जॉर्ज बर्डवुड साहेब ह्मणतात. [ पान ४७ ]:--**

हिंदुस्थानांतील कारागिरांच्या अनुवांशिक चातुर्याचें बीज सर्वस्वी हिंदुस्थानांतील जमीन आणि खेडीं यांच्या व्यवस्थेंत आहे. तिच्या योगानें साध्या रहणींतील सर्व वस्तूंची सुबत्ता त्यांना सहज उपलब्ध झाली आहे. तिच्यामुळें राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्ति अविभाज्य व अविच्छिन्न अशा एकराष्ट्राचे घटक बनलेली लोकसत्तात्मक राज्यपद्धती उत्पन्न झाली आहे. शिवाय या पद्धतींत उच्च धार्मिक बंधनानें प्रत्येकाची आवश्यक तरतूद व योग्य मान मिळण्याचीही व्यवस्था केली आहे. तसेंच प्रत्येक धंदा एकाच वंशांत अक्षय्य पिढीनपिढी चालत राहून एकमेकांस मनापासून मदत करण्याचा भार प्रत्येकावर पडतो. ह्या एकंदर गोष्टींवर हिंदूंची सर्व सत्ता अवलंबून आहे.

जगांतील इतर देशांपेक्षा हिंदुस्थानांत धर्म आणि राजकारण यासंबंधीं अधिक क्रांत्या घडून आल्या आहेत असें असूनही सर्व देशभर खेड्यांतील समाजाचे परस्परांतील व्यवहार जेमानें पूर्ववत चालू आहेत. या देशांत सिथियन, ग्रीक, सारासेन, अफगाण, मोंगल आणि मराठे हे पहाडांतून उतरले. तसेंच पोर्तुगीज, डच, इंग्लिश, फ्रेंच आणि डेन्स हे लोक जलमार्गानें आले व त्यांनीं एकामागून एक आपली राजसत्ताही स्थापन केली; परंतु समुद्राच्या भरती ओहटीच्या लाटांनीं अचल खडकावर जसा कांहींच परिणाम होत नाहीं तद्वत येथील धर्म आणि व्यापार यांच्या बंधनांनीं निगडित अशा खेड्यांवर त्यांचा यत्किंचितही परिणाम झालेला नाहीं.

---

४. आरनॉल्ड साहेब ह्मणतात. [ पान ५१ ]:—

एशियांतील व युरोपांतील लोक यांचें ध्येय, आशा, भीतीचीं कारणें, आकांक्षा, प्रेम आणि द्वेष हीं सर्व परस्पर विरुद्ध आहेत. ही गोष्ट केवळ्याही लाघवी वाक्पांडित्यानें छपवितां येण्यासारखी नाहीं. जोंपर्यंत आह्मीं या देशांत आहों तोंपर्यंत एशियांतील लोकांच्या आयुष्यक्रमांतील ध्येयांस युरोपियन लोकांचे ध्येयांपुढें मान वांकविण्यास लावणें हाच आमचा इतिहास असणार ! हा जर जुलुम असला तर आह्मीं येथून जावें हें बरें; पण आपणांस जर राहणेंच असेल तर असा मानभावीपणा करून चालणार नाहीं. आयुष्यक्रमाकडे आह्मांस एशियांतील लोकांच्या दृष्टीनें पाहतां येणें शक्यच नाहीं व इष्टही नाहीं. आमचा कल इकडील लोकांस युरोपियन वळण लावणें हाच असला पाहिजे ! सहिष्णुता, सहानुभूति व व्यवहारचातुर्य यांचें या कामीं आपणांस चांगलें सहाय्य मिळेल व मिळालेंही आहे. ह्मणून यांच्या योगानें हा क्रम त्यांना कमी द्वेष्य वाटून विशेष उघडपणें लक्षांतही येणार नाहीं आणि हाच

क्रम चालू आहे व चालू राहणार. आतां ज्या लोकांना त्याच्यापुढें आपली मान वांकविणें भाग पडेल. त्यांना तो प्रिय होणें शक्य नाहीं व कधींही प्रिय होणार नाहीं.

---

५. सेजविक साहेब ह्मणतात. [ पान ५१ ]:—

हिंदुस्थान आपल्या हातचा गेल्यास पूर्वेकडील व्यापार आपल्या हातून जाणार याची जाणीव आपणांस नाहीं असें दिसतें पण तसें होणारच हें समजणें सुलभ आहे. कारण तो देश आपल्या हातचा गेल्यास ज्या प्रमाणें मध्यएशियांतील पेठा आपणांस बंद झाल्या त्याप्रमाणें हिंदुस्थानच्या पेठांचीही बंदी होईल इतकेंच नव्हे तर याशिवाय हिंदुस्थानांत कच्चा माल विपुल उत्पन्न होत असल्यामुळें व तेथील लोक प्राचीन कालापासून कुशल कारागिर असल्यामुळें संरक्षक व्यापारपद्धतीचें अवलंबन करून पक्का माल तयार करणारें हिंदुस्थान हें मोठें राष्ट्र बनेल. व मग तेथें मजुरी स्वस्त व कच्चा माल मुबलक असल्यामुळें पौरस्त्य देशांतून आपलें उच्चाटन लौकरच होईल.

---

६. इटालियन फारयान साहेब ह्मणतात. [ पान ६५ ]:—

गुन्ह्यासंबंधीं माहिती निष्णात असलेल्या फारयान नांवाच्या इटालियनानें अल्प वयस्क गुन्हेगारांच्या विषयांचें विशेष परिशीलन केलें आहे. तो ह्मणतो कीं, एका अक्षरशून्य प्रामाणिक माणसाची योग्यता सुशिक्षित हजार माणसांबरोबर आहे. आणि गुन्हे बंद होणें किंवा त्यांची संख्या कमी होणें याबाबतींत प्राथमिक शाळांचा उपयोग अधिकाधिक होत असला तरी ज्यांच्या वृत्तींत आनुवंशिक

त्रिघाड आहे, अशा मुलांतील गुन्हेगारीच्या बींजाची वाढ होण्याचें कार्य अतिरिक्त विद्येच्या योगानें विशेषत: होण्यासारखें आहे; असें ह्मणण्यास मला दिक्कत वाटत नाहीं. आणखी तो ह्मणतो, वास्तविक पाहतां, पुष्कळ बाबतींत सुशिक्षित वर्गांतील माणसें सर्वांत फार वाईट प्रकारचे गुन्हेगार असतात. त्यांचें औपचारिक वर्तन, संभावितपणाच्या लबाड्या, वेळ पडेल तसें वागणें, नीतिमत्ता आणि न्यायाच्या संबंधाचीं भ्रष्ट मतें, कायद्याचा अपमान आणि आवश्यक कर्तव्याची उपेक्षा,— यांचा समाजावर एकंदर काय परिणाम होतो, हें सांगणें कठीण आहे.

७. नरेंद्रनाथलॉ यांचें मत. [ पान ८६ ]:—

एक गोष्ट प्रत्येकानें लक्षांत ठेंविली पाहिजे, ती ही कीं; ईस्ट इंडिया कंपनीनें हिंदुस्थानांत शिक्षण प्रसाराचे जे प्रथम प्रयत्न केले, ते हिंदी लोकांना ख्रिस्ती करावें, या धार्मिक भावनेच्या प्रेरणेनें होत. तसेंच शिक्षणविषयक कार्यांत जर कोणी अत्यंत आस्थेवाईक असतील, तर ते धर्मोपदेशक व ख्रिस्त-धर्मप्रसारक हेच होत.

८. डॉ. आनीबिझांट ह्मणतात. [ पान ८७ ]:—

तरुण पिढीच्या शिक्षणाचीं सूत्रें परकीय सत्तेच्या हातीं देणें, व परकीय विद्या, परदेशी पोषाख व तद्देशीय चाली, रीतिरिवाज या सारख्या, मुलांच्या चित्तवृत्ति निसत्व करणाऱ्या व त्यांचा सर्वस्वी मनोभंग करणाऱ्या गोष्टी यांवर शिक्षण पद्धतीचें वर्चस्व ठेवून, त्या सर्व परकीय भाषेच्या द्वारें व विशेषत: परकीय मिशनऱ्यांच्या शाळांतून ( विद्यार्थ्यांवर ) सक्तीनें लादणें, या सारखी एखाद्या देशाचें राष्ट्रियत्व त्वरित नष्ट करणारी व राष्ट्रशीलास निश्चयानें शिथिलत्व आणणारी दुसरी कोणतीच गोष्ट नाहीं.

---

९. माऊंटस्टुअर्ट एल्फिस्टन साहेबांचें मत [ पान ८९. ]:—

माझ्या मतें शिक्षणाची अत्यंत महत्वाची शाखा सरकारी नौकरीसाठीं लोक तयार करणें ही होय. तिचें महत्व ती जनतेच्या सामान्य सुधारणेला प्रत्यक्ष मदत करीत आहे यांतच केवळ नसून पांढरपेशा वर्गांतील हिंदी लोकांत सुधारणेबरोबर स्वार्थाचीही सांगड घालून शिक्षणाला एक प्रकारचें उत्तेजन देते यांत आहे.

मला वाटतें कीं, इंग्रजी भाषेच्या अध्ययनाला शक्य तितकें उत्तेजन दिलें पाहिजे; कारण तें हिंदी लोकांना सुसंकृत करून जितकें त्यांना आपल्या सान्निध्य आणील तितकें त्यांना जवळ आणण्याचें काम तद्व्यतिरिक्त थोड्याच गोष्टी करितील. हिंदी लोकांना देशी व इंग्रजी भाषांतून शिक्षण दिलें तर त्याचा परिणाम ख्रिस्ती धर्माच्या प्रगतीला पोषकच होईल.

---

१०. ट्रेव्हिलियन साहेब ह्मणतात [ पान ८७ ]:—

उलटपक्षीं इंग्रजी वाङ्मयाचा आत्मा इंग्लिश व हिंदी लोक यांच्या परस्पर संबंधाला अनुकूलच आहे. आपल्या वाङ्मयाच्या द्वारें आपणाशीं पूर्ण परिचित असलेल्या ( हिंदी ) तरुणांना आपण इंग्लिश परके आहोंत असें वाटत नाहीं. तें आपल्यांतील थोर लोकांबद्दल आपल्या इतक्याच अभिमानानें बोलतात व ज्याप्रमाणें रोमन शिक्षणपद्धती, विषय व व्यवसाय साम्य यांनीं रोमच्या सत्तेखालील भागातील गॉल व इटालियन रहिवाशीं गॉल व इटालियन होण्याऐवजी रोमन वृत्तीचे बनले, त्याचप्रमाणें हिंदी लोक आपण यांचे शिक्षणाचे विषय व पद्धती तसेंच व्यवसाय एकच असल्यामुळें ते वृत्तीनें हिंदु होण्यापेक्षां इंग्लिशच जास्त होतात.

---

११. मि. नित्से यांचा आपल्या देशबंधूस उपदेश [ पान ८८ ]:–

मी तुह्मांला एक नवीन धर्माज्ञा सांगतोः—बांधवहो, आपण आतां दास्यांतून मुक्त झालों आहों. तेव्हां काटक व्हा. हें जग आतां आपलें आहे. उत्कृष्ट अन्न, निरभ्र आकाश–स्वच्छ हवा पाणी–जोरदार विचार आणि सुंदर स्त्रिया इत्यादि उत्तम वस्तु लोक आपणास न देतील तर आपण स्वतःच घेऊं.

REFBK-0002714

# शुद्धीपत्र.

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३ | २४ | रथाईक | स्थाईक |
| ७ | १७ | त्याचेहा | त्याचेही |
| १० | १८ | फक्त | युक्त |
| ११ | १७ | माज्जव | मज्जाव |
| २० | २२ | अनुकरणांत | अवतरणांत |
| ३७ | २० | नामांकित | प्रापंचिक |
| ४३ | २६ | at | of |
| ४८ | २७ | lifted | little |
| ८९ | २० | निर्फल | निर्मुक्त |

टीपः—पुस्तकांत " मंडळ " या शद्वापूर्वी कोठें " शेतकी " व कोठें " शेतकरी " हे शद्व पडले तेथें शेतकरी असे समजावें.

अ. क्र. २७१४